# रवीचे उखळे किरण

सत्साहित्य पुस्तकमाला १

अनुवादक
वासुदेव गोविंद



IRBK-0103182
IRBK-0103182

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय पा०वा०
दा. क्र. ३९_२

: प्रकाशक :

श्री. वि. दामले, बी. कॉम्

एन्. के. पब्लिशिंग हाऊस,

६२७ बुधवार पेठ, पुणें २.

सर्व हक्क आनंद कार्यालय, ३३०
सदाशिव पेठ, पुणें २ यांचे स्वाधीन.

: मुद्रक :

यशवंत गोपाळ जोशी,

आनंद मुद्रणालय,

१९६/४६ सदाशिव पेठ, पुणें २.

[illegible]
क्रा. क्र. ...3752... नों दि ...
वि. ...৩१:৭१...

# प्रकाशकाची प्रस्तावना

अलीकडे मराठी भाषेंत अनेक पुस्तकमाला निघाल्या आहेत व निघत आहेत. पण त्यांतून सद्भिरुचीचा प्रसार करून वाचकांच्या मनाला उन्नत करण्याचा यत्न ज्यांत केला आहे, व ज्यांकडे महाराष्ट्रवाङ्मयाच्या भक्तांना अभिमानानें बोट दाखवितां येईल अशीं फारच थोडीं खरोखर चांगलीं व उपयुक्त पुस्तकें निघालेलीं दृष्टीस पडतात. ही उणीव अंशतः तरी दूर व्हावी म्हणून 'सत्साहित्य–पुस्तकमाला' आम्हीं काढीत आहों.

'**रवींचे उज्ज्वल किरण**' हें या मालेंतलें पहिलें पुस्तक आहे. पुढील पुस्तकें तयार होत आहेत. महाराष्ट्रीय सज्जन ज्याप्रमाणें आमच्या पुस्तकांना आजपर्यंत उदार आश्रय देत आले, तसे या मालेलाहि देतील अशी आम्ही खात्री बाळगतों.

पुणें
ता. २२।१०।२० } प्रकाशक

# किरणांचा क्रम


डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचें संक्षिप्त चरित्र 1
उपोद्घात ... ... ... ४
रविबाबूंच्या छोट्या गोष्टी ... ... ८
रविबाबूंनीं रचिलेलें राष्ट्रगीत ... ... १५
किरण पहिला—पोपटाची कहाणी ... ... १७
,, दुसरा—स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास ... २२
,, तिसरा—महाजनाचें भूत ... ... २७
,, चौथा— एक होता राजा ... ... ३४
,, पांचवा—पत्त्यांचें राज्य ... ... ४५
,, सहावा—ऋणमोचन ... ... ५७
,, सातवा—ऋण ... ... ६५
,, आठवा—प्रत्यावर्तन ... ... ७०
,, नववा—'तुम्हीच आमचे राजे'... ... ८१
,, दहावा—भेट ... ... ९८
,, अकरावा—भारतभूमीची प्रार्थना ... १००
,, बारावा—निराश होऊं नकोस ... ... १०२
,, तेरावा—हिंदुस्थानच्या दैवगतीच्या विधात्या!
तुझा जयजयकार असो! ... १०३

3782

# र वी चे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

आवृ

१

रवींचे उज्ज्वल किरण



डॉ. रवीन्द्रनाथ टागोर

३८३१२
मु. आ.
१०८८
१।८।६१

# डॉ. रवीन्द्रनाथ टागोर

## यांचें संक्षिप्त चरित्र

बंगाल प्रांतीं ठाकुर ( याचाच अपभ्रंश टागोर असा झाला आहे ) घराणें श्रीमंत, खानदानीचें, विद्याव्यासंगी व उदार मताचें म्हणून सुप्रसिद्ध आहे. रविबाबूंचे आजे द्वारकानाथ ठाकुर यांनीं चांगलें द्रव्यार्जन केलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांपाशीं त्यांचें इतकें वजन होतें कीं, ते विलायतेस गेले त्या वेळीं रोमचे ख्रिस्तीधर्माचे मुख्य गुरु पोप, फ्रान्सचे बादशहा लुइ फिलिप, व हिंदुस्थानच्या बादशाहीण व इंग्लंडच्या महाराणी व्हिक्टोरिया यांच्या भेटींचा लाभ व सन्मान त्यांस मिळाला होता, व 'हिंदी राजे' (Indian Prince) या नांवानें युरोपांतले लोक त्यांना ओळखत. त्यांचे चिरंजीव रविबाबूंचे वडील देवेंद्रनाथ टागोर हे अगदीं निराळ्या प्रकारचे गृहस्थ होते. यांची धर्म व वैराग्य यांकडे विशेष प्रवृत्ति होती. वेद, उपनिषदें वगैरे धर्मग्रंथांचें अध्ययन व चिंतन करावें व राजा राममोहन राय यांच्या एकेश्वरी मताचा प्रसार करण्यासाठीं लेख लिहावे व भाषणें करावीं यांत त्यांचा सगळा काळ जात असे. यांची धर्मशील वृत्ति पाहून कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजानें त्यांना ' महर्षि ' ही पदवी दिली होती. आणि खरोखरच त्यांची वृत्ति पूर्वींच्या महर्षींप्रमाणें असे. त्यामुळें सनातन हिंदुधर्मीयांनाहि त्यांच्याविषयीं अत्यंत आदर वाटत असे.

अशा उच्च घराण्यांत रविबाबूंचा जन्म बंगाली शक १२६८ ( इ. स. १८६१ ) या वर्षीं झाला. वडिलांच्या सहवासांत त्यांचें बालपण गेल्यामुळें लहानपणापासूनच त्यांच्या ठायीं धर्मशीलता फार उत्तम प्रकारें बाणली व त्यांच्या घरचा एक वृद्ध चाकर रोज कृत्तिवास-रामायण व महाभारत पाठ-

म्हणे, तो ऐकून त्यांनाहि त्यांतल्या कविता तोंडपाठ झाल्या. नऊ वर्षांचे वयांतच त्यांना कविता करण्याची स्फूर्ति होऊन ते कविता करूं लागले. पुढें वडिलां-बरोबर हिमालय पर्वतावर गेल्यावर निसर्गाचें रमणीय वैभव पाहून त्या स्फूर्तीला अधिक बळकटी आली. वडिलांजवळ त्यांनीं ज्योतिष व संस्कृत व्याकरण यांचें अध्ययन केलें. त्यांचें इंग्रजी भाषेचें शिक्षण मुख्यतः लंडन शहरीं युनिव्हर्सिटी कॉलेजांत झालें. इंग्रजी भाषेंत ते प्रवीण झाले तरी मातृभाषेवरचें ( बंगाली भाषेवरचें ) त्यांचें प्रेम तिळमात्र कमी न होतां उलट तें वाढतच गेलें व अनेक बंगाली मासिकांतून त्यांच्या कविता व लेख येऊं लागले. 'वंगदर्शन' नांवाचें जें उच्च दर्जाचें बंगाली मासिक होतें त्याचे तर ते कांहीं दिवस संपादक होते. रविबाबूंचा कंठ मधुर असून संगीतज्ञान चांगलें असल्यामुळें ते आपली कविता जेव्हां स्वतः गाऊन दाखवितात तेव्हां श्रोत्यांच्या वृत्ति तल्लीन होतात. त्यांचा लेखनव्यासंग फार जबर होता. त्यांनीं कविता, गोष्टी, निबंध, कादंबऱ्या, वगैरे निरनिराळ्या रूपानें बंगाली साहित्याची फार मोठी सेवा केली आहे. १९१३ सालीं जगांतल्या साऱ्या लेखकांना अत्यंत स्पृहणीय वाटणारें 'नोबल प्राईज' नांवाचें पारितोषिक त्यांना मिळालें, पण त्या बक्षिसाची रक्कम ( १ लक्ष २० हजार रुपये ) त्यांनीं बोलपूर येथें नवीन धर्तीचें शिक्षण देणाऱ्या आपल्या शांति-निकेतन विद्यालयाला देऊन टाकिली. १९१४ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीनें त्यांना 'डॉक्टर' ही विद्वत्तेबद्दलची अत्युच्च पदवी दिली. व १९१५ सालीं सरकारकडून त्यांना 'सर' हा किताब मिळाला.

रविबाबू जसे उत्तम कवि व साहित्यसेवक आहेत, तसेच ते श्रेष्ठ प्रतीचे देशभक्त आहेत. १९१९ सालीं पंजाबांत सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून अंगा-वर शहारे आणणारे जे अत्याचार घडले ते ऐकून रविबाबूंच्या जिवाला अतिशय तळमळ लागली व स्वतः त्या प्रांतीं जाऊन बारकाईनें त्या प्रकरणाची चौकशी करावी असा त्यांचा विचार होता. पण सरकारनें त्यांना तेथें जाऊं दिलें नाहीं. त्यावरून त्यांची सात्विक वृत्ति चंचल होऊन त्वेषानें त्यांनीं व्हाइसरॉय साहेबांस सणसणीत पत्र लिहिलें व सरकारनें दिलेला 'सर' हा किताब व त्याबरोबरचा चांद सरकारकडे परत पाठविला.

रविबाबूंनीं युरोपच्या सफरी तीन वेळां केल्या. याशिवाय जपान व अमेरिका येथेंहि ते गेले होते. तेथें जागजागीं विद्वन्मंडळांकडून त्यांचा बहुमान करण्यांत आला. तेथें त्यांनीं जीं भाषणें केलीं तीं विद्वत्ताप्रचुर तर होतीच, पण त्यांतले विशेष गुण म्हणजे स्वाभिमान, स्पष्टवक्तेपणा, आणि मार्मिक दृष्टि हे होते. १९३८ सालीं पुनः ते युरोपांत गेले व बेल्ज्यम्, हॉलंड, फ्रान्स वगैरे देशांतून त्यांचा बहुमान झाला.

त्यांचे वडील बंधु बाबू सत्येंद्रनाथ टागोर हे आय्. सी. एस्. असून सोलापूर, अमदाबाद, सातारा, वगैरे ठिकाणीं डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज होते. त्यांचेकडे रविबाबू कधीं कधीं येऊन राहत, यामुळें मराठी भाषेचेंहि थोडेंसें ज्ञान त्यांना होतें. हल्लींच्या काळीं रविबाबू तरुणांना उत्तम मार्गदर्शक आहेत. असा हा थोर कलावन्त दि. ७ ऑगस्ट १९४१ रोजीं स्वर्गस्थ झाला.

★

# उपोद्घात

करुणामय परमेश्वरानें या जगांत जिकडे तिकडे वैचित्र्याचे पोटीं सौंदर्य भरून ठेविलें आहे, आणि या बाह्यसृष्टींतल्या सौंदर्याचा मनुष्याच्या अंतःस्थित सौंदर्यबोध शक्तीवर परिणाम घडून ती शक्ति जागृत व्हावी व त्यामुळें त्याच्या हृदयांत नानाविध भावतरंगांचें आंदोलन होऊन अखेर ते भाव शद्बाच्या रूपानें म्हणा, चित्राच्या रूपानें म्हणा, किंवा शिल्पाच्या रूपानें म्हणा, प्रकट होऊन त्यांतल्या सौंदर्यसुखाचा अनुभव इतरांस घेण्यास सापडावा अशी त्याची दूर-दृष्टीची योजना दिसते. यांतल्या पहिल्या म्हणजे शब्दरूपानें प्रकट होणाऱ्या गद्यमय किंवा पद्यमय सौंदर्ययुक्त भावालाच काव्य हें नांव शास्त्रज्ञांनीं दिलें आहे. मनुष्याचे मनोभाव सुंदर रीतीनें प्रकट होणें ही काव्यांत मुख्य मुद्याची गोष्ट आहे. काव्य म्हणजे छंदोबद्ध रचना ही सामान्य लोकांची समजूत शास्त्र-सिद्ध नाहीं. छंदोबद्धता नव्हे, तर रसात्मकता हें काव्याचें मुख्य लक्षण आहे. संस्कृत अलंकारशास्त्रज्ञ म्हणतात—

'काव्यस्य शब्दार्थौ शरीरं, रसादिश्चात्मा'।

ही गोष्ट पाश्चात्य साहित्याचार्यांनाहि मान्य आहे, आणि म्हणून त्यांनीं सुप्रसिद्ध वंगकवि डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीच्या गद्यात्मक इंग्रजी भाषांतराला उत्कृष्ट काव्य समजून व नोबल प्राइझ नांवाचें पारितोषिक देऊन रविबाबूंचा बहुमान केला. त्यानंतर रविबाबू अमेरिका, जपान, फ्रान्स, बेलज्यम्, हॉलंड वगैरे ज्या ज्या देशांत गेले, त्या त्या देशांतले विद्वान् रसिक त्यांची वाणी गद्यमय आहे कीं पद्यमय आहे तें न पाहतां तिच्या अंतस्थ सौंदर्यावरच झुलत राहिले होते. अंतस्थ सौंदर्य प्रकट करण्याची जी ही अद्भुत शक्ति तिलाच कविप्रतिभा म्हणतात. रसात्मकता ही अर्थात् काव्य-प्रतिभेच्या कमी अधिक विकासाचें मापक यंत्र म्हटलें पाहिजे. हें यंत्र कवींच्या निरनिराळ्या काळांतल्या काव्यांना लावून साहित्याचार्यांनीं काव्यप्रतिभेच्या विकासाच्या निरनिराळ्या अवस्था निश्चित केल्या आहेत. त्या अशाः—

**प्रथमावस्था**—हींत बाह्य सौंदर्य अथवा शब्द-लालित्य यांच्याकडेसच विशेष लक्ष असतें; अंतःसौंदर्य अथवा भावसौंदर्य प्रकट करण्याचा विशेषसा प्रयत्न केलेला नसतो, अथवा करून तो अयशस्वी ठरलेला असतो. या अवस्थेला हेगेल यानें Age of Orientalism असें नांव दिलें आहे.

**द्वितीयावस्था**—या अवस्थेंत बाह्यसौंदर्य आणि अंतःसौंदर्य, अथवा जड आणि चैतन्य, यांच्यामध्यें द्वंद्व चाललें असतें. दोन्हीहि समबल असतात. याला हेगेलनें Age of Classicism म्हटलें आहे. ही अवस्था प्रथमावस्थेपेक्षां थोडी उच्च दर्जाची असते.

**तृतीयावस्था**—हिच्यांत बाह्यसौंदर्याकडे फारशी दृष्टि नसते. अंतःसौंदर्य यथार्थ रीतीनें व्यक्त करण्यांतच कवीचें खरें चातुर्य दिसतें. या अवस्थेंत चैतन्याचा जडावर पूर्णपणें पगडा बसलेला असतो. याला हेगेलनें Age of Romanticism हें नांव दिलें आहे. पण माझ्या मतें तें नांव अन्वर्थक नाहीं. या अवस्थेला आपण भावप्रकाशाचें युग अथवा नवयुग असें नांव देऊं. ही पायरी वरील दोन्ही पायऱ्यांपेक्षां उच्च व श्रेष्ठ आहे हें सांगावयास नकोच.

प्रथमावस्थेंतल्या कवींच्या कृतींत प्रतिभा अस्फुट-निद्रिस्त-असते. ज्याप्रमाणें मुक्या माणसाला आपले भाव शब्दांनीं व्यक्त करण्याची हौस असते, पण त्या भावाचे तरंग त्याच्या जिव्हेवर आघात करूनच थांबतात, पुढें जाण्याचें सामर्थ्य त्यांचे ठायीं नसतें; त्याप्रमाणें या प्रथमावस्थेंत कवीचे भावतरंग अतिशय दुर्बळ असल्याकारणानें शब्दांच्या दुर्गम अरण्यांतच ते गुरफटलेले राहतात; त्या अरण्यांतून नेटानें वाट काढीत जाण्यास ते असमर्थ असतात. कवीचें लक्ष मुख्यतः शब्दविन्यासाच्या ठाकठीकपणावरच असतें. चैतन्यावर-अंतःसौंदर्यावर-जडाचें ( शब्द हे जडच म्हटले पाहिजेत ) प्रभुत्व झाल्याकारणानें 'गजाननं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्' असा प्रकार होऊन रौद्राला बीभत्साचें, सौंदर्याला अस्वाभाविकतेचें, किंवा भव्यतेला भयंकरपणाचें, असें कांहींचें बाहीच रूप प्राप्त होतें ! कविप्रतिभेच्या विकासाच्या द्वितीयावस्थेंत चैतन्य थोडेंसें व्यक्त झालेलें असतें. पण जड शब्दांनीं झगडून त्यांना आपल्या काबूंत ठेवण्याइतकी शक्ति त्याच्या ठायीं नसते. चैतन्य अथवा भावजागृति आणि जड

शब्द यांचें बळ समसमान असल्याकारणानें कवीच्या कृतींत शब्दांच्या अंतर्पटांतून मधून मधून भाव डोकावतात; पण एकंदरींत शब्दावडंबर घालण्याचा मोह कवीला आवरत नाहीं, व त्यामुळें भाव आंतल्या आंत गुदमरतात. स्त्रीचें स्वाभाविक सौंदर्य तिच्या अंगावरल्या अलंकाराच्या भारानें ज्याप्रमाणें हीनप्रभ होतें, तशी स्थिति या अवस्थेंत कविप्रतिभेची होते. तिसऱ्या अवस्थेंत मात्र कविप्रतिभेची ज्योति पूर्णत्वानें प्रकट होते. या अवस्थेंत शब्दांच्या योजनेकडे विशेषसें लक्ष नसतें. कवीच्या मनांतले भाव अंतःस्फूर्तीनें कारंज्याच्या धारांप्रमाणें जोरानें उडत असतात. शब्द हे कवीच्या अंतःस्थ भावांच्या आधीन होतात. शब्दलालित्याकडे कवीची दृष्टि नसते. भाव व्यक्त करण्यास योग्य असे शब्द कवीला आपोआपच सुचत जातात; आणि सोप्या, साध्या पण स्वभावसुंदर अशा शब्दांच्या रूपानें कवीची प्रतिभा उत्कटत्वानें प्रकट होते. मराठी काव्यांतलीं उदाहरणें घेऊन माझा भावार्थ अधिक स्पष्ट करून देतां येईल. पण त्या योगानें विस्तार होऊन ' मियां मूठभर, दाढी हातभर ' अशी या चिमकुल्या पुस्तकाची अवस्था होईल. अर्थात् तो मोह आवरणें मला भाग आहे. म्हणून मी येथें येवढेंच सांगतों कीं मोरोपंताची ' अनलसमीहित साधी ' ही कविता प्रथमावस्थेचें, वामनपंडिताची ' कव्या वरुनिया उव्या ' ही कविता द्वितीयावस्थेचें, व साधुवर्य तुकाराम महाराज यांचे अभंग किंवा ज्ञानेश्वरी हें तिसरीचें, उदाहरण म्हणून देतां येईल. मराठी गद्यसाहित्यांतही उत्कृष्ट काव्य ज्यास म्हणतां येईल अशीं उदाहरणें कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेंतून व इतर कित्येक लेखकांच्या लेखांतून काढून दाखवितां येतील.

या वर सांगितलेल्या तिन्ही अवस्थांतून कविवर्य रवींद्रनाथ टागोर हे गेले आहेत हें त्यांचीं काव्यें मूळ बंगालींत ज्यांनीं लक्षपूर्वक वाचिलीं आहेत त्यांना सांगावयास नको. देशकालपरिस्थितीप्रमाणें कविप्रतिभा स्वतःला प्रकट करण्याचीं भिन्नभिन्न द्वारें अथवा साधनें शोधून काढीत असते. श्रीतुकाराम महाराजांना किंवा श्रीज्ञानेश्वर महाराजांना त्यांच्या काळच्या परिस्थितीनें अध्यात्मज्ञानाकडे वळावयास लाविलें. रवींद्रबाबूंच्या काळची अर्थात् सांप्रतची परिस्थिति, व कवीला मिळालेलें अंशतः प्राच्य व अंशतः पाश्चात्य अशा मिश्र

संस्कृतीचें शिक्षण, यांनीं त्यांच्या मनांत जशी गीतांजलीसारखें काव्य लिहिण्याची स्फूर्ति उत्पन्न केली, तशीच प्रस्तुतच्या शिक्षणपद्धतींतले दोष, सरकारी पदव्यांचा लोभ, समाजसुधारणेची महति, हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत सुधारणा घडवून आणणारांनीं संकटास न जुमानतां सत्याची व न्यायाची कास धरून नेटानें व धैर्यानें पुढें पाऊल टाकण्याची आवश्यकता इ. विषय गोष्टींच्या व प्रार्थनांच्या द्वारें जनतेच्या मनावर बिंबविण्याची स्फूर्ति त्यांना दिली आहे.विषयांत व साधनांत भिन्नता असली तरी कविप्रतिभेच्या विकासाच्या अंतिम अवस्थेंतच रविबाबू आहेत हें पुढील गोष्टी, स्तोत्रें, व प्रार्थना रहस्योद्ग्राही पद्धतीनें त्यांच्याकडे पाहणाऱ्या रसिक वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

'जें न देखे रवी तें देखे कवी' अशी मराठींत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच आहे कीं, खऱ्या व उच्च प्रतीच्या (तृतीयावस्थेंतल्या) कवींची दृष्टि फार व्यापक व दूरवर पाहणारी असते. सामान्य माणसांची दृष्टि त्यांच्या इतकी व्यापक होऊं पावत नाहीं व भविष्यकाळच्या पडद्याला भेदून पलीकडे जाण्यास ती असमर्थ असते. खऱ्या कवीचें अलौकिक सामर्थ्य येथें दिसतें. लोकांचीं मनें कशीं आकर्षण करावीं, त्यांच्या तमोमय अंतःकरणांत उज्ज्वल प्रकाशाचे किरण पाडून तेथील अंधकार कसा घालवावा, नैराश्याला हद्दपार करून भावि उन्नतीविषयीं उत्साह तेथें कसा स्थापित करावा, असुंदराला सुंदर कसें करावें, राज्यकर्त्यांच्या व जनतेच्या डोळ्यांत चरचरीत अंजन कसें घालावें, वगैरे गोष्टी प्रस्तुतच्या काळीं रविबाबू इतक्या चांगल्या तऱ्हेनें करून दाखविणारे कवि हिंदुस्थानांत तरी निदान फारच विरळा दृष्टीस पडतात. रविबाबूंच्या अंगच्या कविप्रतिभेचें विशेषत्व आहे तें यांतच आहे. त्यांचें गद्य व पद्य सध्यांच्या युगाला अनुरूप–जनतेला खडबडून जागृत करणारें–आहे. त्यांच्या हातांतल्या वीणेच्या झंकारांत कांहीं विशेष प्रकारच्या रागिण्यांचा सूर स्पष्टपणें प्रतीत होत आहे. त्यांच्या गद्यपद्यात्मक लेखांत व त्याचप्रमाणें त्यांच्या भाषणांत परमेश्वराविषयीं अचलनिष्ठा, स्वदेशभक्ति, आत्मतेज, स्वाभिमान, भविष्याच्या उज्ज्वलतेविषयींचा दृढ विश्वास, स्वावलंबन, धैर्य इ. अनेक गुणांचें साहचर्य दिसतें. इतर कवींत व त्यांच्यांत जो भेद आहे तो येथेंच आहे.

# रविबाबूंच्या छोट्या गोष्टी

येथपर्यंत कविप्रतिभेचा विकास कोणत्या क्रमानें होत जातो तें सामान्यतः सांगून त्या क्रमांतल्या कोणत्या अवस्थेंत रविबाबूंच्या कविप्रतिभेला स्थान देतां येतें, व त्या प्रतिभेंत कोणकोणते गुण विशेषतः दृग्गोचर होतात कीं, ज्यांच्या योगानें रविबाबूंचीं काव्यें इतर काव्यांपेक्षां साऱ्या जगाला अधिक मान्य, आदरणीय व प्रिय झालीं आहेत त्याचें विवेचन केलें. काव्य शब्दांत गद्य व पद्य या दोहींचाहि अंतर्भाव होतोच. तेव्हां रविबाबूंच्या छोट्या गोष्टींविषयीं निराळें कांहीं मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाहीं असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे. पण त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, छोट्या गोष्टींच्या रचनेच्या कामीं नुसत्या प्रतिभेनें भागत नाहीं. येथें कलेचेंहि काम पुष्कळच असतें, आणि गोष्टीचें कथानक रचण्याचें चातुर्य, तिच्यांतल्या पात्रांच्या स्वभावांतलें वैशिष्ट्य दाखविण्याची खुबी, इ. गोष्टी केवळ नैसर्गिक प्रतिभेनें लेखकाला प्राप्त होत नसून त्याला जगाचा अनुभव, सूक्ष्म निरीक्षण व लेखनकलेचें ज्ञान यांची प्रतिभे-इतकीच आवश्यकता असते. हे गुण ज्या मानानें लेखकाच्या कृतींत असतील त्या मानानें त्या कृतीचा बराबाईट परिणाम वाचकांच्या मनावर होत असतो. रविबाबूंच्या छोट्या गोष्टींत हे गुण किती पूर्णत्वानें वास करीत आहेत, तें पुढें दिलेल्या त्यांच्या गोष्टी लक्षपूर्वक वाचणारांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. तथापि सामान्य वाचकांकरितां त्या गोष्टींचीं विशिष्ट लक्षणें संक्षेपानें येथें सांगितलीं असतां अधिक सोयीचें होईल असें वाटल्यावरून त्यासंबधानें दोन शब्द येथें लिहिण्याची परवानगी घेत आहें. वस्तुतः पक्वान्नाची रुचि तें पक्वान्न प्रत्यक्ष खाऊन पाहण्यानेंच जशी कळते तशी नुसतें त्या पक्वान्नाचें रसभरित वर्णन वाचण्यानें कळत नसते हा सामान्य नियम येथेंहि लागू पडतो.

रविबाबूंच्या छोटया गोष्टींचें पहिलें व ठळक लक्षण म्हणजे त्या गोष्टींतल्या पात्रांच्या अंतर्यामांत प्रवेश करून तें अंतर्याम उघडून दाखविण्याचें चातुर्य हें होय. त्यांच्या गोष्टींत कथाप्रसंग ( Incidents ) थोडे असतात. गोष्टीला

वैचित्र्य यावें यासाठीं मुद्दाम पुष्कळ विविध प्रसंग कोंबण्याची घातुक प्रवृत्ति त्यांच्या लेखांत दिसत नाहीं. पात्रांच्या अंतर्यामावर प्रकाश पाडण्यासाठीं आवश्यक दिसतील तेवढे प्रसंग ते खुबीनें निवडून योजितात व त्यामुळें त्यांच्या गोष्टी कधीं कंटाळवाण्या होत नाहींत. त्यांच्या गोष्टींत शब्दावडंबर कधीं नसतें. प्रत्येक वाक्य कांहीं विशिष्ट हेतूनें योजिलेलें असतें; आणि नेम मारण्यांत पटाईत अशा एखाद्या शिकाऱ्याची प्रत्येक गोळी जशी इष्ट कार्य केल्याशिवाय राहत नाहीं, त्याप्रमाणें रविबाबूंच्या लेखांतलें प्रत्येक वाक्य अमोघ वज्राप्रमाणें वाचकांच्या मनावर परिणाम केल्याशिवाय राहत नाहीं.

दुसरें लक्षण त्यांची वर्णनशैलीची खुबी हें होय. हीं वर्णनें सहजगत्या व क्रमप्राप्त रीतीनें आलेलीं असतात. जरतारी कापडाचा दुकानदार भारी किंमतीचीं झकझकीत सणगें लोकांच्या डोळ्यांत भरावीं म्हणून दुकानांत त्यांचें जसें प्रदर्शन मांडतो, तसा वर्णनाचे प्रसंग मुद्दाम आणून वाचकांचे अंतश्चक्षु दिपवून टाकण्याचा प्रयत्न रविबाबू कधीं करीत नाहींत. सृष्टीचा आत्मा व मनुष्याचा आत्मा यांच्यांत एक प्रकारची एकतानता कशी आहे हें दाखविण्यापुरतीं वर्णनें ते देत असतात. हीं वर्णनें सुद्धां कै. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतल्याप्रमाणें लांबलचक नसतात; तर सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र यांच्याप्रमाणें अगदीं आवश्यक अशा मोजक्या शब्दांनीं केलेलीं असल्यामुळें वाचणाराला गोष्ट वाचीत असतां मंडूकप्लुति करण्याचें कारण पडत नाहीं. सौंदर्याच्या व कलेच्या दृष्टीनें सुद्धां अशा वर्णनांची योग्यता विशेष आहे हें कला-तत्त्ववेत्त्यांस सांगावयास नकोच.

तिसरें लक्षण प्रखर सत्यप्रीति. त्यांच्या लेखांत नैसर्गिक सत्याचा अतिक्रम केलेला बहुधा दिसावयाचा नाहीं. असंभाव्य गोष्टीला त्यांच्या कृतींत थारा मिळालेला क्वचित् आढळतो. ईश्वराकडून मिळालेल्या अमूल्य तेजस्वी कल्पनाशक्तीचा दुरुपयोग त्यांनीं केव्हांहि केला नाहीं.

चौथें लक्षण सहानुभूति. कवीचें हृदय कोमल असतें. ही कोमलता केव्हां दुःखी पात्रांविषयींच्या सहानुभूतीच्या प्रत्यक्ष उद्गारांच्या रूपानें, तर केव्हां अशा दुःखाचे प्रसंग नाजूक रीतीनें पार पाडण्यांत दिसून येणाऱ्या चतुराईच्या

रूपानें, व्यक्त होत असते. रविबाबूंच्या गोष्टींत ही चतुराई अनेक वेळां दिसून येते. पापी, दुष्ट व अन्यायी माणसांचीं कृत्यें सुद्धां वर्णन करतांना त्यांनीं आत्मसंयमन दाखविलें आहे. मनुष्य कितीहि दुष्ट स्वभावाचा असला तरी त्याच्या स्वभावांतला दैवी अंश अजिबात नष्ट झालेला नसतो. या दैवी अंशाच्या संवर्धनाला अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच त्याच्या वर्तनांत सुधारणा घडून येण्याची आशा असते हें लक्षांत घेऊन अशा पात्रांचें सुद्धां चित्र रंगवितांना कवीनें नेहमीं आखडता हात धरला आहे. मग निरपराधी, साध्या-भोळ्या व निष्कलंक चारित्र्याच्या व्यक्तींवर–विशेषतः स्त्रियांवर–दुर्दैवानें आलेल्या विपत्तीसंबंधानें लिहितांना कवीचें हृदय दया व करुणा यांनीं आर्द्र झालेलें दिसून येतें यांत काय आश्चर्य ?

पण सध्याच्या काळीं सर्वांत अत्यंत महत्त्वाचें असें लक्षण म्हणजे तरुणांच्या वाढत्या आकांक्षा व राष्ट्रीय जीवन यांना पूर्णतेचें स्वरूप प्राप्त होऊन राष्ट्र-मालिकेंत हिंदुस्थानाला उच्च स्थान मिळावें म्हणून सत्प्रवृत्ति व सद्विचार यांचें बीं पेरणें हीं होय. रविबाबूंच्या ज्या प्रार्थना व स्तोत्रें या पुस्तकाच्या शेवटीं दिलीं आहेत त्यांचा सगळा रोख या एका गोष्टीवर असलेला स्पष्ट दिसत आहे.

## या पुस्तकांतील गोष्टींचें रहस्य

या पुस्तकांत रवीचे एकंदर तेरा उज्ज्वल किरण आहेत. पैकीं शेवटचीं तीन राष्ट्रीय स्तोत्रें व प्रार्थना आपण सोडून देऊं. कारण, त्यांचा उद्देश अथवा रहस्य त्या त्या स्तोत्रांतच स्पष्ट रीतीनें सांगितलीं आहेत. बाकीचे दहा किरण गोष्टीच्या रूपाचे आहेत, व त्या प्रत्येक किरणांत कवीनें कांहीं ना कांहीं रहस्य गुंतवून ठेविलें आहे असें ती गोष्ट वाचणारास वाटल्यावांचून रहात नाहीं. तें रहस्य काय आहे तें कळल्यावर गोष्टींच्या वाचनापासून होणारा आनंद अनेक पटीनें

वाढतो. हें रहस्य स्वतः कवीनेंच सांगितलें असतें तर विशेष मौज झाली असती यांत शंका नाहीं. पण तसें करण्याची त्यांची इच्छा दिसत नाहीं; इतकेंच नाहीं, तर कोणीं कोणी टीकाकारांनीं आपापल्या तर्कशक्त्यनुसार रहस्य शोधून काढण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांस उद्देशून रविबाबूंनीं थोडे दिवसांपूर्वी असे उद्गार काढले होते कीं टीकाकारांचे हे प्रयत्न व्यर्थ आहेत. गोष्टी लिहिणारा खरा कारागीर असला तर तो मनांत कांहीं विशिष्ट उद्देश धरून लिहिण्यास बसत नाहीं. त्याच्या अंतःकरणांत त्यावेळीं ज्या विचारांची ऊर्मी उठते ते विचार रूपकाच्या अगर अन्य द्वारें प्रकट करण्याची अंतःस्फूर्ति त्याच्यानें दावून ठेववत नाहीं. त्यापासून जनतेनें अमका बोध घ्यावा, किंवा ते विचार जनतेस पसंत पडून त्यांनीं त्याचा स्वीकार करावा ही कल्पना सुद्धां त्याच्यापासून दूर असते. तो स्वतःच्या मनावरलें विचारांचें दडपण काढून मनावरचा भार हलका करण्यासाठींच लिहीत असतो. ज्याप्रमाणें हरिणाला स्वतःला आपल्या अंगावर ठिपके ठिपके कां आहेत त्याचें कारण कळत नसतें, पण प्राणिशास्त्रावर ग्रंथ लिहिणारे तज्ज्ञ आपल्या तर्काच्या जोरावर संभवनीय व खरें दिसेल असें कांहीं तरी कारण सांगतात ( वस्तुतः त्या कारणाचें ज्ञान त्या हरिणाला तिळमात्र नसतें ), तसाच कांहींसा प्रकार या संबंधानें आहे. रविबाबूंनीं आपल्या गोष्टी विशिष्ट हेतु मनांत योजून लिहिल्या नाहींत हें त्यांच्या वरील उद्गारांवरून आपण गृहीत धरलेंच पाहिजे. तथापि या गोष्टी लिहीत असतां कवीच्या अंतः-करणाची स्थिति कशी असली पाहिजे, कोणत्या विचारांचे तरंग त्यांच्या मनावर त्या वेळीं प्रभुत्व गाजवीत असले पाहिजेत, व ते विचार गोष्टींच्या, रूपकांच्या किंवा स्तोत्रें वगैरेंच्या रूपानें जनतेपुढें आल्यावर जनतेच्या मनावर त्यांचा कोणता परिणाम घडणें संभवनीय आहे येवढें तरी मार्मिक वाचकांस ओळखता आल्यावांचून रहावयाचें नाहीं. या पुस्तकांत दिलेल्या कित्येक गोष्टींवरून आपण अव्यंग, सर्व दोषविवर्जित व सर्वगुणसंपन्न अशा जगांत राहत नाहीं, मनुष्याच्या स्वभावांत, वर्तनांत, राज्यकारभाराच्या पद्धतींत, सामाजिक चालीरीतींत, धर्मविषयक समजुतींत, सर्वच गोष्टींत थोडे फार दोष आहेत व आपणांस उन्नति हवी असेल तर ते शक्य तितक्या जलदीनें काढावयास पाहिजेत हें दिसून येईल. सारांश, प्रस्तुत पुस्तक म्हणजे आपल्या राष्ट्राच्या

२८५९२
ग्रा. वा.
१४८४

शुद्धीकरणासाठीं तयार केलेली शर्करावगुंठित औषधी गोळीच आहे. इतकें सांगून आतां प्रत्येक गोष्टीचें रहस्य क्रमशः थोडक्यांत सांगतों.

**१ पोपटाची कहाणी**—या गोष्टींत प्रस्तुतच्या सरकारी व निमसरकारी शाळांतली शिक्षणपद्धति व शिक्षणप्रचारासंबंधानें सरकारचें एकंदर धोरण यांच्यावर कटाक्ष आहे. शिक्षणप्रसारार्थ होणाऱ्या खर्चाचा बराचसा भाग शाळेसाठीं भव्य व सुंदर इमारती आणि वरवरच्या अधिकाऱ्यांचे पगार यांत कसा खर्च होतो, शिक्षणक्रमांत बरेचसे विषय कोंबून भरल्यामुळें विद्यार्थ्यांच्या पचनीं तें शिक्षण न पडतां त्यांना परीक्षा पास होण्यासाठीं रक्ताचें पाणी करून कशी घोकंपट्टी करावी लागते, व त्यामुळें आमचे तरुण कसे अल्पायु होतात, हा सगळा प्रकार आपल्या शहाण्या सरकारच्या लक्षांत कसा येत नाहीं व तो कोणीं आणिल्यास त्याच्या प्रतिबंधार्थ भलतेच उपाय कसे योजण्यांत येतात, तें या गोष्टीच्या रूपानें फार उत्तम प्रकारें व चटकदार रीतीनें थोडक्यांत दाखविलें आहे.

**२ स्वातंत्र्य-प्राप्तीचा इतिहास**—यांत हें दाखविलें आहे कीं, स्वातंत्र्य हा प्रत्येक मनुष्यप्राण्याचा जन्मसिद्ध हक्क असतां बळवान् व युक्तिबाज राष्ट्रें लहान लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार करतांना आढळतात व जगांत लोभी व आपमतलबी अशी आपली दुष्कीर्ति होऊं नये म्हणून वरच्या दपटशामुळें जरी जित राष्ट्राला थोडें फार स्वातंत्र्य देण्यांत आलें, तरी तें अशा रीतीनें देण्यांत येतें कीं, त्या योगानें त्या जित राष्ट्राच्या ठायीं स्वातंत्र्योपभोगाची पात्रताच नाहीं असें वरिष्ठांना दिसून यावें व दुर्दैवानें त्या राष्ट्राला स्वातंत्र्याला कायमचें मुकावें लागावें.

**३ महाजनाचें भूत**—अज्ञ लोकांच्या वेडगळ समजुतीमुळें ते वस्तुतः भीतीचें कांहीं कारण नसतां स्वतःपुढें कशीं काल्पनिक भयें उत्पन्न करून ठेवतात, व यामुळें समाज स्वतःच्या हातानें स्वतःच्या प्रगतीच्या मार्गांत न कळत कशा अडचणी उत्पन्न करून ठेवीत असतो त्यावर या गोष्टीचा कटाक्ष आहे, आणि ‘ जो निर्भय तो विजयी ’ या तत्त्वाची सत्यता या गोष्टींत दाखविली आहे.

४ **' एक होता राजा '**—या गोष्टींत मुलांचा स्वभाव फार खुबीदार रीतीनें दाखविला आहे. मुलें मूळचीं निष्कपट व साधीं भोळीं असतां परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें त्यांना दुसऱ्यांना फसवून आपली सुटका करून घेण्यासाठीं कशा युक्त्या कराव्या लागतात; मुलांच्या अंगीं नैसर्गिक कल्पनाशक्ति, चौकसपणा व श्रद्धा हे गुण कसे उत्कटत्वानें असतात, पण चुकीच्या शिक्षणपद्धतीमुळें या गुणांची अखेर कशी माती होते, त्यांचें चित्र या गोष्टींत पाहण्यास मिळेल.

५ **पत्त्यांचें राज्य**—यांत समाजापुढें संकुचित आदर्श ठेविल्यापासून लोकांच्या अंगीं भित्रेपणा, अल्पसंतुष्टता, धाडसाचा अभाव इ० दुर्गुण कसे जडतात व त्यापासून त्या समाजाची कशी दुर्गति होते हें दाखवून अधिक विस्तृत व व्यापक दृष्टीचे आदर्श त्यांच्यापुढें मांडण्याची आवश्यकता प्रस्थापित केलेली आहे.

६ । ७ **ऋणमोचन व ऋण**—या दोन गोष्टींचें रहस्य शोधून काढणें हें काम फार कठीण आहे. मनुष्याच्या अंतःकरणांतल्या सूक्ष्म वृत्ति कशा क्षणोक्षणीं पालटतात त्याचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न कवीनें केलेला दिसतो; पण निश्चितपणें सांगतां येत नाहीं.

८ **प्रत्यावर्तन**—या गोष्टींत असंभवनीय असा प्रकार बराच आहे. तथापि कोंवळ्या मनाच्या मनुष्याच्या हातून एखादे वेळीं चूक घडली असतां त्याचें मन त्याला किती दीर्घकाळपर्यंत खात राहतें व त्या चुकीमुळें दुसऱ्याची झालेली हानि भरून काढण्यासाठीं तो केवढा स्वार्थत्याग करण्यास वेळेस तयार होतो हें दाखविणारी ही गोष्ट आहे.

९ **' तुम्हीच आमचे राजे '**—ही गोष्ट पूर्वीच्या असहकारितेच्या चर्चेच्या काळांत विशेष बोधप्रद होण्यासारखी होती. पोकळ पदव्यांच्या लोभानें स्वाभिमानशून्य असे कित्येक लोक साहेबांच्या पुढें कसे नाचतात; देशी आचारविचारांना रजा देऊन पाश्चात्यांचें अंधानुकरण कसे करतात; व अशा लोकांना तुच्छ समजून युरोपियन त्यांच्याशीं कसें तिरस्कारयुक्त वर्तन ठेवीत

असतो हें या गोष्टींत उत्तम प्रकारें दार्खविलें आहे. या गोष्टींत बराच विनोद भरलेला आहे. अशा विनोदप्रचुर गोष्टींचा माणसाच्या मनावर जेवढा परिणाम घडतो तेवढा गंभीर रीतीनें लिहिलेल्या शेंकडों निबंधांनीं किंवा केलेल्या भाषणांनीं घडत नाहीं याविषयीं कोणाचें भिन्न मत होईल असें वाटत नाहीं.

१० भेट—या लहानशा गोष्टींत एक महत्त्वाचें तत्त्व गोविलें आहे असें मला वाटतें. तें तत्त्व हें कीं, गत गोष्टींबद्दल शोक करीत बसल्यानें मनुष्याचें शरीर क्षीण होऊन त्याला अकालीं वार्धक्य येतें व त्याचें मनहि दुर्बल होतें. पण मागच्या गोष्टी विसरून भविष्यकाल परमेश्वरकृपेनें उज्ज्वल होणार आहे अशी श्रद्धा ठेविल्यानें मनाला शांति प्राप्त होते, व तरुणपणांतल्याप्रमाणें नवा उत्साह अंगांत संचरतो. मनुष्य पुष्कळ वेळां हें तत्त्व विसरतो म्हणून रविबाबूंनीं तें या संवादाच्या रूपानें दिलें असावें.

याप्रमाणें रविबाबूंच्या प्रत्येक गोष्टींत कांहींना कांहीं गूढ रहस्य न कळत गोविलें गेलें आहे; आणि तें समजलें म्हणजे आनंद व बोध यांचा लाभ होऊन तो लाभ इतर बंधुभगिनींस करून देण्याचीहि साहजिकच स्फूर्ति होते. प्रस्तुत पुस्तक लिहिण्यास अशीच स्फूर्ति कारण झाली आहे इतकें सांगून लेखणी खालीं ठेवितों.

# रविबाबूंनीं रचिलेलें

# राष्ट्रगीत

☆

जन-गण-मन अधिनायक जय हे भारत भाग्यविधाता ॥
पंजाब सिंध गुजरात मराठा द्राविड उत्कल वंग
विंध्य हिमाचल यमुना गंगा उच्छल जलधि तरंग
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे, गाहे तव जयगाथा !
जनगण-मंगल-दायक जय हे भारत भाग्य-विधाता १

जय हे, जय हे, जय हे जय, जय, जय, जय हे !
अहरह तव आव्हान प्रचारित सुनि तव उदार वाणी
हिंदु बौद्ध सिख जैन पारासिक मुसलमान ख्रिस्तानी
पूरव पश्चिम आसे, तव सिंहासन पासे, प्रेमहार होय गाँथा
जनगण-ऐक्य-विधायक जय हे भारत भाग्य-विधाता २

जय हे, जय हे, जय हे, जय जय जय, जय हे
पतन-अभ्युदय-बंधुर पंथा युगयुग धावित यात्री
हे चिर-सारथी तव रथ-चक्रे मुखरित पथ दिन-रात्री
दारुण विप्लव माझे, तव शंखध्वनि बाजे, संकट-दुःख-त्राता.
जनगण-पथ-परिचायक जय हे भारत-भाग्य-विधाता ३

जय हे, जय हे, जय हे, जय जय जय, जय हे.
घोर-तिमिर-घन-निबिड-निशीथे पीडित-मूर्छित, देशे
जाग्रत छिल तव अविचल मंगल नतनयने अनिमेषे
दुःस्वप्ने आतंके, रक्षा करिले अंके, स्नेहमयी तुमि माता
जनगण-दुःख-त्रायक जय हे भारत भाग्य-विधाता ४

जय हे, जय हे, जय हे, जय जय जय, जय हे.
रात्रि प्रभातिल उदिल रवि-च्छवि पूर्व-उदयगिरि-भाले
गाहे विहंगम पुण्य समीरण नवजीवन रस ढाले
तव करुणारुण रागे, निद्रित भारत जागे, तव चरणे नत माथा
जय जय जय हे, जय राजेश्वर भारत-भाग्य-विधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे. ५

# रवीचे उज्ज्वल किरण

## किरण पहिला

### पोपटाची कहाणी

— १ —

एक होता पोपट. तो होता मूर्ख. तो गाणें म्हणे; शास्त्रें शिकेना. हंसे; उडे; रीतभात कशी ती त्याला ठाऊक नव्हती.

राजा म्हणाला, ‘ असा पक्षी घेऊन काय करायचें आहे? हा बगीच्यांतलीं फळें खाऊन खाऊन बाजारांत तीं महाग मात्र करून ठेवील. म्हणून प्रधानजी, याला शिक्षण द्या. ’

— २ —

राजाचे भाचे वगैरे जे नातलग होते त्यांच्याकडे शिक्षण देण्याचें काम आलें. कसें शिक्षण द्यावें याचा त्यांना विचार पडला. चार पंडित जमले. विचार करतां करतां हा मुद्दा निघाला कीं, ‘ पक्ष्याच्या अज्ञानाचें कारण काय ? ’

सर्वांच्या मतें असा सिद्धांत ठरला कीं, पक्षी झाडपाला आणून त्याचें घरटें बांधतो. त्यामुळें त्या घरट्यांत विद्या राहत नाहीं. म्हणून अगोदर चांगला मजबूत सोन्याचा पिंजरा करवावा. अशी सल्ला देऊन व दक्षिणा कनवटीला लावून पंडित आनंदानें निघून गेले.

— ३ —

सोनार सोन्याचा पिंजरा घडवायला बसले. पिंजरा इतका छानदार झाला कीं तो पाहण्यासाठीं देशोदेशचे लोक उत्सुकतेनें येऊं लागले. कोणी म्हणूं लागले कीं शिक्षणाची चांगली तजवीज झाली आहे; कोणी म्हणाले, ' शिक्षण होवो न होवो, पिंजरा तर या निमित्तानें झाला ! पोपटाच्या नशिबी काय आहे कोणास ठाऊक ! '

सोनारांना भरपूर मजुरी मिळाली. ती घेऊन ते आनंदानें घरीं गेले.

पंडित बसले पोपटाला विद्या शिकवायला, तपकिरीची चिमूट नाकांत सोडून ते म्हणाले, ' थोडेसे ग्रंथ पढवून काम भागावयाचें नाहीं. '

ग्रंथाच्या नकला तयार करायला नकलनवीस बसले. त्यांनीं नकलांचा पर्वतप्राय ढीग घातला. त्यांनाहि यथेच्छ पैसे मिळाले.

मोठा खर्च करून तयार केलेल्या सोन्याच्या पिंजऱ्याविषयींची खबरदारी पूर्णपणें घेण्यांत येत होती. तो रोज धुऊन, पुसून लख्ख ठेवण्यांत येत असे. तें पाहून सगळे जण म्हणूं लागले, ' आतां पोपटाची उन्नति ठीक होत आहे. '

या पोपटाच्या शिक्षणामुळें अनेकांना काम मिळालें. कोणाचे मामा, कोणाचे काका, त्यांच्या काकाच्या आतेभावाच्या मावसभावाचे भाचे अशा कित्येक लोकांना कामें मिळून गादीवर लोळायास सांपडलें.

— ४ —

या जगांत बाकीच्या सर्व गोष्टींची वाण आहे. नाहीं वाण काय ती निंदकांची. ते म्हणूं लागले, ' पिंजऱ्याकडे खूप लक्ष आहे. त्याची उन्नति आहे खरी. पण पोपटाचें काय ? '

ही टीका जातां जातां राजाचे कानीं गेली. त्यानें त्या कामावरच्या

अधिकाऱ्याला बोलावून विचारलें, ' या टीकेविषयीं तुमचें काय म्हणणें आहे ? '

अधिकारी म्हणाला, ' महाराज, आपणास खरा प्रकार समजून घ्यायचा असला तर सोनारांना बोलवावें; पंडितांना, नकलनविसांना, कारकुनांना, नोकरचाकरांना बोलवावें; टीकाकारांना चरायला मिळत नाहीं, म्हणून त्यांची जीभ हवीतशी वळवळते; दुसरें काय ? '

हें उत्तर ऐकून राजा खूष झाला. अधिकाऱ्यालाही सोन्यामोत्याची कंठी इनाम मिळाली.

— ५ —

पोपटाचें शिक्षण कसें काय झपाट्यानें चाललें आहे तें एकदा स्वतः पहावें अशी राजाला इच्छा झाली. म्हणून एके दिवशीं राजाची स्वारी आपल्या परिवारासह पोपटाच्या शाळेंत गेली.



शाळेच्या इमारतीच्या देवडीपाशीं शंख, घंटा, वाजंत्री, चौघडा, नगारा, मृदंग, करताल वगैरे वाद्यें वाजत होतीं. ब्राह्मणपंडित कपाळीं

भस्माचे पट्टे ओढून शेंडीला, मानेला व हातांना हिसके देत देत वेद-मंत्रांचा पाठ करीत होते. मिस्त्री, मजूर, सोनार, लेखक, नकलनवीस, कामदार, नायक, खजिनदार, चिटणीस, सगळे चांगले पोषाख करून राजाला मुजरा करण्यासाठीं उत्सुकतेनें उभे होते.

सगळी व्यवस्था पाहून राजाची स्वारी खूष झाली, आणि हत्तीवर आरूढ होऊन परत जाण्यास निघाली. इतक्यांत एक निंदक झाडाच्या आडून म्हणाला, ' सगळें झालें. पण पोपटाला पाहिलें काय ? '

ते शब्द ऐकून राजा मनांत चरकला, आणि म्हणाला, ' खरेंच ! तें तर राहिलेंच ! '

राजा परत पंडितांकडे गेला आणि म्हणाला, ' पोपटाला तुम्हीं काय काय शिकविलें तें सांगा. '

पंडितांनीं सांगितलें तें ऐकून राजा खूष झाला. शिकविलेल्या विषयांची नुसती यादी पोपटाच्या अंगाहून मोठी होती. ग्रंथांच्या ढिगांत तर त्या बिचाऱ्या पक्ष्याचा पत्ताहि लागला नसता. व्यवस्था सगळी ठीक आहे, कोठें कांहीं उणें नाहीं, हें पाहून राजाचें मन प्रसन्न झालें. पण पिंजऱ्यांत एक दाणा किंवा पाण्याचा थेंब असेल तर शपथ ! पोथ्यांचे मात्र ढीगचे ढीग पडले होते ! त्यांतून पानें काढून लेखणीच्या अग्रानें पोपटाच्या तोंडांत तीं अशीं खच्चून ठासलीं होतीं कीं तोंडांतून गायनाचा सूर काढणें तर दूरच पण नुसतें ओरडण्याची सुद्धां मुष्कील ! पोपटाची ती स्थिति पाहणाराचे अंगावर रोमांचच उभे राहत.

राजा परत जाण्यास निघाला. जातांना कानांतला मळ काढणाऱ्यास त्यानें बजाविलें कीं अशा उत्तम शाळेची निंदा करणाराच्या कानांतला मळ काढून त्याचे कान चांगले साफ कर.

— ६ —

इकडे पोपट बिचारा दिवसेंदिवस मृत्युपंथाला लागला. त्याचे पालक म्हणूं लागले, ' वाः ! स्थिति चांगली आशाजनक आहे.' सकाळीं प्रकाशाच्या दिशेनें जाण्याकडे पक्ष्यांची स्वाभाविक प्रवृत्ति ( अथवा स्वभावदोष म्हणा ) असते. त्या दिशेनें त्याला जाऊं देईनात, दुसरीचकडे जायला लावीत. तेव्हां पोपट पंख फडफडवी, कधीं कधीं तर रागानें पिंचऱ्याचे गज चोंचीत धरून तो ते चावायला पाही.

असा प्रकार दिसला म्हणजे कोतवाल म्हणे, ' काय हें उर्मटपणाचें वर्तन !—'

दुसरे दिवशीं भट्टी, हातोडी, व विस्तव घेऊन लोहार आपला हजर ! मारे जोराजोरानें हातोडीचे घाव ऐरणीवर पडत आहेत आणि सांखळी तयार होत आहे ! ती तयार झाली, आणि पोपटाच्या पायांत पडली. त्याचे पंखहि कापले गेले.

राजाचे अधिकारी गंभीर चर्या करून म्हणूं लागले, ' या राज्यांत पक्ष्याला अक्कल नाहीं ती नाहींच पण कृतज्ञताबुद्धिहि नाहीं ! '

तेव्हां पंडित एका हातांत कमल व दुसऱ्या हातांत तीक्ष्ण अग्राची सळई घेऊन ज्याला शिक्षण म्हणतात तें देऊं लागले.

लोहाराला बक्षीस मिळालें; कोतवालाच्या हुषारीबद्दल त्यालाहि राजाकडून शिरपेंच इनाम मिळाला.

— ७ —

पोपट मेला. मरतांनासुद्धां त्याला तोंडांतून शब्द काढतां आला नाहीं. दुष्ट निंदकांनीं पोपट मेल्याची खबर सगळीकडे पसरविली. राजाच्या कानीं ती गेली. तेव्हां राजानें अधिकाऱ्याला विचारलें, ' कसें काय चाललें आहे ? ' अधिकारी म्हणाला, ' शिक्षणक्रम पुरा झाला आहे. '

**राजा**—तो कसा काय ? आतां तो पुन: पळून जाईल काय ?

**अधि०**—रामाचें नांव !

**राजा**—उडेल काय ?

**अधि०**—छे: ! नांव कशाला पाहिजे ?

**राजा**—गाणें तरी म्हणेल काय ?

**अधि०**—बिलकुल नाहीं.

**राजा**--दाणापाणी न मिळालें तर ओरडेल काय ?

**अधि०**—अगदीं नाहीं.

**राजा**—आणा, त्याला एकवार पाहूं द्या.

पोपटाला आणिलें. बरोबर कोतवालसाहेबहि आले. शिपाई घोडेस्वार बरोबर होतेच. राजानें पोपटाच्या अंगावर टिचकी मारली. पण त्यानें हूं का चूं कांहीं केलें नाहीं. फक्त त्याच्या पोटांत पोथीची पानें भरलीं होतीं त्यांचा खस्खस् गज्गज् असा आवाज झाला.

बाहेर नुकत्या लागलेल्या वसंतऋतूंतल्या शीतल मंद हवेनें हलणाऱ्या कमळांच्या दीर्घनिश्वासानें सगळें वातावरण भरून गेलें होतें.

# किरण दुसरा

## स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास

ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण करण्याचें काम संपविलें. त्याच्या सुटीची घंटा वाजली. इतक्यांत त्याच्या डोक्यांत एक विचार आला.

त्यानें कोशाध्यक्षाला बोलावून म्हटलें, ' कोशाध्यक्ष, आपल्या कारखान्यांतून पंच महाभूतें आणा पाहू ! मला आणखी एक प्राणी निर्माण करावयाचा आहे. '

कोशाध्यक्ष हात जोडून म्हणाला, ‘ पितामह, आपण मोठ्या उत्साहानें हत्ती, देवमासा, अजगर, सिंह, वाघ, वगैरे अजस्र प्राणी घडवितांना सामान किती खर्च होईल याचा विचार केला नाहीं. उंच उंच जातीचीं व बळवान महाभूतें या कामीं समळी खलास झालीं. पृथ्वी, आप, तेज वगैरेंपैकीं आतां फारच थोडी शिल्लक आहेत. वायु, व आकाश हीं आहेत पाहिजेत तितकी. ’

चतुर्मुख ब्रह्मदेवानें क्षणभर विचार करून आणि दाढींतून हाताचीं बोटें फिरवून म्हटलें, ‘ बरें तर, शिल्लक असतील तीच आण , जा. ’

या खेपेस ब्रह्मदेवानें पृथ्वी, आप् व तेज हीं फारच हात राखून खर्च केलीं. या नव्या प्राण्याला शिंगें व नखें तर मुळींच दिलीं नाहींत. दांत दिले, पण ते इतके दुर्बल कीं त्यांनीं चावतां यावें पण तोडतां येऊं नये. तेजापैकीं कांहीं थोडासा भाग खर्च केला, त्यामुळें तो प्राणी रणक्षेत्रावर थोडा फार उपयोगीं पडण्यासारखा झाला. पण त्याला लढण्याची हौस मुळींच राहिली नाहीं. या प्राण्याला नांव मिळालें घोडा. अंडें घालीत नाहीं; तरी पण लोकांमध्यें उगीच आपली समजूत प्रचलित झाली कीं तो अंडें घालतो. म्हणून त्याला द्विजवर्गांत मोडूं लागले.

काय कारण असेल तें असो, पण ब्रह्मदेवानें या प्राण्याच्या अंगाची रचना करतांना त्यांत वायु आणि आकाश हीं दोन तत्त्वें मात्र ठासून भरलीं. त्याचा परिणाम असा झाला कीं त्याचें मन सदासर्वदा मोकळें सुटण्याकडे गेलें, आणि अपार असें जें आकाश तें ओलांडून पलीकडे जाण्याची प्रतिज्ञा तो करून बसला. बाकीचे प्राणी धावण्याचें कारण असेल तेव्हांच धावतात; पण हा आपला कारण नसलें तरी धावत सुटतो ! जणूं काय स्वतःपासून जातां येईल तितकें दूर जाण्यांतच त्याला मौज वाटते ! त्याला कोणाजवळून कांहीं लुबाडून घ्यायचें

नसतें, कोणाला मारावें हेंहि त्याच्या मनांत नसतें; कांहीं नाहीं. केवळ पळण्यांतच त्याला मौज वाटते! पळतां पळतां दम लागला, अंग घामाघूम झालें, तोंडाशीं फेस आला, तरी पतकरलें. पण सर्वांच्या पार होऊन जाऊं द्या असें त्याला होतें. ज्ञानी म्हणतात कीं पंच महातत्त्वांतलीं वायु व आकाश हीं तत्त्वें पृथ्वी, आप व तेज या तत्त्वांना सोडून दूर जातात तेव्हां असा प्रकार घडतो.

या प्राण्याला पाहून ब्रह्मदेव फार खूष झाले. त्यांनीं बाकीच्या प्राण्यांना राहण्यासाठीं कोणाला वन दिलें, कोणाला गुहा व दऱ्या दिल्या; पण या प्राण्याला पळण्याची हौस आहे हें पाहून त्याला त्यासाठीं खुलें मैदान दिलें.

मैदानाच्या आजूबाजूला माणसें असतात. तीं सगळा दिवस मेहनत करून गवताचा वगैरे मोठा भारा तयार करतात; तेव्हां घोड्याला मैदानांत मोकळेपणानें संचार करतांना पाहून त्यांना वाटतें कीं, जर कांहीं युक्तीनें त्याला बांधून ठेवतां येईल तर बाजारच्या वगैरे खेपा करण्याचें आपलें काम बरेंच सोपें होईल.

त्यांनीं एके दिवशीं दोरीचा फांस टाकून घोड्याला धरलें, त्याच्या पाठीवर जीन घातलें, आणि तोंडांत दिला कांट्यांचा लगाम, मानेवर बसला चाबूक आणि कुशींत बसल्या जोड्याच्या टांचा.

मैदानांत त्याला मोकळें सोडलें तर हातचा निसटून जाईल म्हणून मैदानाला चारी बाजूंनीं घातलें तारेचें कुंपण. वाघाला वनाची मिरास मिळालेली त्याच्याचकडे राहिली. सिंहाला गुहा दिली होती ती कोणीं काढून घेतली नाहीं. पण घोड्याला दिलेलें खुलें मैदान जाऊन त्याच्या नशिबीं तबेल्यांत राहणें आलें. वायु आणि आकाश यांनीं त्याच्या मुक्ततेसाठीं पुष्कळ उठावणी केली, पण बंधनांतून त्याची मुक्तता त्यांच्यानें करवली नाहीं.

घोड्याला त्याचें पारतंत्र्य जेव्हां असह्य झालें, तेव्हां तो भिंतीवर ताडताड टापा हाणूं लागला. पण त्यानें त्याच्या पायाला मात्र जखमा झाल्या; भिंतीचें विशेषसें नुकसान झालें नाहीं. इतकेंच झालें कीं, भिंतीवरचा चुन्याचा गिलावा निघून तिच्या सौंदर्यांत वैगुण्य आलें. घोड्याचें हें वर्तन पाहून मनुष्याला फार राग आला. तो म्हणाला, ' किती कृतघ्न प्राणी आहे हा ! याला आयती चंदी मिळते, चारा खायाला मिळतो, पाणी मिळतें, याची नीट बरदास्त ठेवण्यासाठीं चांगला पगार देऊन सईस ठेविला आहे, तरी याच्या मनास येत नाहीं ! '

मग त्याच्या मनाची अनुकूलता करून घेण्यासाठीं सईसानें उठल्या बसल्या यष्टिप्रयोग सुरू केला. तेव्हां मग त्यानें लाथा झाडण्याचें सोडलें. तेव्हां मनुष्य खूष झाला. आणि शेजाऱ्यापाजाऱ्यापाशीं घोड्याची तारीफ करून म्हणाला कीं, ' आमच्या घोड्यासारखा इमानदार घोडा साऱ्या दुनियेंत आढळावयाचा नाहीं ! '

तेव्हां शेजारीपाजारीहि तारीफ करून म्हणूं लागले, ' खरेंच ! किती गरीब व शांतवृत्तीचा हा घोडा ! जसा तुमचा धर्म थंड तसाच घोडाहि थंड ! '

घोड्याला अगोदरच चावण्यासारखे तीक्ष्ण दांत नाहींत. नखें नाहींत, शिंगें नाहीं; आणि त्यांत पुन: भिंतीवर किंवा तिच्या अभावीं शून्य स्थळावर लाथा झाडण्याचेंहि बंद झालें. पण मनांतली जळफळ कशीतरी बाहेर काढून टाकायला हवी, म्हणून तो वर मान करून जोरानें खिंकाळायला लागला. त्यानें माणसाची झोपमोड होऊं लागली, आणि शेजारपाजारचे लोकहि त्याचें तें खिंकाळणें मोठ्या भक्तिभावानें ऐकण्याचा कंटाळा करूं लागले. तेव्हां घोड्याचें तोंड बंद करण्याच्या एकेक युक्त्या निघूं लागल्या. पण तोंड बंद केल्यावर श्वास बंद होईल याचा काय विचार ? तोंडाला यंत्र लावून तें बंद केलें तरी

दाबून धरलेला आवाज मरणोन्मुख झालेल्या माणसाच्या शब्दाप्रमाणें क्षीण कां होईना पण मधून मधून बाहेर पडतच होता.

एके दिवशीं तो आवाज ब्रह्मदेवाच्या कानीं गेला. त्यांनीं आपली समाधि उतरून एकदां या मृत्युलोकींच्या खुल्या मैदानाकडे नजर फेंकिली. पाहातात तों तेथें घोडा नाहीं.

तेव्हां त्यांनीं यमधर्माला बोलावून म्हटलें, 'वा:! तुम्ही सर्वांचे काळ खरे आहांत बुवा! आमचा घोडाहि तुम्हीं नेला!'

यमधर्म म्हणाला, 'पितामह! वहीम घ्यायला मीच आज तुम्हांला सांपडलों आं? एकदां माणसाच्या घराकडे नजर फेकून पहा बरें!'

ब्रह्मदेवांनीं मग माणसाच्या वस्तीकडे पाहिलें. तेव्हां छोटीशी जागा, तिच्या भोंवतीं कुंपण घातलेलें, आणि आंत घोडा क्षीणस्वरानें ओरडत आहे असें त्यांना दिसलें.

तो प्रकार पाहून ब्रह्मदेवाच्या वृत्तींत खळबळ उडाली. ते मनुष्याला म्हणाले, 'तूं या प्राण्याला सोडून न दिलेंस तर याला वाघासारखीं नखें व दांत देईन व हा तुझ्या कांहीं कामीं पडणार नाहीं.'


मनुष्य म्हणाला, 'प्रभो! छिः छिः! हा काय भलताच विचार! त्यानें तर हिंस्रतेला सगळें जग मोकळें करून दिल्यासारखें होईल. प्रभो! आपण कांहींहि म्हणा, पण हा प्राणी स्वतंत्रता उपभोगण्यास लायक नाहीं. मी जो येवढा खर्च करून याच्याकरितां तबेला बांधिला आहे तो याच्या हितासाठींच आहे.'

पण ब्रह्मदेव आपला हट्ट धरून बसले. ते म्हणाले, कांहींहि असो; तूं याची मुक्तता केलीच पाहिजे.'

मनुष्य म्हणाला, 'ठीक आहे. सोडून देतों तर. पण या गोष्टीला सात दिवसांची मुदत द्यावी. या मुदतीनंतर आपल्या खुल्या मैदाना-

पेक्षां माझा तबेला याच्या खरोखर अधिक हिताचा नाहीं असें आपणांस वाटलें तर आपण म्हणाल ती गोष्ट मी खुषीनें ऐकेन.'

मग माणसानें काय केलें ? घोड्याला दिलें मैदानांत सोडून. पण तसें करतांना घोड्याचे पुढचे दोन्ही पाय दोरीनें बांधिले. त्यामुळें घोड्याला नीट चालतां येईना. जसे बेडूक टुणकन् उडी मारतात तशा बेढब चालीनें तो चालूं लागला.



ब्रह्मदेव पाहत होते स्वर्गलोकांतून. घोड्याची बेढब चाल त्यांना दिसली. पण त्याच्या पायांना दोरी बांधिलेली होती ती कोठें त्यांना दिसली ? आपण वाखाणलेल्या त्या मूर्ख प्राण्याची चालण्याची ती तऱ्हा पाहून ते रागानें लाल झाले आणि म्हणाले, ' चूक झाली खरी. '

मनुष्य हात जोडून नम्र भावानें म्हणाला, 'आतां मीं याला नेऊन काय करूं ? आपल्या ब्रह्मलोकीं खुलें मैदान असलें तर याला तिकडेच पाठवून द्यावें. '

ब्रह्मदेव व्याकुळ होऊन म्हणाले, " जा, जा, याला तुझ्या तबेल्यांतच घेऊन जा. '

मनुष्य म्हणाला, ' प्रभो ! मनुष्यावर हें एक मोठें ओझेंच आलें म्हणावयाचें. '

ब्रह्मदेव म्हणाले, ' यांतच तर माणसाचें मनुष्यत्व आहे. '

# किरण तिसरा

## महाजनाचें भूत

— १ —

बुढ्या महाजनाच्या मरणसमयीं गांवचे सगळे लोक डोळ्यांत पाणी आणून म्हणूं लागले कीं, 'तुम्ही मेल्यावर आमचें कसें होईल?'

तें ऐकून बुढ्यालाहि दुःख वाटलें आणि तो मनांत काळजी करूं लागला कीं, 'खरेंच. आपण गेल्यावर या लोकांवर वजन ठेवून त्यांचीं मनें शांत राखणारा कोण आहे?'

काळजी करण्याचें तेवढें माणसाच्या हातीं आहे. मरण कांहीं कोणाला चुकवितां येत नाहीं. तेव्हां देवानें म्हटलें, 'काय वेडा आहे! उगाच काळजी करीत बसला आहे! भूत होऊन लोकांच्या मानगुटीस बसतां येत नाहीं काय? माणसाला मृत्यु आहे, भुताला कोठें आहे!'

— २ —

महाजन गेले. लोकहि शांत झाले.

माणसाला येऊन जाऊन काळजी असते ती भविष्यकाळाबद्दलची. पण भूतांवर भरंवसा ठेविला म्हणजे तीहि करायला नको; सगळी काळजी भुताच्या माथ्यावर ठेवून माणसाला स्वस्थ बसतां येतें. भुताला डोकें नसतें ही गोष्ट खरी; पण त्याबरोबर काळजीनें डोकें दुखण्याची व्यथाहि त्याला भोगावी लागत नाहीं.

पण स्वतःबद्दलची काळजी स्वतः वाहणें हा ज्याचा स्वभावदोष असतो त्यांना भुतावरची काळजी स्वतःच वाहावी लागते. ती त्यांना सोडतां येत नाहीं; तिच्यापासून दूर पळतां येत नाहीं; तिच्याविरुद्ध फिर्याद चालत नाहीं; तिची चौकशी करणारें कोर्टहि नाहीं.

भुतावर विश्वास ठेवणारांनीं डोळे मिटून खुशाल चालावें. तत्त्वज्ञानी म्हणतात कीं, ही डोळे मिटून चालण्याची चाल सनातन काळापासून अशीच चालत आलेली आहे. कोणी या चालीला दैववाद असें नांव देतात.

सृष्टि निर्माण झाली तेव्हांचे चक्षुहीन जीव असेच वागत असत. गवत, वनस्पति, वृक्ष, लता इत्यादिकांच्या मध्यें अजून हीच सनातन चाल दृष्टीस पडते.

भुतानें झपाटलेले देश हीच सनानन चाल पाळून आपलें कुलीनत्व व प्राचीनत्व सिद्ध करीत आले आहेत असें ऐकतों. असें करण्यापासून त्यांच्या मनाला केवढा आनंद होत असला पाहिजे !

या भुताटकीच्या देशावर म्हणजे अर्थात भुताटकीच्या या तुरुंगा-वर देखरेख करणारा एक नायब (डेप्युटी) अधिकारी आहे. या तुरुंगाच्या भिंती डोळ्यांनीं दिसत नाहींत; अर्थात् त्या भिंतीला कोठें कसें भोंक पाडावें म्हणजे त्यांतून बाहेर पडतां येईल तें कोणालाहि कळत नाहीं.

या तुरुंगांत तेलाच्या घाणी सारख्या फिरत असतात. पण बाजारांत विकण्यास नेतां येईल असें छटाकभरसुद्धां तेल उभ्या दिवसांत या घाणींत निघत असेल तर शपथ !

या तुरुंगांतून एकच गोष्ट बाहेर जाते; आणि ती म्हणजे माणसाच्या अंगांतलें तेज. तें गेलें म्हणजे मनुष्य थंड पडतो. म्हणून भुतांच्या राज्यांत अन्न, वस्त्र, आरोग्य इत्यादि गोष्टी नसल्या तरी एका गोष्टीची विपुलता असते. ती गोष्ट म्हणजे शांति ही होय.

ही शांति कशी असते त्याचें एक उदाहरण सांगतों. दुसऱ्या कोणत्याहि देशांत पहा, भुताचें नांव काढलें कीं, लोक घाबरून पंचाक्षऱ्याच्या शोधाला लागतात. पण खुद्द भुताटकीच्या राज्यांतल्या लोकांना पंचाक्षरी शोधण्याचें कारण पडत नाहीं; त्यांच्या मनाची

गडबड उडत नाहीं; व त्यांची शांति कधीं ढळत नाहीं. कारण, तेथचे पंचाक्षरीसुद्धां भुतांच्या आधीन झालेले असतात.

— ३ —

भुतानें झपाटलेल्या अर्थात् भूततंत्री राज्यांत लोकांचीं मनें पूर्णपणें शांत असतात. इतकेंच नाहीं, तर त्यांना या गोष्टीचा अभिमान वाटतो कीं, आपलें भवितव्य पाळीव मेंढराप्रमाणें भुताच्या खुंट्याला बांधून ठेविलेलें आहे. त्याला आतां कशाचीहि भीति नाहीं. तें बें–एँ–एँ करायचें नाहीं, किंवा म्यॉंव म्यॉंव करायचें नाहीं. तें मेंढराप्रमाणें जमिनीवर निपचीत पडून राहिलें आहे.

या एका क्षुद्र कारणामुळें इतर देश व भुताटकीनें झपाटलेला देश यांच्यांत अंतर पडलें आहे. इतर देशांत ज्या तेलाच्या घाण्या चालतात, त्यांच्यांत तेल निघतें व तें त्यांच्या भविष्यरथाच्या चाकांनीं कुरकुरूं नये म्हणून त्या चाकांना लावण्यांत आल्यामुळें तीं चाकें आवाज न करतां तुरुतुरु धावतात; आणि या भुताटकीच्या देशाच्या भविष्यरथाच्या चक्रांना तसें तेल मिळत नाहीं, म्हणून त्या रथाची गति कुंठित झाली आहे. इतर देश गतिमान् आहेत. हा देश स्थिर आहे, इतर देशांतले लोक जागृत आहेत, या देशांतले स्वस्थ घोरत पडले आहेत.

— ४ —

इकडे भुताटकीच्या राज्यांत जिकडे तिकडे दिव्य शांति आहे. आई अंगाईचें गाणें म्हणत आहे व मुलें गाढ निद्रेंत आहेत. मुलांना आराम व आईबापांनाहि आराम.

पण इतकी शांति असतां परकीयांच्या स्वाऱ्या या देशावर आल्या, हें कसें ? इतिहासाच्या कथानकाशीं मेळ कसा घालावयाचा ? तो घातल्यावांचून तर गत्यंतर नाहीं ही अडचण आली. तेव्हां शास्त्री,

वैदिक, पुराणिक वगैरेंची सभा बोलावण्यांत आली व त्यांच्यापुढें हा प्रश्न टाकिला. त्यांनीं चुटकीसरसा हा प्रश्न उडवून दिला. ते म्हणाले, 'यांत भुताकडे काय दोष ? आणि आमच्या लोकांकडे तरी काय दोष आहे ? जर कोणाकडे दोष असेल तर तो स्वारी करून येणारांचा आहे. त्यांनीं यावें कशाला ?'

विद्वान् पंडितांचें हें उत्तर ऐकून सर्वांचें समाधान झालें व पुनः सर्वत्र शांतता झाली.

दोष कोणाचाहि असो, पण येवढी गोष्ट खरी कीं, खिडकीच्या आंतल्या बाजूस भुताचे शिपाई फिरत आहेत, आणि बाहेर रस्त्यांवर व घाटावर अभूतग्रस्तांचे शिपाई तसेच फिरत आहेत. घरांतल्या माणसाला घरांत राहतां येत नाहीं, बाहेर जाण्याचीहि सोय नाहीं. इकडून भुताचे शिपाई म्हणतात, 'सरकारी कराचे पैसे टाक,' तिकडून बाहेरचे शिपाईहि म्हणतात, 'सरकारचें देणें दे.'

आतां पंचाईत ही येऊन पडली आहे कीं, 'पैसे द्यायचे कोणाला ?'

आतांपर्यंत उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, सगळ्या दिशांकडून पक्ष्यांच्या टोळ्यांवर टोळ्या येऊन शेतांतलें धान्य फस्त करून गेल्या. पण कोणी त्या वेळीं जागे झाले नाहींत. जगांत जे जागृत आहेत त्यांच्याशीं या लोकांना संपर्क ठेवण्याची इच्छा नाहीं. मागाहून त्याबद्दलचा भुर्दंड भरावा लागतो. ते लोक येऊन अत्यंत निकट संपर्क करून जातात, आणि त्याबद्दल त्यांना कांहीं एक प्रायश्चित्त करावें लागत नाहीं. यावर विद्वान् पंडित पोथ्यांचीं पानें उलथीं पालथीं करून म्हणतात, "जे सुप्त तेच पवित्र, जे सावध ते अपवित्र होत. म्हणून सावधान असणारांकडे लक्षच देऊं नका." "प्रबुद्ध-मिव सुप्तः !"

पंडितांचें हें उत्तर ऐकून सर्वांना आनंद झाला.

— ५ —

पण अजून 'कराचे पैसे कोणाला द्यावयाचे ?' हा प्रश्न राहिलाच.

मसणवटीवरून—कबरस्थानावरून—येणारी हवा हा हा करून हंसते. तिला उत्तर हेंच कीं 'अन्न द्या, इज्जत द्या, अंगांतलें रक्त द्या.'

प्रश्नांना एक मोठी वाईट खोड आहे. ते एकदां येऊं लागले म्हणजे एकदम गर्दी करून येतात. एकेक येत नाहींत. वरच्या प्रश्नाबरोबर दुसरा एक प्रश्न हा उद्भवला कीं 'भुताचा अंमल आपल्यावर राहणार तरी आणखी किती दिवस? तो अनंत कालपर्यंत असाच रहावयाचा कीं काय?'

हा प्रश्न ऐकून भुताटकीच्या राज्यांतल्या निद्रिस्त घरांतल्या आत्या, माम्या, मावश्या, कानावर हात ठेवून म्हणतात, 'कलियुगाचा हा प्रभाव! विनाशकाळ आलाच वाटतें. असा प्रश्न बापजन्मीं कधीं ऐकला नव्हता. असे प्रश्न होऊं लागले तर सनातन काळापासून चालत आलेल्या निंदेचें काय होणार? ती तर सर्वांत प्राचीन आहे. जागृति ही काय आजकालची पोर! कानामागून आली अन् तिखट झाली ही म्हण कांहीं खोटी नाहीं एकूण!'

यावर प्रश्न करणारे म्हणतात, 'तुमच्या म्हणी बिणी राहूं द्या; अगोदर आधुनिक टोळधाडीचें काय करावयाचें तें सांगा.'

यावर म्हाताऱ्याकोताऱ्या बायांचें उत्तर असें येतें कीं, 'देवाचें नांव घ्या म्हणजे झालें.'

यावर अननुभवी मूर्ख लोक उद्धटपणानें म्हणतात, 'तुमचें देवाचें नांव ठेवा तुमच्यापाशीं. आम्ही तर ही भूतबाधा नाहींशीं होईल असा कांहीं उपाय करणार.'

भुतांचा अधिकारी डोळे गरगरा फिरवून म्हणतो, 'चूप! घाणी अजून थांबली नाहीं.'

त्याचे हे शब्द ऐकून लोक गप्प राहिले; आणि पुनः झोपीं गेले.

— ६ —

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महाजन जगलाहि नाहीं, व मेलाहि नाहीं; भूत होऊन बसला आहे. लोकांना तो हलूं देत नाहीं, आणि सोडीतहि नाहीं.


ज्याच्या तोंडीं भूत अधिकाऱ्याची गोष्ट नाहीं असा मनुष्य साऱ्या देशांत धुंडून एक तरी मिळेल कीं नाहीं कोण जाणे!

'महाजनसाहेब, कृपा करून सोडा आतां या गरिबांचा पिच्छा!' ही प्रार्थना ज्याच्या त्याच्या तोंडीं आहे.

महाजन ही प्रार्थना ऐकून म्हणतो, 'किती रे तुम्ही मूर्ख आहां! मीं कोठें तुम्हांला धरलें आहे तर मला सोडा म्हणतां? तुम्हीं सोडलेंत कीं मीं सोडलेंच समजा.'

लोक म्हणतात, 'पण आम्हांला भय वाटतें.'

महाजन म्हणतो, 'जेथें भय तेथेंच तर भूत असतें.'



# किरण चौथा

## एक होता राजा

‘ एक होता राजा. ’

आमच्या बाळपणीं आजीबाईच्या तोंडच्या अशा गोष्टींतल्या राजाविषयींची फारशी चिकित्सा करण्याचें कारण नसे. तो राजा शिलादित्य असो कीं शालिवाहन असो; तसेंच त्याची राजधानी काशी असो कीं कनोज असो, त्याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे ? तो राजा होता ही गोष्टींतली मुख्य गोष्ट होती; आणि एवढ्यानेंच तीं ऐकणाऱ्या सात वर्षांच्या पोराचें मन आनंदानें उचंबळत असे.

पण अलीकडच्या काळांतल्या वाचकांना अधिक कांटेतोल विधानें केलेलीं हवीं असतात. फारच चिकित्साखोर बोवा हीं माणसें ! ‘ एक होता राजा ’ अशा मोघम शब्दांनीं गोष्टीला प्रारंभ झाला, कीं झालीच यांची विचक्षणा सुरू आणि आलीच यांना शंका ! त्यांनीं शास्त्रीय शोधकबुद्धीचा प्रकाश त्या वाक्यावर पाडून ‘ राजा खरा; पण कोणता ?’ असा प्रश्न केलाच !

गोष्टी सांगणारांनाहि अर्थात् तसें कांटेतोल व्हावें लागलें आहे. आतां पूर्वींच्यासारखें मोघम ‘ एक होता राजा ’ असें म्हटल्यानें त्यांचेंहि समाधान होत नाहीं. तेहि पांडित्याचा आव घालून ‘ अजातशत्रू नांवाचा एक राजा होता ’ येथून गोष्टीला सुरुवात करूं लागले आहेत.

पण अलीकडच्या वाचकांची जिज्ञासा तृप्त करण्याचें काम असें सहज होण्यासारखें नाहीं. आतांचा वाचक आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या

चष्म्याच्या आडून डोळे मिचकावीत हळूंच विचारतो, 'अजातशत्रू नांवाचा खरा, पण कोणता अजातशत्रू ?'

आमच्या लहानपणीं सगळ्या गोड वस्तूंतली गोडी आम्हांला कळत असे. ती कळण्याची आमच्यापाशीं एक विद्या असे. ही विद्या कधीं चुकावयाची नाहीं. आजीबाईच्या गोष्टींतलें माधुर्य आम्हांला या विद्येनें केव्हांच कळे. ज्ञानासारख्या निरुपयोगी वस्तूची आम्ही पर्वा करीत नव्हतों. आम्हांला खरें तेवढें पाहिजे असे; आणि आमच्या मनाला अलीकडच्या लटपटाध्यायाचा विटाळसुद्धां झाला नसल्यामुळें सत्याचा बिलोरी महाल कोठें आहे व तेथें कोणत्या वाटेनें जातां येतें तें आमच्या मनाला पक्कें ठाऊक होतें. पण आज पहाल तर इतिहासाचीं पानेंच्या पानें लिहावीं लागतात, आणि त्यांत सत्य पहाल तर येवढेंच कीं,

'एक होता राजा.'

आमच्या या गोष्टीला आरंभ झाला तो दिवस—किंवा ती संध्याकाळ—माझ्या चांगली आठवणींत आहे. आम्ही कलकत्त्यास होतों. पाऊस आणि सोसाट्याचा वारा यांचा धुमाकूळ सारखा चालला होता. सगळ्या शहरभर पाणीच पाणी झालें होतें. आमच्या आळींत रस्त्यांतून गुडघाभर पाणी झालें होतें. आमच्या मास्तरांच्यानें आज तरी येत्रवणार नाहीं अशी आशा—बहुतेक खात्रीच म्हणा—माझ्या मनाला वाटत होती. मी माडीवरल्या सज्जांतल्या—जेथून रस्त्यावर दूरपर्यंत नजर पोंचत असे अशा—एका कोंपऱ्यांत स्टुलावर बसलों होतों. क्षणोक्षणीं माझी छाती जोरजोरानें उडत होती. प्रत्येक मिनिटाला माझें लक्ष पावसाच्या जोराकडे होतें; आणि तो कमी झाल्याबरोबर मी देवाला अतिशय आळवून म्हटलें, 'देवबापा, या तुझ्या गरीब लेकरावर दया कर, आणि संध्याकाळचे साडेसात वाजून जाईपर्यंत पावसाला खळ पडूं देऊं नकोस.' माझ्या मनाची समजूतच ही कीं, देव अशा वेळीं पाऊस कां पाठवितो ? तर कलकत्त्यासारख्या

शहराच्या एका कोपऱ्यांत राहणाऱ्या एका गरीब पोराला निर्दय मास्तराच्या भयंकर कचाट्यांतून सोडविण्यासाठीं.

माझी प्रार्थना ऐकून म्हणा, कीं, तिच्याहून अधिक स्थूल अशा सृष्टि-नियमामुळें म्हणा, पण पावसानें आपला क्रम सोडला नाहीं. पण हाय रे दुर्दैव ! मास्तरांनींहि पण आपला क्रम सोडला नाहीं !

त्यांची नेहमीची येण्याची वेळ होतां क्षणींच रस्त्याच्या वळणा-पाशीं त्यांची छत्री येत असलेली दिसूं लागली. माझ्या मनांतला आशेचा तंतु ताड्कन् तुटला; आणि माझें हृदय विदीर्ण झालें. खरोखर, मरणोत्तर माणसाला त्याच्या अपराधानुरूप शिक्षा मिळण्याची कांहीं तजवीज असेल तर आमचे मास्तर पुढच्या जन्मीं माझे विद्यार्थी आणि मी त्यांचा मास्तर होईन.

त्यांची छत्री दिसूं लागतांच मीं धूम पळ काढला, आणि शक्य तेवढ्या घाईनें आईच्या खोलींत गेलों. माझी आई आणि आजी समोरासमोर बसून दिव्यापाशीं पत्ते खेळत होत्या. मी तेथें गेलों, आई बसली होती तेथें जवळ एक अंथरूण पसरलेलें होतें त्यावर जोरानें अंग टाकिलें, आणि म्हटलें, " आई, माझे मास्तर आले आहेत. पण माझें डोकें दुखत आहे. आजचा दिवस सुटी दिली तर नाहीं का चालायचें ? "

अपक्व बुद्धीच्या मुलाला ही गोष्ट वाचण्याची परवानगी देण्यांत येणार नाहीं आणि खालच्या वर्गांत चालणाऱ्या कोणत्याहि वाचन-पुस्तकांत ही गोष्ट घालण्यांत येणार नाहीं अशी मी उमेद बाळगतों. कारण, मी केलेली गोष्ट अतिशय वाईट होती आणि तिच्याबद्दल मला कोणतीहि शिक्षा करण्यांत आली नाहीं. उलट, माझें वाईट कृत्य सिद्धीला गेलें

माझी आई मला म्हणाली, " बरं, " आणि नोकराकडे वळून

ती म्हणाली, " मास्तरांना म्हणावें आज सुटी दिली आहे. तुम्ही आपले जा. "

माझें दुखणें मनावर घेण्यासारखें तिला वाटलें नाहीं हें तर उघड दिसतच होतें. कारण, तिनें आपला खेळण्याचा नाद न सोडतां डाव पुढें चालविला होता; आणि माझ्या दुखण्याच्या संबंधांत पुढें कांहीं तिनें मनांत आणिलें नाहीं. मीहि उशीत डोकें खुपसून मनांत पोट भरे-पर्यंत हसलों. माझ्या मनांतली गोष्ट आईला ठाऊक, कीं आईच्या मनां-तली मला ठाऊक !

मी दुखण्याचें सोंग आणिलें होतें. सोंगाची वतावणी फार वेळपर्यंत करणें सात वर्षांच्या पोराला किती जड जातें तें प्रत्येकाला ठाऊकच आहे. एक मिनिट गेल्यावर मी आजीपाशीं गेलों, आणि म्हणालों, " आजी, एक गोष्ट सांग ना ! "

मला हें कितीकदां तिला म्हणावें लागलें. आजी आणि आई आपल्या खेळण्याच्याच नादांत होत्या. त्या कशाला माझ्या म्हणण्याकडे लक्ष देताहेत ? शेवटीं एकदांची आई म्हणाली, " बाळ, असा त्रास देऊं नकोस. हा डाव होईपर्यंत थांब. " पण " आजी, गोष्ट सांग " हें माझें आपलें पालुपद आहेच. मी आईला म्हटलें, " तुमचा डाव होईल उद्यां. मला आतां गोष्ट ऐकायला हवी आहे. ती आजीला सांगू दे. "

शेवटीं आईनें हातांतलीं पत्त्यांचीं पानें खालीं टाकलीं आणि म्हटलें, " होऊं द्या एकदांचें पोराच्या मनासारखें. तो माझें कांहीं ऐकायचा नाहीं. "

आपल्या मागें उद्यां कांहीं मास्तरांचा लकडा लागावयाचा नाहीं, पण मुलाला मात्र आपले धडे करीत बसावें लागणार, तेव्हां आजचा दिवस त्याच्या मनासारखें होऊं द्यावें असा पोक्त विचार तिच्या मनांत कदाचित् आला असेल.

आईनें पडतें घेतल्याबरोबर मी आजीच्या जवळ गेलों; तिचा हात धरला, आणि आनंदानें नाचत तिला आपल्या मच्छरदाणींतल्या अंथरुणापर्यंत ओढीत आणिलें. आनंदाच्या भरांत मी उशीला दोन्ही हातांनीं कवटाळून उंच उड्या मारल्या. मग जरा शांत झाल्यावर आजीला म्हटलें,

" आजी, चालू दे तुझी गोष्ट. "

आजीनीं पुढें गोष्ट चालविली. त्या म्हणाल्या, " त्याला होती एक राणी. "

आरंभ तर चांगला झाला. त्याला एकच राणी होती हें बरेंच म्हणावयाचें !

अशा गोष्टींतल्या राजांना बहुधा राण्याच राण्या असतात, आणि एखाद्याला दोन राण्या असलेल्या ऐकल्या म्हणजे अर्थातच आपल्या मनाला कसेंसेंच वाटतें. पण आजीच्या आतांच्या गोष्टींत तें भय राहिलें नव्हतें. राजाला एकच राणी होती.

पुढें त्या गोष्टींत असें झालें कीं, राजाला मुलगा नव्हता. मुलगा नाहीं तर नाहीं—नसला म्हणून काय बिघडलें ? तो असण्याची कांहीं जरूरी सात वर्षांच्या वयांत मला दिसली नाहीं, आणि अजून झाला नसला तरी पुढें होणार नाहीं कशावरून ?

पुढें राजा पुत्रप्राप्तीसाठीं तपश्चर्या करण्याकरतां वनांत गेल्याचें आपण ऐकतों तेव्हां आपल्या मनाला त्याची कांहीं क्षिति वाटत नाहीं. खरें पुसाल तर मी फक्त एका गोष्टीसाठीं वनवास पतकरायला तयार होईन; आणि ती गोष्ट म्हणजे मास्तराचा त्रास चुकविणें ही !

पण राजाला एक लहान मुलगी होती, आणि तिला राणीजवळ ठेवून तो गेला होता. ती मोठी झाली तशी सुंदर राजकन्या शोभूं लागली.

बारा वर्षें जातात. राजाची तपश्चर्या आपली चाललीच आहे, आणि या अवधींत त्याला आपल्या सुंदर कन्येचें कधीं स्मरणसुद्धां होत नाहीं! इकडे राजकन्या उपवर झाली. विवाहाची वयोमर्यादा होऊन गेली, तरी राजा परत येत नाहीं. राणी दुःखानें झुरणीस लागली आहे. ती म्हणते, "पोरीच्या नशीबीं अविवाहित स्थितींतच मरण आहे कीं काय कुणाला ठाऊक! हाय रे दैवा! किती मी अभागी!"

शेवटीं राणीनें राजाकडे माणसें पाठवून विनवणी केली कीं, एका रात्रीपुरते तरी घरीं येऊन जा. फार राहिलें, पण एक जेवण तरी घरीं पडूं द्या. राजानें ती गोष्ट कबूल केली. त्या दिवशीं राणीनें स्वतः स्वैंपाक केला, आणि फार काळजीपूर्वक तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ तयार केले. राजासाठीं चंदनाचा पाट मांडून त्याच्यापुढें सोन्याचें ताट आणि चांदीच्या वाट्या ठेविल्या. राजकन्या स्वतः हातांत मोरचेल घेऊन माशा वारण्यासाठीं मागें उभी राहिली. राजा बारा वर्षांनीं घरीं आला होता. राजकन्या माशा वारीत होती. तिचें सौंदर्य सगळ्या महालाला शोभायमान करीत होतें. राजानें आपल्या कन्येच्या मुखाकडे पाहिलें. आणि तो इतका चकित झाला कीं, जेवावयाचेंसुद्धां विसरला!

शेवटीं 'देवतेप्रमाणें जिचें एवढें सौंदर्य प्रकाशत आहे अशी ही मुलगी कोण? व कोणाची?' असा प्रश्न त्यानें राणीला केला.

राणीनें कपाळावर हात मारून म्हटलें, "काय माझ्या दैवाचा खेळ आहे पहा! आपणाला आपली मुलगी ओळखतां येऊं नये?"

राजा आश्चर्यचकित झाला. शेवटीं तो म्हणाला, "एकूण माझी सोनुकली आतां चांगली बाई दिसूं लागली म्हणायची!"

राणी उसासा टाकून म्हणाली, "तर काय! मध्यें थोडा का काळ गेला? चांगली बारा वर्सं गेलीं ना?"

राजा म्हणाला, "मग हिचें लग्न कां नाहीं करून टाकिलें?"

राणी म्हणाली, “ कोण करणार ? आपण तर तिकडे होतां ! हिच्याजोगं स्थळ माझ्यासारख्या बाईबापडीला कसं सांपडायचं ? ”

राजाला आवेश चढला. तो म्हणाला, “ उद्यां मी वाड्यांतून बाहेर पडल्याबरोबर जो पहिल्यानें मला दिसेल त्याला ही मुलगी मी देणार ? ”

राजकन्या मोरचल फिरवीत राहिली, आणि राजाचें भोजन एकदांचें आटोपलें.

दुसरे दिवशीं सकाळीं राजा वाडयांतून बाहेर पडला. तेव्हां वाडयाच्या दरवाजासमोरच्या वनांत समिधा गोळा करीत असलेला एक ब्राह्मणकुमार त्याला दिसला. त्याचें वय सात आठ वर्षांचें असेल.

राजा म्हणाला, “ याच्याशींच मी मुलीचें लग्न लावणार. ”

राजाची आज्ञा म्हणजे आज्ञा. तिच्या आड कोण जाऊं शकेल ?



त्या मुलाला लागलीच बोलावून आणिलें आणि राजकन्या व तो कुमार यांनीं परस्परांच्या गळयांत पुष्पमाला घातल्या.

गोष्ट येथपर्यंत आली, तेव्हां माझ्या उत्सुकतेला पूर येऊन मीं आजीच्या गळयाला मिठी मारून म्हटलें, “ मग पुढें ? ”

त्या सातआठ वर्षांच्या ब्राह्मणकुमाराच्या जागीं आपण जाऊन बसावें अशी माझी बेंबीच्या देठापासून खरोखर इच्छा होती. रात्रीं

पावसाच्या थेंबांचा टप् टप् टप् आवाज सुरू होता. माझ्या उशाजवळचा दिवा मिणमिण् जळत होता. आजी गोष्ट सांगत होत्या, त्यांची गुणगुण चालली होती. या सगळ्या गोष्टींचा माझ्या भोळसर मनाच्या एका कोपऱ्यावर समुच्चयानें असा परिणाम घडला कीं, मला कांहीं एक भास झाला. मला वाटलें कीं मी कोणत्या तरी काळांत कोणा तरी राजाच्या राज्यांत समिधा गोळा करीत होतों, आणि एका क्षणांत रतीसारख्या एका सुंदर राजकन्येनें माझ्या गळ्यांत माळ घातली, व मीं तिच्या घातली. तिच्या वेणींत सोन्याचे अलंकार होते; कानांत हिऱ्यामोत्यांच्या कापबाळ्या होत्या, गळ्यांत चंद्रहार, हातांत हिऱ्यांचीं कांकणें व सोन्यामोत्याचे तोडे, कमरेला सोन्याचा कमरपट्टा व पायांत सोन्याच्या तोरड्या व पैंजण होते.

माझी आजी जर ग्रंथलेखक असती तर तिला या गोष्टींतल्या कितीतरी गोष्टींबद्दल लोकांच्या शंकांचें समाधान करावें लागलें असतें! लोक पहिली गोष्ट ही विचारतील कीं, राजा बारा वर्षें वनवासांत कां राहिला? दुसरी गोष्ट, राजाची कन्या इतकीं वर्षें अविवाहित कशी राहिली? लोक म्हणतील, कीं हा सगळा प्रकार खुळचटपणाचा आहे!

येथपर्यंत जरी तिनें भांडणावांचून निभावून नेलें असतें तरी खुद्द लग्नाच्या विरुद्ध लोकांनीं मोठाच कोलाहल मांडला असता. पहिली गोष्ट, असा विवाह आजपर्यंत कधीं झालेला नाहीं. दुसरी, क्षत्रियकन्येनें ब्राह्मणकुमाराला वरलें हें कसें? वाचकांनीं तत्काळ ओळखलें असतें कीं, ग्रंथकर्त्री लपून छपून समाजाच्या रीतरिवाजांविरुद्ध लोकांना उपदेश करीत आहे; आणि मग लोकांनीं वर्तमानपत्राकडे धांव घेतली असती!

म्हणून माझी देवाला प्रार्थना आहे कीं, आजींनीं पुढला जन्म आजीचाच घ्यावा; तिच्या दुर्दैवी नातवाप्रमाणें भलत्याच एखाद्या जन्माला येऊं नये.

आनंदानें पुलकित होऊन मी आजीला म्हटलें, " पुढें ? "

आजी आपली गोष्ट सांगूं लागल्या. " त्या राजकन्येनें कष्टी होऊन आपल्या छोट्या पतिराजाला दुसरीकडे नेलें आणि तेथें मोठा सातसोपी वाडा बांधून तीं दोघें राहूं लागलीं. राजकन्या मोठ्या काळजी-पूर्वक यजमानाची सेवा करीत राहिली. "

मी अंथरुणांतल्या अंथरुणांतच वर खालीं नाचूं लागलों, आणि उशीला घट्ट कवटाळून विचारलें, " मग पुढें ? "

आजी म्हणाल्या, " मग तो ब्राह्मणकुमार शाळेंत जाऊं लागला, आणि गुरूजवळ त्यानें बरीच विद्या केली. एके दिवशीं त्याच्या वर्गां-तले सोबती त्याला विचारूं लागले कीं, सातसोपी वाड्यांत तुझ्याबरोबर राहते ती सुंदरी कोण ? '

ब्राह्मणकुमारालाहि ती कोण तें जाणण्याची इच्छा होती. आपण एके दिवशीं समिधा गोळा करीत असतां मोठी गडबड झाली होती एवढीच त्याला आठवण होती. पण त्या गोष्टीला इतके दिवस झाले होते कीं, तिच्या पुसट आठवणीपलीकडे त्याला कांहीं ठाऊक नव्हतें.

अशा रीतीनें पांचचार वर्षें आणखी निघून गेलीं. त्याचे सोबती ती सातसोपी वाड्यांतली सुंदरी कोण म्हणून त्याला विचारीत आणि तो घरीं येऊन राजकन्येला म्हणे कीं, मला माझे सोबती असें असें विचारतात, मला त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. तेव्हां तूं कोण तें मला सांग. सुंदरी म्हणे, " आज राहूं द्या; आणखी एखादे दिवशीं सांगेन." रोज ब्राह्मणकुमारानें तोच तोच प्रश्न तिला करावा आणि तिनें वरच्या सारखें टोलवाटोलवीचें उत्तर देऊन वेळ मारून न्यावी. असें आणखी पांचचार वर्षें चाललें.

शेवटीं एके दिवशीं ब्राह्मणकुमार फारच उतावीळ झाला आणि म्हणाला, " तूं कोण आहेस हें जर तूं आज मला सांगितलें नाहींस,

तर मी हा वाडा सोडून दुसरीकडे चालता होईन." तेव्हां राजकन्या म्हणाली, "उद्यां खचित सांगत्यें."

दुसरा दिवस उजाडला. रोजच्याप्रमाणें ब्राह्मणकुमारानें शाळेंतून येतांच म्हटलें, "आतां सांग." ती म्हणाली, "रात्रीं जेवण झाल्यावर तुम्ही निजलांत म्हणजे सांगेन."

ब्राह्मणकुमार म्हणाला, "बरें आहे" आणि निजण्याच्या वेळेपर्यंत तो उत्सुकतेनें घटकापळें मोजीत राहिला. इकडे राजकन्येनें सोन्याच्या पलंगावरच्या मऊ अंथरुणावर फुलें पसरलीं, सोन्याची समई अत्तरानें भरून तो दिवा लावून ठेविला, वेणीफणी केली; उंची वस्त्रें परिधान केलीं, आणि तीहि रात्रीं निजण्याची वाट पहात बसली.

रात्रीं ब्राह्मणकुमार जेवावयास बसला, पण त्याला उत्सुकतेमुळें रोजच्यासारखें जेवण गेलें नाहीं. भोजनोत्तर तो आपल्या पुष्पाच्छादित शय्येकडे गेला. इतक्या दिवसांनंतर आज आपणास आपल्या प्रश्नाचें उत्तर खास मिळणार असें तो स्वतःशीं पुटपुटला.

ब्राह्मणकुमाराच्या उष्ट्या ताटांत राजकन्या जेवली, आणि हळुहळु शयनमंदिरांत आली. आपण कोण या प्रश्नाचें उत्तर आज तिला द्यावयाचें होतें. तें देण्यासाठीं ती शय्येच्याजवळ जाते, इतक्यांत त्या फुलांतून एक साप वळवळ करीत निघाला आणि ब्राह्मणकुमाराला चावला. क्षणांत त्या पुष्पशय्येवर त्या ब्राह्मणकुमाराचें निस्तेज मुद्रा झालेलें शव तिनें पाहिलें.

हें ऐकतांच माझ्या अंतःकरणांतली धडपड एकदम थांबली आणि गळा दाटून येऊन मी विचारलें, "बरें पुढें ?"

आजी म्हणाल्या, "मग......"

पण आतां पुढची गोष्ट सांगून काय उपयोग ? जितकी जितकी ती लांबवावी तितक्या तितक्या अधिकाधिक असंभाव्य गोष्टी सांगाव्या

लागणार. मृत्यूनंतरहि ' पुढें काय झालें ? ' असे प्रश्न कांहीं जणांकडून करण्यांत आले तर त्याचें उत्तर आजीच काय, पण आजीच्या आजीची आजी सुद्धां देऊं शकणार नाहीं हें सात वर्षांच्या पोराला कोठून कळणार ?

पण लहान मुलांच्या ठायीं श्रद्धा इतकी प्रबळ असते कीं, तीं आपला पराभव झाला असें कधींच कबूल करावयाचीं नाहींत. तीं प्रत्यक्ष यमधर्माचा पदर धरून त्याला परत फिरायाला लावतील ! मास्तराची कटकट नाहीं अशा एका संध्याकाळची गोष्ट अशा रीतीनें एकाएकी बंद पडेल अशी लहान मुलाला कल्पना तरी कशी व्हावी ? त्याला अशी कल्पना करतां येईल असें म्हणणें हें शुद्ध साहस आहे. म्हणून नेहमीं बंद असलेल्या मृत्युद्वारापासून आजी आपल्या गोष्टी नेहमीं परत बोलावतात; आणि हें त्या अगदीं स्वल्प रीतीनें करतात. मृत देहाला केळीच्या पानावर ठेवून नदींत तें पान सोडून दिलें आणि मांत्रिकाकडून मंत्र म्हणविले म्हणजे झालें. पण त्या पाऊस पडत असलेल्या रात्रीं दिव्याच्या मंद प्रकाशांत लहान मुलालाहि मृत्यूचें भय वाटत नाहीं, असें त्याला वाटतें. गोष्ट संपण्याच्या वेळीं त्याचे डोळे झोपेनें जड झालेले असतात. अशा रीतीनें आपण कालाच्या निश्चल प्रवाहावर, झोपेच्या पाठीवर, मुलाचा देह ठेवून देतों, आणि सकाळीं पुनः त्याला सजीव करण्यासाठीं श्लोकरूपी मंत्राचे पाठ म्हणतों.



# किरण पांचवा

## पत्त्यांचें राज्य

१

पूर्वी एके काळीं एका दूरच्या समुद्रांत एक बेट होतें. तेथें राजे राण्या, एक्के, गुलाम इत्यादि मंडळी राहत असे. हेंच पत्त्यांचें राज्य. दहिल्या, अठ्ठ्या, दुर्री, तिर्री, वगैरे किरकोळ मंडळी या राज्यांत फार दिवसांपूर्वी येऊन राहिलेली होती. पण वरच्या दरबारी मंडळींसारखा त्यांचा मान समाजांत नसे.

त्यांच्यांत वर्णभेद होता. एक्का, राजा आणि गुलाम हे तीन वर्ण श्रेष्ठ दर्ज्याचे होते, आणि चौथ्या वर्णांत बाकीची सटरफटर मंडळी मोडत असे. दुर्री, तिर्री यांचा दर्जा अगदीं निकृष्ट प्रतीचा होता. त्यांना दरबारी मंडळीच्या पंक्तीला बसण्याची मनाई होती.

या छोट्याशा राज्यांतले कायदे व नियम विलक्षण होते. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा सनातन कालापासून ठरत आलेला होता. प्रत्येकाचें कामहि तसेंच ठरलेलें होतें. आपल्या ठरलेल्या कामाशिवाय दुसरें काम कोणी करावयाचा नाहीं. जिकडे जिकडे ते जात तिकडे तिकडे नियमबद्ध वर्तन ठेवण्याची प्रेरणा जणूं काय एखादी अदृश्य शक्ति करीत होती.

या राज्यांत कोणाला विचार करण्याचें कारण पडत नसे; अर्थात् वादग्रस्त प्रश्नहि उपस्थित होत नव्हते आणि त्यांचा निर्णय करण्याची भानगडहि करावी लागत नसे. सगळे नागरिक मुकाट्यानें रूळलेल्या मार्गानें धीरे धीरे जात असत. जातांना पडले तरी ते आरडा ओरड

करीत नसत. ते उताणे निजत, आणि त्यांची नजर आकाशांतल्या कायमच्या ठाकठिकीच्या स्वरूपाकडे लागलेली असे.

या राज्यांत विलक्षण स्तब्धता होती. पूर्ण समाधान नांदत होतें. गडबड किंवा मारामारी, दंगेधोपे यांचें नांव नव्हतें. क्षुब्धता किंवा उत्साह दिसत नसे.

समुद्र एकच एका सुरांत अंगाईचें गाणें म्हणून आणि आपल्या तरंगरूपी शुभ्र हलक्या हातांनीं थोपटून त्या बेटाला झोपवीत असे. विस्तृत नभोमंडळ, अंड्यांना उबविण्यासाठीं निळे पंख पसरून बसलेल्या पक्ष्याच्या मादीप्रमाणें त्या बेटाला आपल्या मऊ पिसाऱ्याखालीं घेत असे. कारण, दूरच्या क्षितिजावर गहिऱ्या निळ्या रंगाची एक रेघ दुसरा एक किनारा सूचित करीत होती.

— २ —

समुद्रपलीकडच्या त्या दूरच्या देशांत एक तरुण राजकुमार होता. त्याची आई दुखीःकष्टी होती. ही राणी अवकृपेखालीं आल्यामुळें आपल्या एकुलत्या एका मुलापाशीं समुद्रतीरीं रहात होती. कुमाराचें बालपण एकांतवासांत व निराश्रित स्थितींत गेलें होतें. तो आपल्या अनाथ मातेपाशीं बसून आपल्या उच्च आकांक्षांचें जाळें विणीत असे. आकाशांत उड्डाण करणारा घोडा, नागाच्या फणीवरचा मणि, खपुष्प, जादूचे रस्ते, यांचा शोध लावावा किंवा साता समुद्रापलीकडे कोणी सुंदर राजकन्या राक्षसानें मजबूत किल्ल्यांत बंदिवान करून ठेविली असेल तिला हुडकून काढावें ही त्याची इच्छा.

शाळेंत असतां एका सौदागराच्या मुलाच्या तोंडून त्यानें परदेशाविषयींच्या गोष्टी ऐकिलेल्या होत्या. कोतवालाच्या मुलाच्या तोंडून त्यानें जादूच्या दिव्याच्या दोन राक्षसांच्या अचाट कृत्यांविषयीं ऐकिलें होतें. आणि जेव्हां धोधो पाऊस पडे तेव्हां समुद्राकडे तोंड करून तो घराच्या

उंबरठ्यावर बसे आणि आपल्या आईला म्हणे, 'आई, एखाद्या दूरच्या देशाची गोष्ट सांग ना ग!'

मग त्याची आई त्याला आपण बालपणीं ऐकिलेली एक कधीं न संपणारी गोष्ट सांगे. या गोष्टींत समुद्रापारचा एक अद्‌भुत देश व तेथें राहणारी एक राजकन्या यांची कथा असे. आकाश भुरक्या ढगांनीं आच्छादिलें आहे, व धोधो पाऊस पडत आहे, अशा वेळीं उंबरठ्यावर बसून समुद्राकडे पाहत आईच्या तोंडची ती गोष्ट ऐकण्यांत त्याला मौज वाटे.

एके दिवशीं सौदागराचा मुलगा कुमारकडे आला, आणि धिटाईनें म्हणाला, 'मित्रा, माझें शिकणें संपलें. मी आतां नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं समुद्रयात्रा करायला निघालों आहें. जाण्यापूर्वीं म्हटलें एकदां तुझी भेट घ्यावी म्हणून आलों आहे.'

कुमार म्हणाला, 'मीहि तुझ्याबरोबर येतों.'

कोतवालाचा मुलगा म्हणाला, 'गड्यांनो, तुम्ही माझे जिव्हाळ्याचे आणि सच्चे सोबती आहां ना? मग मला सोडून कसे जातां? मीहि तुमच्यासंगें येतों.'

मग कुमार आईला म्हणाला, 'आई, मी नशिबाची परीक्षा करण्यासाठीं प्रवासाला निघालों आहें. मी परत येईन तेव्हां तुझ्या दुःखहरणाचा खात्रीचा कांहीं उपाय माझ्या हातीं आलेला तूं पाहशील.'

अशा रीतीनें ते तिघे सोबती बरोबर प्रवासाला निघाले. बंदरांत सौदागराचीं बारा जहाजें तयार झालीं. आणि हे तिघे निघाले. वारा चांगला अनुकूल असल्यामुळें जहाजें झपाट्यानें चाललीं होतीं.

प्रथम शंखद्वीप लागलें. येथें एक जहाज शंखांनीं भरून घेतलें. पुढें चंदनद्वीप लागलें. तेथें दुसरें जहाज चंदनाच्या खोडांनीं भरलें, आणि नंतर प्रवालद्वीप लागलें, तेथें तिसरें जहाज प्रवाळानें भरण्यांत आलें.

चार वर्षें गेलीं. या अवधींत त्यांनीं आणखी चार जहाजें–एक हस्तिदंतांनीं, दुसरें कस्तुरीनें, तिसरें लवंगांनीं व चवथें जायफळांनीं याप्रमाणें–भरलीं.

पण हीं सगळीं जहाजें मालानें भरल्यावर एक भयंकर वादळ उठलें. सगळीं जहाजें त्यांत बुडून तीं जायफळें, तें चंदन, ती कस्तुरी वगैरे सगळा माल ‘ समुद्रास्तृप्यन्तु ’ झाला. सुदैवानें हे तिघे ज्या जहाजावर होते तें जहाज एका बेटाच्या खडकाळ किनाऱ्यावर आपटून आंतलीं माणसें जमिनीवर फेकलीं गेलीं, आणि जहाजाचे तुकडे तुकडे झाले.

हें बेट म्हणजे पत्त्यांचा देश होय. येथेंच वर सांगितल्याप्रमाणें एक्के, राजे, राण्या, गुलाम, ही दरबारी मंडळी व दुर्री, तिर्री, सत्त्या, अठ्ठ्या, दाहिल्या वगैरे इतर किरकोळ मंडळी ठराविक कायद्याप्रमाणें राहात होतीं.

— ३ —

आतांपर्यंत त्या बेटांतल्या शांततेचा भंग करण्यासारखें कांहीं घडलें नव्हतें. सगळ्या गोष्टी ठराविक होत्या व त्या ठराविक वेळीं, ठराविक रीतीनें घडत. त्यांत नवीनपणा कांहीं नव्हताच. वादविवाद आणि चर्चा कधीं चालत नसत.



पण आतां एकाएकीं हे तिघे सोबती समुद्रांतल्या वादळानें तेथें आणून टाकिले, आणि वादविवादाला सुरुवात झाली. वादाचे मुख्य मुद्दे तीन होते.

पहिला मुद्दा हा कीं, हीं

तीन परकीं आलेलीं माणसें कोणत्या वर्गांत घालावयाचीं ? दरबारी मंडळीचा उच्च दर्जा त्यांना द्यावयाचा कीं खोगीरभरती मंडळींत त्यांची गणना करावयाची ? या मुद्द्याचा निकाल करण्याला मागील दाखला कांहीं नव्हता.

दुसरा मुद्दा—त्यांचा वर्ण कोणता समजावयाचा ? लालबदामा-सारखा उज्ज्वल कीं इस्पिकसारखा काळा ढुस्स ? या मुद्द्यावर त्यांच्यामध्यें जंगी वाद चालले होते. बरोबरच आहे. या मुद्द्याच्या निकालावर गुंतागुंतीच्या नियमांनीं बद्ध अशी त्यांची विवाहपद्धति अवलंबून होती.

तिसरा मुद्दा—त्यांनीं काय खावयाचें ? कोणाबरोबर राहावयाचें ? कोणाबरोबर निजावयाचें ? निजतांना डोकें उत्तरेकडे करावयाचें कीं दक्षिणेकडे ? पत्यांच्या राज्याच्या साऱ्या इतिहासांत असे महत्वाचे प्रश्न पूर्वींच्या काळीं कधीं उपस्थित झाले नव्हते.

पण त्या तिघां सोबत्यांना मनस्वी भूक लागलेली होती. काय वाटेल तें करून खायला मिळविणें त्यांना भाग होतें. म्हणून हा वाद मधून मधून चाले, मधून मधून विचारासाठीं तहकूब राही, असें चाललें असतां, आणि सगळ्या एक्क्यांनीं आपली एक सबकमिटी या वादाच्या विचारासाठीं भरविली असतां इकडे या तिघा सोबत्यांनीं जें कांहीं दिसलें त्यावर हात मारण्याचा सपाटा सुरू ठेविला, आणि सगळ्या नियमांचा भंग करून पाणी पिण्याचीं सगळीं भांडीं रिकामीं करून ठेविलीं.

हें अत्याचाराचें वर्तन पाहून दुऱ्यातिऱ्यांनासुद्धां नवल वाटलें. दुऱ्या म्हणाल्या, ' भगिनींनो, ह्या माणसांनीं लाज अगदीं सोडलेली दिसते. ' त्यावर तिऱ्या म्हणाल्या, ' खरेंच. हीं माणसें आपल्याहूनहि

हलक्या प्रतीचीं असलीं पाहिजेत.’ जेवणखाण आटोपल्यावर ते तिघे प्रवासी शहरांत सहल करायला निघाले.

त्या राज्यांतली अगडबंब म्हातारी गंभीर मुद्रा धारण करून डुलत डुलत चाललेली पाहून कुमारानें सौदागराच्या व कोतवालाच्या मुलांकडे तोंड केलें, आणि डोकें थोडें मागें करून तो खूप मोठ्यानें हंसला.

राजमार्गानें, एक्काचौकाच्या पलीकडे आणि गुलामबंधाऱ्याच्या बाजूस चोहींकडे या विलक्षण व अपूर्व विकट हास्याचे तरंग जाऊन सर्वजण आश्चर्यचकित होत्साते स्तब्धतेच्या विस्तृत शून्यांत विलीन होऊन गेले.

भोंवतालची पिशाचस्वरूपी गाढ शांतता पाहून कोतवालाच्या व सौदागराच्या मुलांना तर कांपरेंच भरलें. ते कुमाराकडे वळून म्हणाले, ‘ मित्रा, चला, येथून पळ काढा. या भयाण पिशाचराज्यांत क्षणमात्र राहण्याची सोय नाहीं.’

पण कुमार म्हणाला, ‘ गड्यांनो, असा उतावळेपणा करूं नका. हे लोक माणसासारखेच दिसत आहेत. तेव्हां यांना उलथे पालथे करून आणि यांच्या अंतर्यामांत शिरून मी हें पाहणार आहें कीं यांच्या शिरांत कोठें जिवंत रक्ताचा एक थेंब तरी आढळतो कीं नाहीं.’

— ४ —

एका मागून एक दिवस गेले. त्या बेटांतल्या लोकांच्या जीवनरूपी शांत जलाशयावर एकहि तरंग उठला नाहीं. त्या तिघां प्रवासीगड्यांनीं एकहि कायदा व नियम पाळला नाहीं. नीट रीतसर बसावयाचे नाहींत, उठावयाचे नाहींत, बोलावयाचे नाहींत, चालावयाचे नाहींत, असा क्रम चालला होता. इतकेंच नाहीं तर उलट नियमानुसार वर्तन करणारांनाच ते मनसोक्त हंसत.

एकदां दरबारी मंडळीनें त्यांच्याकडे जाऊन हळूच विचारलें कीं ‘नियमांप्रमाणें तुम्ही वागत नाहीं याचें कारण काय ?’

‘कारण ? कारण दुसरें काय ? आमची खुषी.’

हें उत्तर ऐकून दरबारी मंडळी कुंभकर्णी निद्रेतून जागे झाल्यासारखी खोलगट व गुहेंतून येणाऱ्या आवाजाप्रमाणें पोकळ स्वरानें म्हणाली, ‘खुषी ! म्हणजे काय बुवा ?’

त्या खुळ्यांना खुषी म्हणजे काय माणूस आहे कीं काय तेंच अगोदर कळेना. पण हळूं हळूं सगळ्या लोकांना ती गोष्ट समजावयास लागली.

कुमाराच्या वर्तनाचें सूक्ष्म अवलोकन केल्यावर त्यांच्या डोक्यांत थोडथोडा प्रकाश पडूं लागला. पहिली गोष्ट त्यांना ही कळली कीं ते आजपर्यंत ज्या दिशेनें जात होते त्याच्या उलट दिशेनें सरळ रेषेंत त्यांना जातां येईल. नंतर दुसरा शोध असा लागला कीं, त्यांना आतांपर्यंत अज्ञात अशी त्यांना स्वतःला दुसरीहि बाजू आहे. येथून त्यांच्या परिवर्तनाला प्रारंभ झाला.

हें परिवर्तन होऊं लागलें तसे ते तिघेजण आपल्या खुषींतलें एकेक रहस्य प्रकट करूं लागले. हळूंहळू त्या लोकांना कळून आलें कीं जीवन हें नियमांनीं बद्ध होऊन राहणारें नाहीं. स्वतःच्या कारभारांत स्वतःच्या आवडीनिवडीची सत्ता हातीं असण्यापासून मनाला होणारें समाधान त्यांना आतां कळूं लागलें.

पण खुषीशीं जो पहिला संघात घडला त्याचा परिणाम असा झाला कीं, पत्त्यांचें सगळें राज्य हळूंहळूं डळमळूं लागलें, आणि सगळी इमारत कोसळून खालीं येते कीं काय अशी भीति वाटूं लागली. जसा एकादा फार दिवस निद्रिस्त असलेला अजगर जागा होऊन आपल्या शरीराची वेटोळीं हळूंहळूं मोकळी करीत असतां त्याच्या सगळ्या शरीरांत एक प्रकारचा कंप दृश्यमान होतो, तसा देखावा या वेळीं त्या बेटांत दिसत होता.

— ९ —

आतांपर्यंत लालबदाम, इस्पीक, चौकट, आणि फुलवर यांच्या राण्या पडद्यामागें शून्य दृष्टीनें कुणीकडे तरी किंवा खालीं जमिनीकडे पाहत होत्या. आतां वसंतऋतूंत एके दिवशीं तिसरे प्रहरीं लालबदामच्या राणीनें एकाएकीं कुमाराकडे एक नेत्रकटाक्ष टाकिला.

कुमार आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'ओहो! मी आतांपर्यंत समजत होतों कीं हीं चित्रें आहेत! पण ती समजूत चुकीची होती. या चालत्या बोलत्या स्त्रिया दिसतात!'

मग कुमारानें आपल्या सोबत्यांना जवळ बोलावून गंभीर मुद्रेनें म्हटलें, 'गड्यांनो, या स्त्रियांच्या ठायीं कांहीं अपूर्व जादू दिसते. त्या राणीच्या काळ्याभोर व पाणीदार नेत्राच्या कटाक्षाला तिच्या मनांतल्या भावनेनें तेजास्विता चढलेली मी पाहिली, तेव्हां नवीनच निर्माण झालेल्या सृष्टींत प्रकाशाचे प्रथम किरण पडावे तसा मला भास झाला.'

कुमाराचें हें भाषण ऐकून ते सोबती गालांतल्या गालांत हंसले, आणि म्हणाले, 'कुमार, खरेंच कीं काय?'

त्या दिवसापासून राणीची राहणी बिघडत चालली. सगळ्या नियमांचा तिला विसर पडत चालला; इतका कीं ती कांहींचें बाही वर्तन करूं लागली. तिची ठराविक जागा कोठेंहि असली तरी ती आपली कुमाराच्या जवळ उभी असलेली सांपडावयाची. तें पाहून हुजऱ्यानें गंभीर मुद्रेनें भीत भीत हात जोडून म्हणावें, 'मालक आपली जागा ही नाहीं,' तेव्हां तिच्या गालांवर लज्जेची गुलाबी छटा दिसूं लागे. इतक्यांत कुमारानें म्हणावें, 'कांहीं चुकलें नाहीं. येथें हा बंदा सेवेला हजर आहे.'

गंमत अशी होऊं लागली कीं, लालबदामच्या राणीच्या हातून घडणाऱ्या अशा चुकांची चर्चा तिचे लोक करीत; पण तेच स्वतः तशा

चुका करीत. एकक्याला राजांनीं खो द्यावा; राजे व गुलम्ये यांचा घोटाळा होऊं लागला. नयल्या व दहिल्या यांनीं दरबारी मंडळीसारखी ऐट आणावी आणि कनिष्ठ दर्ज्याच्या लोकांनीं खुशाल वरिष्ठ दर्ज्याच्या लोकांसाठीं राखून ठेविलेल्या आसनांवर जाऊन बसावें ! एकंदरींत साराच ब्रह्मघोटाळा माजला !

यापूर्वीं दरसाल वसंतऋतु येत असे, आणि कोकीळ आपल्या लहरीस येईल तेव्हां आनंदानें गात असे. पण लोकांच्या रोमारोमांत भिनून त्यांना जागृति देणारा असा वसंत हा पहिलाच होता. पूर्वींच्या काळांत समुद्राची गर्जनाहि एकाच एका सुरांत होत असे. पण ती गर्जना येवढेंच जाहीर करी कीं एकदां नियम ठरले ते ठरले. त्यांत फेरबदल व्हावयाचा नाहीं. पण आतां त्याच समुद्राच्या लाटा, त्यांचा लखलखाट आणि असंख्य मुखांतून निघणारा ध्वनि यांच्या द्वारें, प्रेमानें व्याकुळ झालेल्या अंतःकरणांत खोल जागीं उत्पन्न होणाऱ्या भावना व्यक्त करूं लागल्या होत्या.

— ६ —

लोकांची पूर्वींची बांधेसूद, नीटनेटकीं, गोंडस, व तेजःपुंज शरीरें कोठें गेलीं ? आतां पहावें तों कोणाच्या तोंडावर प्रेमानें झुरण्यामुळें निस्तेजता आली आहे; कोणी हातून घडलेल्या चुकांबद्दल पश्चात्तापानें दग्ध होऊन बसला आहे; कोणाचें मन संशयानें द्विधा होऊन तोंडावर चिंतेची छाया पडलेली दिसत आहे; कोणी दीर्घ निःश्वास टाकीत आहे; कोणी अश्रु गाळीत आहे; कोणी स्मित करीत आहे; कोणाची छाती धडधडत आहे; कोणी अस्वस्थ आहे; कोणीं चंचल आहे; कोणी ‘ हाय हाय ’ करीत आहे; कोणाची चित्तवृत्ति मनोविकारांनीं क्षुब्ध झाली आहे. प्रत्येकजण आपापल्या शरीराकडे व मुद्रेकडे पाहून दुसऱ्यांशीं आपली तुलना करीत आहे, आणि त्याच्यापेक्षां आपण बरे

येवढेंच समाधान मानून घेत आहे. इस्पिकच्या एक्क्यानें म्हणावें, ' चौकटचा एक्का माझ्यापेक्षां अधिक सुंदर असला तरी आम्ही रस्त्यानें चाललों म्हणजे लोकांची दृष्टि त्याच्यापेक्षां माझ्याचकडे अधिक लागते.' चौकटच्या एक्क्यानें म्हणावें, ' किलवरचा एक्का मोरासारखा उंच मान काढून चालतो. त्याला वाटतें कीं सगळ्या राण्या आपल्या दर्शनासाठीं हपापलेल्या आहेत. पण किती खुळा ! तो मान या पठ्ठ्याचा ' इतकें बोलून तो आरशांत स्वतःचें रूप पाहूं लागतो. हा पुरुषांचा प्रकार झाला.

बायकांची स्थिति तर कांहीं विचारूंच नका, त्यांचा सगळा वेळ नट्टापट्टा करण्यांतच जाऊं लागला. त्या एकमेकींकडे मत्सरानें वारी-सारखी तीक्ष्ण दृष्टि लावून पाहत, आणि एकमेकींवर अशी टीका करीत कीं ती शब्दांनीं लिहून दाखविण्याची सोय नाहीं.

तरुण पुरुष झाडांखालीं गळून पडलेल्या पानांवर खुशाल ऐदी-पणानें हातपाय पसरून बसत, आणि तरुण स्त्रिया फिक्या निळ्या रंगाचीं वस्त्रें परिधान करून फिरत फिरत त्याच अरण्यांत त्याच जागीं येऊन जणूं काय सहजगत्या त्या तरुणांकडे नेत्रकटाक्ष फेकीत. मग त्या तरुणांपैकीं विशेष धीट असा एकादा तरुण उठून त्या स्त्रीच्या जवळ जाई पण त्याच्या ओठावाटे शब्द बाहेर पडेना. तो तसाच चित्रासारखा तेथें उभा राही. आणि अनुकूल संधि हातची निघून जाई.

वर झाडांच्या फांद्यांवर बसून कोकिळ गात होते. दक्षिणचा खोड-साळ वारा सुटून स्त्रियांच्या वेणीचे केस पताकासारखे उडवीत होता. आणि त्या स्त्रियांच्या कानांत कांहीं गुणगुणून त्यांच्या चित्तांना क्षुब्ध करीत होता. झाडांचीं पानें हालून कुरकुर असा सानंद ध्वनि काढीत होतीं, आणि समुद्राची अखंड गर्जना तरुणांच्या व तरुणींच्या मनां-तल्या प्रेमकल्लोळांना हेलकावे देत होती.

त्या तिघा सोबत्यांनीं याप्रमाणें पत्त्यांच्या राज्यांतल्या लोकांच्या

२९३७२
बा.वा
१०/८/५५
३९३१६७

शुष्क जीवनांत नवें चैतन्य प्रविष्ट करून त्यांच्या मनोविकारांना भरती आणिली होती.

— ७ —

भरती जोराची होती खरी पण तिच्यांत थोडेसें व्यंग होतें. त्यामुळें ती थबकून राहिली होती. कोणी खुल्या दिलानें व स्पष्ट शब्दांनीं बोलेना. फार सावधपणानें एखादें पाऊल पुढें टाकीत व लागलीच दोन पावलें मागें सरत. मनांत अपूर्ण राहिलेल्या इच्छांच्या राशी पडल्या होत्या; पण त्या केवळ गंधर्वनगरीसारख्या ! त्यांचे ओठ हलत, पण अंत:करणांतलें गूढ ओठावाटे बाहेर पडेना.

शेवटीं काय बिघडलें आहे तें कुमाराच्या ध्यानांत आलें. त्यानें त्या राज्यांतल्या एकेकाला बोलावून म्हटलें, " तुमच्या सनया, झांजा, संबळ वगैरे वाद्यें आणा, आणि सगळीं बरोबर वाजवा. लालबदामाच्या राणीचा स्वयंवर आज व्हावयाचा आहे. त्या निमित्तानें आनंदोत्सव करा. '

नयल्या दहिल्या सनया वाजवूं लागले; सत्त्या अठ्ठ्यांनीं दुसरीं कांहीं वाद्यें तोंडाला लावून फुंकलीं. दुर्‍यातिर्‍यांनीं संबळ, ताशे वगैरे वाजविण्यास सुरुवात केली. सर्वजण जोराजोरानें कांहीं ना कांहीं वाद्य वाजवूं लागले.

ह्या वाद्यांचा जो मोठा गजर झाला त्यांत सगळ्या हुंदक्यांचा व सुसकार्‍यांचा लोप होऊन गेला, आणि मग हंशा व शब्द यांचा जंगी लोंढा आला ! भलभलत्या धाडसाच्या मागण्या सुरू झाल्या व त्या तशाच धिटाईनें स्पष्ट शब्दांनीं नाकारल्या गेल्या. थट्टा, विनोद, गप्पाष्टकें, मजा याच गोष्टी जिकडे तिकडे दिसूं लागल्या.

पण लालबदामची राणी मोतिया रंगाचें पातळ नेसून कुंजवनांत स्तब्धपणानें बसून दुरून ती सगळी गडबड ऐकत होती. तिचें तिकडे

ध्यान नव्हतें. ती डोळे मिटून प्रेमाचें सुखस्वप्न पहात होती. तिनें डोळे उघडतांच जमिनीवर बसून तिच्याच मुखाकडे टक लावून बसलेली कुमाराची मूर्ति तिला दिसली. तिनें आपल्या दोन्ही हातांनीं डोळे झाकून घेतले, आणि अंतर्यामीं आनंदामुळें होणाऱ्या गुदगुल्यामुळें कंपायमान होऊन ती मागें सरली.

तो सबंध दिवस कुमारानें एकटें समुद्रतीरावर हिंडण्यांत काढिला. राणीची ती आश्चर्यचकित दृष्टि, आणि तिच्या इतर कामचेष्टा यांनीं त्याच्या मनांत पक्कें ठाणें दिलें होतें. त्याची छाती आशेनें उडत होती.

रात्रीं राजवाड्यापाशीं कोण गडबड! फुलांच्या माळा, तोरणें, नानाप्रकारचीं रंगी बेरंगी झुंबरें, आणि दिव्यांच्या प्रकाशाचा लखलखाट यांनीं दिवाणखाना अत्यंत शोभायमान दिसत होता. नोकर चाकर आपला उंची पोषाख घालून कामावर हजर होते. तो आनंदमहोत्सव पाहण्यासाठीं सगळें शहर लोटलें होतें. ठराविक मुहूर्तावर वधू (लालबदामची राणी) हातांत पुष्पहार घेऊन व अधोदृष्टि करून कुमाराच्या पुढें उभी राहिली. स्वतः पसंत केलेल्या वराच्या गळ्यांत तो हार घालण्यासाठीं लज्जेमुळें तिचा हात वर होईना, पण कुमारानें खालीं मान केली आणि तो हार तिच्या हातांतून निसटून योग्य स्थानीं जाऊन बसला. प्रेक्षकसमुदाय शांत चित्तानें हा प्रकार आतांपर्यंत पहात राहिला होता; पण यापुढें ती शांतवृत्ति ठेवणें अशक्य झालें. त्यांनीं हर्षानें टाळ्या वाजविल्या, आशीर्वादाच्या शब्दांचा मोठा घोष केला, आणि निरनिराळ्या प्रकारांनीं आपला हर्ष प्रकट केला. त्या हर्षाचा ध्वनि त्या राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांतसुद्धां ऐकूं गेला. पत्त्यांच्या राज्यांत येवढा ध्वनि आजपर्यंत कधीं कोणी ऐकिला नव्हता.

लग्नसोहळा मोठ्या थाटाचा झाला. कुमाराची दुःखीकष्टी आई या

समारंभासाठीं मुद्दाम सोन्याच्या जहाजांत बसून येवढा मोठा समुद्र उतरून आली होती. तिला केवढी धन्यता वाटली असेल !

या राज्यांतले लोक आतां नियमांना चिकटून न राहतां आपल्या इच्छेप्रमाणें बऱ्यावाईट रीतीनें राहूं लागले.

---

# किरण सहावा

## ऋणमोचन

" सरकारी खजिन्यांत चोरी ! वा: ! कोतवालसाहेब, चोराचा पत्ता लावून त्याच्या मुसक्या बांधून लवकर आणिलें तर बरी गोष्ट आहे, नाहींतर आपलें डोकें उडविलें जाईल. "

अशी ताकीद राजाकडून खुद्द कोतवालाला मिळाल्यावर मग नगर-रक्षकांच्या खटपटीला काय विचारतां ? प्रत्येक घरनूघर आणि सगळे रस्ते, गल्ल्या, व बोळ यांतून चोराचा तपास बारकाईनें चालला.

गांवाच्या बाहेर एका पडक्याशा देवळांत वज्रसेन निजला होता. हा तक्षशिलेचा एक व्यापारी कांहीं घोडे विक्रीसाठीं घेऊन काशीला आला होता. पण वाटेंत लुबाडला जाऊन रिक्तहस्तानें आपल्या देशीं परत जाण्यास कष्टानें निघाला होता. नगररक्षकांना वाटलें बरें सांपडलें आहे हें कूळ ! त्याच्या हातापायांत जड शृंखला ठोकून त्याला ते कारागृहा-कडे घेऊन चालले.

त्यावेळीं लावण्यवती श्यामसुंदरी चित्तरंजनार्थ झरोक्यांत बसून तेथून खालीं लोकांच्या हालचाली पाहत होती. लोक येत होते, जात होते,

समुद्रांतल्या भरती ओहोटीच्या वेळच्या लाटांच्या सारखी त्यांची हालचाल सारखी सुरू होती.

एकाएकी ती दचकली, आणि म्हणाली, 'महेंद्राच्या सौंदर्यास लाजविणारी ही धिप्पाड आकृति कोणाची बरें असेल? आणि अशा पुरुषाला हे शिपाई एखाद्या चोरासारखें मुसक्या बांधून नेत आहेत हा काय बरें चमत्कार असेल!' असें म्हणून तिनें दासीच्या हातीं कोतवालाकडे चटकन् निरोप पाठविला कीं त्या माणसाला असेचे असेच घेऊन माझ्यापाशीं या.

श्यामसुंदरीचा हा निरोप ऐकतांच कोतवालसाहेबांच्या अंगावर काटा उभा राहिला. तो लज्जेनें अधोवदन केलेल्या वज्रसेनासह तिच्या महालांत गेला.

अदबीनें मुजरा करून कोतवाल म्हणाला, 'आज माझी आठवण केली ही माझ्यावर मोठी कृपा समजतों. पण मी सरकारी कामासाठीं घाईघाईनें जात आहे. मला निरोप मिळावा.'

एकाएकीं वज्रसेनानें वर मान करून म्हटलें, "हा काय तमाशा चालला आहे मला कळत नाहीं. मी परदेशी माणूस, कोणाच्या अध्यांत ना मध्यांत, असें असतां मला गांवाबाहेरून पकडून आणण्याची काय तव्यत लागली कोण जाणे!'

श्यामानें ते शब्द ऐकून म्हटलें, 'परदेशी मुशाफिरा! हा तमाशा नाहीं. माझे सगळे दागिने मोबदल्यांत देऊन तुझी सुटका मला करतां येती तर मी मोठ्या खुषीनें केली असती. तुझा मानभंग झालेला पाहून माझें अंतर्याम खरोखर तुटत आहे.'

हे शब्द उच्चारतांना तिच्या डोळ्यांत खरोखरच दोन अश्रुबिंदु उभे राहिले होते, व त्यांनीं त्याच्या नांवावरचा डाग धुवून टाकिला असें दिसत होतें. ती कोतवालाला म्हणाली, 'माझ्या अंगावरचे हे सगळे अलंकार घ्या, पण या निरपराधी माणसाला सोडा.'

तो म्हणाला, ' हें कसें व्हावें ? अगदीं अशक्य गोष्ट आहे. सरकारच्या खजिन्यांत चोरी झाल्यावरून महाराज अतिशय संतापले आहेत. कोणाचा तरी बळी घेतल्यावांचून त्यांच्या रागाचें शमन होणार नाहीं. '

शेवटीं श्याम अतिशय काकुळतीनें म्हणाली, ' निदान दोन दिवस तरी याला जिवंत ठेवा. माझी येवढी विनंति तुम्ही ऐकाच. '

दुसऱ्या दिवशीं रात्रीं तिनें तुरुंगाचा दरवाजा उघडून एका कोठडींत प्रवेश केला. तिच्या हातांत दिवा होता. वज्रसेन शृंखलाबद्ध होऊन उद्यां आपण सुळावर चढणार म्हणून देवाचें एकाग्रतेनें स्मरण करीत होता असें तिला त्याच्या प्रकाशांत दिसून आले.



त्या स्त्रीच्या नेत्रकटाक्षाच्या प्रतापानें पाहरेवाल्यालाहि पुढें होऊन कैद्याच्या शृंखला काढण्याची बुद्धि झाली.

त्या स्त्रीची प्रफुल्लित, कोमल आणि तेजस्वी मुद्रा पाहून कैदी आश्चर्यचकित झाला. त्याचा कंठ दाटून आला. घोगऱ्या आवाजानें तो म्हणाला, ' माझ्या दुर्दैवाच्या भयाण काळरात्रीनंतर उषेच्या प्रभेसारखी ही कोणाची प्रभा मी या कोठडींत पहात आहे ? आसन्नमरण पुरुषाला अमृतसंजीवनी देणारी माझी मुक्तता करणारी कोणती देवता या पाषाणहृदयी नगरांत आहे ? '

' दयाशील पुरुषा, मीच ती ! ' या वेळीं उठणाऱ्या हास्यतरंगांनीं त्या भयाण कोठडीला एक नवीन भीषणता आणिली होती. हास्याच्या-

विकट हास्याच्या—उसळणाऱ्या भीषण नादाचा अश्रूंच्या सागरांत अनेक प्रकारें पूर्ण लोप होऊन गेला.

ती रडत रडत म्हणाली, ‘ या भव्य राजवाड्याला व त्याच्यांतल्या फरशीला लागलेला कोणताहि पाषाण या श्यामाच्या हृदयाहून कठीण नसेल ! ’ तिनें वज्रसेनाचा हात धरून त्याला कारागृहांतून बाहेर आणिलें.

अरण्याच्या पूर्व बाजूला आणि वारुणानदीच्या तीरावर उषःकालाचीं वाढतीं चिन्हें दिसत होतीं. एक नाव घाटापाशीं बांधून ठेविलेली होती.

त्या स्त्रीनें नावेवर चढून म्हटलें, ‘ परदेशी मुशाफिरा, माझ्या प्रियकरा, ये. हें ध्यानांत ठेव कीं मी बाकीचीं सगळीं बंधनें तोडून तुझ्या जीविताशीं माझ्या दैवाची गांठ बांधिली आहे. आतां माझ्या हृदयाचा व प्राणांचा मालक तूं आहेस. ’

त्यांनीं नाव सोडली.

नदीच्या दोन्ही तीरांवर पक्ष्यांनीं काढलेल्या आनंदसूचक स्वरांनीं तें सगळें अरण्य दुमदुमून गेलें. त्यानें तिला उराशीं धरून म्हटलें, ‘ प्रिये, माझ्या सुटकेसाठीं तुला काय द्यावें लागलें ? हा अकिंचन परदेशी मुशाफर तुझा किती ऋणी आहे हें मला कळलें पाहिजे. ’ पण तिनें घट्ट आलिंगन देण्यापलीकडे त्याची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं कांहीं केलें नाहीं. येवढेंच म्हणाली कीं, ‘ त्याचें आजच काय ? ’

अनुकूल वाऱ्याच्या झोतावरोबर नाव झपाट्यानें गेली. भगवान् सहस्ररश्मी नारायण डोक्यावर आला. नदीवर स्नानासाठीं गेलेल्या खेडगांवच्या स्त्रिया स्नानादि कर्मे उरकून ओलेत्यानेंच डोक्यावर पाण्याचें हंडे घेऊन घरीं आल्या. सगळे लोक आपल्या घरीं भोजनाच्या सिद्धतेंत गुंतले होते. रस्त्यानें कोणी फिरकत नव्हतें.

दुपारच्या वेळीं न्याहारीसाठीं व विश्रांतीसाठीं नावाडी नाव घाटाला

लावून तिचा नाडा वटवृक्षाला बांधीत. या ठिकाणीं त्यांची नाव लागली होती. विश्रांतीचा समय होता. वज्रसेनाला त्या स्त्रीच्या प्रेमाची आंच असह्य वाटत होती. त्याचा कंठ दाटून आला होता. तो पुढील शब्द अस्फुट रीतीनें उद्गारला. तो म्हणाला, ‘ तूं मला क्षणमात्र बंधनांतून मुक्त केलेंस खरें, पण अक्षय बंधनानें बद्ध करून ठेविलें आहेस. तूं माझी सुटका कशी केलीस तें सांग. मला तर माझ्या सुटकेची गोष्ट अशक्य कोटींतली वाटत होती. तुझ्या या उपकाराची फेड स्वतःचे प्राण अर्पावे लागले तरी अर्पून करावयाची अशी मी प्रतिज्ञा केली आहे. माझ्यासाठीं तुला काय काय करावें लागलें तेवढें कळावें इतकीच माझी इच्छा आहे. ’

स्त्रीनें तोंडावर पदर घेऊन येवढेंच म्हटलें कीं, ‘ तें सांगण्याची वेळ अजून आली नाहीं. ’

इकडे दिवसाची प्रकाशनौका आपलें सोनेरी शीड उभारून पश्चिमेकडच्या मुक्कामाच्या स्थळीं पोंचली, आणि त्याच वेळीं श्यामसुंदरीची नांव संध्याकाळच्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर वाहत जाऊन तीराला लागली. हें ठिकाण गर्द छायेचें होतें. चंद्रप्रकाशाच्या रेषा नदीच्या प्रवाहाच्या लाटांवर हेलकावे खात होत्या. झाडींत कीटकांचें किर्रर गाणें चाललें होतें. त्याचा आवाज सतारीच्या नादासारखा मधून कर्णास सुखवीत होता. श्यामनें दीर्घ निश्वास सोडून मुशाफराच्या अंगावर अंग टाकिलें. तिच्या वेणीचे मृदु, काळेभोर व लांबसडक केस त्या तरुणाच्या छातीवर पडून छाछू करणाऱ्या मंत्राप्रमाणें त्याच्या अंतःकरणाला भारून टाकीत होते. श्यामा म्हणाली, “ मी तुमच्यासाठीं अतिशय मोठें साहस केलें आहे. पण तें तुम्हांला आज सांगणें हें त्याहूनहि मोठें साहस होईल. मी तें आतां अगदीं थोडक्यांत सांगतें. पण या अटीवर कीं तुम्हीं तें ऐकल्यानंतर मनांत ठेवतां उपयोगीं नाहीं. या कानानें ऐकिलें कीं त्या कानानें लागलीच सोडून दिलें पाहिजे.

" उत्तिथ नांवाचा एक तरुण माझ्यावर प्रेम करणारा होता. पण माझ्याकडून उलट प्रेमाचें कांहीं चिन्ह न दिसल्यामुळें तो हताश झाला होता. निराशेनें तो सारखा तळमळत होता. त्याला मीं माझ्या कार्यासाठीं हाताशीं धरलें. तुमच्यावरचा चोरीचा आळ त्यानें स्वतःवर घेतला. माझ्यासाठीं त्यानें अशा रीतीनें विलक्षण स्वार्थ त्याग केला ! आजपर्यंत माझ्या हातून कधीं घडलें नव्हतें असें घोर पातक मी तुमच्यासाठीं केलें. "

मंदप्रभ चंद्र अस्तास गेला. अरण्यांतली सगळी गडबड थांबून तेथें भयप्रद शांतता स्थापित झाली. पक्षीगण निद्रासुखांत गर्क झाले. हळहळू मुशाफराचे हात श्यामाच्या कंबरेभोंवतीं होते त्यांचा विळखा सुटत चालला. वज्रसेन मुखस्तंभासारखा शून्य दृष्टीनें तिच्याकडे पाहात पाषाणासारखा निश्चल राहिला. त्याच्या हातांचा आधार सुटल्यामुळें श्यामाचा देह वृक्षापासून तुटून पडलेल्या वल्लीप्रमाणें गडबडत जाऊन त्याच्या पायापाशीं पडला. तेव्हां ती थोडीशी शुद्धीवर आली आणि त्याच्या गुडघ्यावर हात टेकून शुष्क स्वरानें म्हणाली, ' माझ्या अपराधाची क्षमा करा. न्यायी परमेश्वराच्या घरीं मला पातकाबद्दल शासन भोगावें लागणारच आहे. पण तुम्ही तरी आणखी त्यांत भर घालूं नका. ' वज्रसेनानें पाय काढून घेऊन व तिच्याकडे तीव्र नेत्रकटाक्ष टाकून म्हटलें, ' माझ्या जीवाशीं तुला काय करावयाचें होतें ? अगे दुराचारिणी, तूं आपल्या पातकी कृत्यासाठीं माझा प्राण विकत घेऊन त्याला अक्षय कलंक लावून ठेविला आहेस. तुझ्या ऋणांत राहणाऱ्या या माझ्या जीवास धिक्कार असो. धिक्कार ! धिक्कार माझ्या अशा जीवनाला ! '

इतकें बोलून तो उठला. कोठें जावयाचें तें त्याचें त्यालासुद्धां ठाऊक नव्हतें. पायांखालचीं वाळलेलीं पानें सळसळ आवाज करीत होतीं. अरण्यांतल्या प्रचंड वृक्षांच्या आकृति अंधारांत चमत्कारिक आणि भीषण

दिसत होत्या. सर्व दिशा अगदीं चूप राहिल्या होत्या. जणूं काय त्यांचा कंठ दाटला होता! लतांनीं आच्छादित तें सगळें अरण्य जणूं काय त्यांच्या कृत्याचा निषेध करीत होतें! थकलाभागलेला तो मुशाफर जीव गळाल्यासारखा खालीं बसला. पण त्याच्या मागें पिशाचाच्या आकृतीसारखें कोण उभें होतें?

अंधारांत ती स्त्री त्याच्या मागोमाग चालली होती. काव्याकुट्यांतून पायीं चालण्याची कधीं संवय नसल्यामुळें तिचे पाय दुखत होते, तरी ती चालली होती. पायांच्या दुखण्याकडे तिचें लक्ष नव्हतें.

मुशाफरानें रागानें मुठी आवळून म्हटलें, ‘ अगे चांडाळणी. माझा पिच्छा अजूनहि सोडीत नाहींस ना?’

विद्युद्वेगानें ती पुढें होऊन त्याच्या पायांवर पडली, आणि कांपऱ्या स्वरानें म्हणाली, ‘ आतां मी हे पाय कधीं सोडायची नाहीं. तुम्ही मला शिक्षा करा. हवी तर माझ्या हृदयाला खोल जखम करा; हे प्राण घ्या आणि माझ्या बक्षिसाचा व शिक्षेचा एकदम अंत करा.’

आकाशांतल्या नक्षत्रांनासुद्धां हा प्रकार पाहून भय वाटलें कीं काय कोण जाणे! त्यांनींसुद्धां यःपलायन केलें. जमिनीच्या पोटांतल्या झाडांच्या मुळांनासुद्धां भीतीनें कंप सुटला असेल. अर्धस्फुटित अशा तिच्या दीनवाणीनंतर क्षणभरांत कोणीतरी धाडदिशी जमिनीवर अंग टाकिलें; आणि निश्चेष्ट होऊन पडलें.

वज्रसेन नदी उतरून पार गेला. रात्र संपून उषःकाल झाला. सूर्याचे कोमल किरण नदीकांठच्या देवळाच्या कळसांवर पडून विद्युत्प्रभेचा आभास देऊं लागले. वज्रसेनाचें तिकडे लक्षच नव्हतें. तो आपला वेड्यासारखा रानोमाळ भटकत होता. सारा दिवस असा त्यानें घालविला. दुपारचे सूर्याचे प्रखर किरण चाबकाच्या फटकाऱ्यासारखे त्याच्या शरीरावर आघात करीत होते. त्याचेंहि त्याला भान नव्हतें. नदीवर पाण्यासाठीं येणाऱ्या कित्येक पोक्त स्त्रियांनीं त्याची कींव करून “ तूं कोण?

येथें असा कां भटकत आहेस ? आमच्या घरीं येतोस काय ? " म्हणून कित्येकदां विचारलें, पण त्याच्या तोंडून अक्षर निघेल तर शपथ ! तहानेनें त्याचा जीव कासावीस झाला होता. पण त्या वेड्याला घोटभर पाणी पिण्याचें सुचेना ! संध्याकाळ होत आली तरी त्याच्या अंगाचा दाह शमेना. पतंग जसा दिव्याकडे उडी घेतो तशी त्यानें झपाट्यानें नावेकडे धाव ठोकली.

नदीच्या वाळवंटांत पडलेला स्त्रीच्या पायांतला एक पैंजण त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें तो उचलून हजारदां आपल्या हृदयापाशीं घट्ट धरला. त्या पैंजणाचा नाद त्याचें हृदय भेदून जातो कीं काय असें दिसलें.

पलीकडे एक निळ्या रंगाचें भरजरी रेशमी लुगडें पडलेलें दिसलें. त्यानें त्यांत आपली मुंडी जी खुपसली ती तो लवकर बाहेर काढीचना, त्याचा सुगंध घेण्यांत तो इतका तल्लीन झाला होता.

तोहि दिवस गेला, चंद्र सप्तपर्ण वृक्षाच्या आडून वज्रसेनाच्या हालचाली पाहूं लागला. हा आपला समोरच्या अरण्याकडे सारखी टक लावून पाहात होता. मधून मधून 'हा प्रिये ! हा प्रिये ! लवकर ये ' म्हणून समोर दिसणाऱ्या आकृतीला आळवीत होता. पण ही खरोखर कोणाची आकृति होती कीं नुसता भास होता ?

'प्रिये ! लवकर ये ' यावर 'ही पहा आलें ' इतके शब्द उच्चारून श्यामानें त्याच्या चरणावर लोटांगण घातलें. आणि म्हटलें, 'या दासीला क्षमा असावी, किती पाषाणहृदयी मी ! या हृदयाला खरोखर शासनच पाहिजे, आणि तें प्रियकराच्या या हातानेंच झालें पाहिजे. '

क्षणमात्र वज्रसेनानें तिच्या मुद्रेकडे पाहिलें आणि तिला आलिंगन देण्यासाठीं हात पुढें केले. लागलीच त्याची बुद्धि पालटली. त्यानें तिला मागें ढकललें आणि रागीट मुद्रेनें म्हटलें, 'तूं परत कां आलीस ? '

त्यानें आपलेजवळचा पैंजणहि बाहेर काढून जळजळीत निखाऱ्या-सारखा झटकन फेकून दिला, आणि जवळ पडलेलें लुगडेंहि लाथेनें दूर लोटलें. तो बसला होता ती जमीन मूर्तिमंत अग्नीसारखी त्याच्या अंगाची आग आग करीत होती. त्यानें डोळे घट्ट मिटून घेतले, तोंड फिरविलें, आणि म्हटलें, ' येथून जा, आतां मला तोंड दाखवूं नकोस. '

ती स्त्री अधोवदन होऊन किंचित् कालपर्यंत स्तब्ध राहिली. नंतर तिनें त्यांच्यापुढें लोटांगण घातलें, आणि पुनः उठून ती चालती झाली. नदीच्या काठानें जातां जातां रात्रींच्या स्वप्नाप्रमाणें ती दिसे-नाशीं झाली.

# किरण सातवा

## ऋण

१

रात्र संपतांच सुषेण तुरुंगांतल्या आपल्या कोठडींत उठून देवाचें नामस्मरण करीत बसला होता, इतक्यांत त्या कोठडीचा दरवाजा उघडला, आणि हातांत कंदील घेतलेली श्यामाची मूर्ति त्याच्यापुढें उभी राहिली.

तिच्या हुकूमावरून त्याच्या हातापायांतल्या बिड्या काढण्यांत आल्या. तेव्हां तो तिला म्हणाला, ' निराशेच्या काळ्याकुट्ट अंधारांत दयारूपी चांदणी चमकतांना तूं मला दिसतेस. '

'काय ? दयारूपी चांदणी ?' हे शब्द ती ओठांतल्या ओठांत पुटपुटली, आणि लागलीच इतक्या मोठ्यानें हंसली कीं तिच्या हास्याचे तरंग स्तब्धतामय अशा ज्या तुरुंगाच्या भिंतीवर जोरानें आदळले, आणि मंत्र उच्चारून भुतांचा तांडा उठवावा त्याप्रमाणें त्या भिंतीपासून प्रतिध्वनि निघूं लागले.

— २ —

पहाट झाली. वारुणानदीच्या कांठच्या तालराजीच्या फटींतून प्रकाशाचे किरण चमकूं लागले. श्यामानें नावेंत पाय ठेवून म्हटलें, "प्रियकरा, या; आपण भूतकालच्या कटकटींतून मुक्त होऊन अज्ञात भविष्यकाळाकडे रमतगमत जाऊं."

नाव नदीच्या प्रवाहांत चालूं लागली. सुषेण श्यामाला जवळ घेऊन म्हणाला, "एका अर्थी तूं माझें स्वातंत्र्य मला परत दिलेंस खरें; पण तें करतांना मला आपला शाश्वतचा गुलाम करून ठेविलेंस ! पण हें तूं कसें केलेंस तें सांग पाहूं ?" श्यामा म्हणाली, "सांगेन; पण आतांच नाहीं."

— ३ —

दुपार झाली, सूर्य डोक्यावर आला. नदीवर धुण्यापाण्यासाठीं येणाऱ्या गांवच्या बाया धुणीं धुऊन आणि कंबरेवर किंवा डोक्यावर पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन घरोघर परतहि गेल्या. सकाळचा भाजीबाजार उठला; त्या वेळच्या बेटामधून गेलेल्या पायवाटेनें एकहि मनुष्य फिरकतांना दिसत नव्हता.

दुपारचा उष्ण वारा सुटूं लागला. नदीच्या कांठीं मोहऱ्यांचीं शेतें होतीं. रोपें फुलांनीं लादलेलीं होतीं. तो देखावा फार रमणीय होता. पण तिकडे सुषेणचें लक्ष नव्हतें. तो पुनः हळूंच शामच्या कानांत म्हणाला, "माझ्यावर उपकाराचें जें ऋण झालें आहे तें माझ्या हातून

फिटण्याची आशा नाहींच म्हणा; पण तें ऋण आहे तरी किती तें कळलें म्हणजे मनांतल्या मनांत त्याची घोकणी तरी करीत बसतां येईल. ”

श्यामानें “ सांगेन, पण आत्तांच नाहीं ” हें ठराविक उत्तर पुनः दिलें.

— ४ —

संध्याकाळ झाली. सूर्यप्रकाशानें अंधाराशीं पाहऱ्याची अदलाबदल केली. श्यामाची नाव नदीच्या कांठीं येऊन लागली. तिला एका पडक्या देवळाजवळ वडाच्या झाडाला बांधून ठेवण्यांत आलें. चंद्राचा प्रकाश तालराजींच्या फटींतून आल्याकारणानें खंडित होऊन पाण्याच्या प्रवाहा-वर पडल्यामुळें व त्या प्रवाहांत पाण्याच्या लाटा नाचत असल्यामुळें त्या प्रकाशाचीं प्रतिबिंबें मुलांनीं पाण्यांत सोडलेल्या खेळांतल्या कागदी नावांचा भास उत्पन्न करीत होतीं.

सुषेणानें दोनदां विचारलेला प्रश्न श्यामाच्या मनाला सगळ्या दिवसभर तर दुःख देत होताच; पण आतां रात्रींच्या स्तब्धतेमुळें त्याला एक प्रकारचें भीतिप्रद स्वरूप प्राप्त झालें. तिनें दीर्घ उसासा टाकून म्हटलें—

“ मीं आपल्यासाठीं कष्ट केले खरे, पण मीं जें कांहीं केलें तें तोंडानें बोलून दाखविणें हें अधिक कष्टप्रद आहे. म्हणून मी तें अगदीं थोड-क्यांत सांगत्यें, आणि आपणहि तें थोडक्याच वेळांत विसरून जावें. तारुण्याच्या उन्मादांत असलेल्या त्या उत्तियानें माझ्यापुढें आपण स्वतःच्या प्राणालाहि कस्पटाप्रमाणें मानतों असें दाखविण्यासाठीं आपल्या ( तुमच्या ) गुन्ह्याचा सगळा भार स्वतःच्या शिरावर घेतला. प्रियकरा, साऱ्या जन्मांत माझ्या हातून अत्यंत मोठें पापकृत्य घडलें तें हेंच, आणि तें आपल्यासाठीं मी केलें. ”

— ५ —

चंद्र अस्ताला गेला. त्या रानांत सर्वत्र अंधार आणि स्तब्धता यांचें राज्य होतें. श्यामाच्या कंबरेभोंवतीं सुषेणनें घातलेल्या हातांच्या मिठीची दृढता कमी होऊन तो खालीं पडला. त्या दोघांमध्यें अंतराय करणाऱ्या सर्व गोष्टींना–स्तब्धता आणि स्थलावकाश यांच्यांतसुद्धां–पाषाणाप्रमाणें दृढता आली !

श्यामानें एकाएकी जमिनीवर अंग टाकलें, आणि त्याचे पाय घट्ट धरून अश्रूंच्या अभावीं शुष्क अशा घोगऱ्या आवाजानें म्हटलें, "परमेश्वर मला जी कांहीं शिक्षा करायची ती करील; पण आपण करूं नका."

सुषेण उठून उभा राहिला. त्यानें आपलें अंग तिच्या मिठींतून सोडविलें, आणि झाडाच्या छायेकडे धाव ठोकली.

— ६ —

त्याच्या चालण्यानें झाडाखालीं पडलेल्या वाळलेल्या पानांचा सळसळ आवाज होत होता. झाडांच्या दाटीमुळें हवेला मोकळेपणानें खेळतां येत नव्हतें. त्या कुंद हवेंत कुजक्यानासक्या काड्या व पानें यांच्यापासून निघणाऱ्या दुर्गंधीची भर पडली होती. त्यामुळें तेथें क्षणभर उभें राहण्यानें मनुष्य मूर्च्छित व्हावयाचा अशी ती जागा होती.

शेवटीं तो दमून खालीं बसला. रानांत पेटलेल्या वणव्याच्या मागोमाग जाणाऱ्या कृष्णवर्ण चिन्हाप्रमाणें श्यामा सुषेणाच्या मागोमाग गेली होती; पण ती जवळ असल्याचें ज्ञान त्याला आतांच एकाएकीं झालें.

तो जोराच्या आवाजानें म्हणाला, 'माझा पिछा सोड.' तिनें त्याच्या मनांत करुणा उत्पन्न व्हावी म्हणून नानाप्रकार करून पाहिले. केस मोकळे सोडले, मिठी मारली, चुंबन घेतलें, आणि सुसकारे सोडले.

ती म्हणाली, 'नाहीं, मीं कध्धीं सोडणार नाहीं. आपण माझा प्राण घेऊन आपल्या हातानें मला शिक्षा करा; म्हणजे आपला अपराध व माझा अपराध हे सारखे होतील.'

तें ऐकून रानांतल्या झाडांच्या आंगावरसुद्धां शहारे आले, आणि त्यांना भीतीनें आमूलाग्र कंप सुटला. अर्धस्फुट असा रडण्याचा शब्द प्रथम आला, आणि मग एकदम धप्प असा आवाज झाला.

— ७ —

सकाळीं सुषेण झाडींतून बाहेर आला, तेव्हां देवाच्या क्रोधयुक्त नेत्र-कटाक्षाप्रमाणें मंदिराच्या कळसापासून परावर्तित झालेला प्रकाश चमकत होता. सुषेण वाळवंटांतच दुपारपर्यंत भटकला. दुपार झाली तेव्हां उष्णतेनें त्याचें रक्त तापूं लागलें.

संध्याकाळीं उन्मनावस्थेंत असलेल्या पुरुषाप्रमाणें तो नावेकडे चालत गेला. अस्तास जाणाऱ्या सूर्याच्या शेवटच्या सोनेरी किरणाप्रमाणें नावेंत गादीवर पडलेलें एक कंकण त्याला दिसलें. त्यानें तें झटदिशीं उचलून आपल्या हृदयापाशीं घट्ट धरलें, आणि कोपऱ्यांत पडलेल्या शेल्याच्या मऊ घडींत तोंड खुपसून त्या शेल्याचें मार्दव व सुगंध यांचा अनुभव घेण्याचा प्रयत्न तो करूं लागला.

— ८ —

जास्त जास्त रात्र होत चालली. चंद्राची कोर त्याच्यावरच्या अभ्र-पटलामुळें फार क्षीण दिसत होती. सुषेण नावेच्या तक्त्यावर उभा राहिला. त्यानें भय उत्पन्न करणाऱ्या झाडांच्या स्तब्धतेकडे आपले दोन्ही हात पुढें केले, आणि म्हटलें, 'प्रिये, सावध हो, आणि मला पुन: येऊन भेट.'

या वेळीं अंधेरांतून बाहेर वाळवंटांत एक मूर्ति आलेली दिसली. ती काय पिशाचमूर्ति होती किंवा नुसता भास होता?

'ही आल्यें' असे शब्द हळूंच तिच्या तोंडून आले. नावेवर चढल्यावर ती आणखी म्हणाली, 'आपलें मन खरोखर दयाळु म्हणून ऐन वेळीं आपला हात मला मारून टाकण्यास कचरला.'

त्यानें तिच्याकडे टक लाविली, पण कितीहि वेळ पाहिलें तरी डोळ्यांची तृप्ति होईचना. तिला उराशीं धरावें म्हणून त्यानें हात पुढें केले; पण एकाएकीं अंगांत कांहीं संचारल्यासारखें होऊन त्यानें माघा घेतली. 'तूं परत कां आलीस?'

— ९ —

ती स्त्री क्षणभर चित्रासारखी अगदीं निश्चल उभी राहिली, आणि मग त्याच्या चरणीं वंदन करून उठल्यावर जागृतीच्या आगमनाबरोबर अदृश्य होणाऱ्या सुषुप्तावस्थेंतल्या स्वप्नाप्रमाणें ती हळूं हळूं अंधारांत अदृश्य झाली.

# किरण आठवा

## प्रत्यावर्तन

— १ —

रायचरण यजमानापाशीं नोकरीस राहिला तेव्हां बारा वर्षांचा होता. जातभाई म्हणून यजमानानें त्याच्यावर कृपा केली, आणि मुलाला (अनुकूलला) संभाळण्याचें काम त्याच्याकडे सोंपविलें. मुलगा हाता-खांद्यावर खेळविण्यासारखा होता, तो हळूं हळूं मोठा होऊन शाळेंत

जाऊं लागला. शाळेंतून कॉलेजांत गेला आणि तेथून पुढें सरकारच्या न्यायखात्याच्या नोकरींत शिरला. मुलाचें लग्न होईपर्यंत त्याच्या तैनातीला रायचरण हा सदोदित असे.

पण बाईसाहेब घरांत आल्यावर रायचरणला एका यजमानाचे ऐवजीं दोन यजमान झाले. यजमान आहेतच आणि शिवाय बाईसाहेबांची मर्जी संभाळावयाची! यजमानाजवळ त्याचें जें वजन होतें तें आतां बाईसाहेबाकडे गेलें. याची भरपाई देवानें लवकरच केली. अनुकूलला मुलगा झाला, आणि रायचरणानें अहोरात्र खटपट करून त्याचें प्रेम संपादन केल्यामुळें त्या मुलावर त्याची पुरी छाप बसली. रायचरण त्याला हातांत घेऊन झोके द्यावयाचा, त्याच्याशीं लहान मुलांच्या गमतीच्या भाषेंत बोलावयाचा, आपलें तोंड मुलाच्या तोंडाच्या अगदीं जवळ नेऊन पुन: हंसत तें दूर न्यावयाचा, अशा गंमती तो करीत असे.

लवकरच मुलगा रांगायला आणि उंबरठा ओलांडायला लागला. रायचरण त्याला धरायला गेला म्हणजे त्यानें मुद्दाम खोडसाळपणानें हंसून ओरडावें, आणि पळून जावें. त्याला धरायला पाठोपाठ गेलें म्हणजे त्या मुलाच्या अंगचें जें चातुर्य आणि धोरण दिसून येई तें पाहून रायचरण तर अगदीं चकित होई. आणि मोठ्या गंभीर मुद्रेनें आपल्या यजमानणीला म्हणे कीं, ‘ बाईसाहेब, आमचे छोटे यजमान एके दिवशीं खास जज्ज होणार. ’

क्रमाक्रमानें नवे नवे कौतुकास्पद प्रकार घडून येऊं लागले. मूल लुटूलुटू चालायला लागलें, तेव्हां तर रायचरणाला मानवी इतिहासांतल्या एका महत्त्वाच्या काळाइतकें त्याचें महत्त्व वाटलें. बाळ, बा–बा, आ–ई असे शब्द उच्चारून त्या त्या माणसांना हाका मारूं लागलें, तेव्हां रायचरणाचा आनंद त्याच्या पोटांत मावेना. तो ती बातमी साऱ्या दुनियेला सांगत फिरला.

कांहीं काळानें रायचरणाला अन्य प्रकारांनीं आपलें चातुर्य दाखवावें लागलें. उदाहरणार्थ, त्याला घोडा व्हावें लागलें व दातांत लगाम धरून चार पायांवर नाचण्याचा प्रसंग आला. कांहीं वेळीं त्याला मल्ल होऊन आपल्या छोट्या यजमानाशीं कुस्ती करावी लागली; आणि त्यावेळीं जर तो मल्लाच्या पेचानें चीत होऊन जमिनीला पाठ लागून पडला नाहीं तर मोठाच गोंधळ उडत असे.

या सुमारास अनुकूल बाबूची बदली पद्मातीरावरील एका जिल्ह्यांत झाली. तिकडे जातांना वाटेंत कलकत्त्यास उतरून त्यांनीं मुलासाठीं एक लहानशी हातगाडी घेतली. तशाच पिंवळ्या साटीणीचें जाकीट, जरीची टोपी, सोन्याचीं कडीं, पायांतले वाळे वगैरे जिनसा विकत घेतल्या. मुलगा बाहेर जायला निघाला म्हणजे रायचरणानें त्या जिनसा बाहेर काढाव्या, आणि दरबारी ऐटीनें त्या मुलाच्या अंगावर घालाव्या.

पावसाळा लागला. रोज धोधो पाऊस पडूं लागला. ती बुभुक्षित नदी एखाद्या प्रचंड अजगराप्रमाणें शेतें, गांवें, उंच उंच हवेल्या वगैरे एकामागून एक गिळंकृत करूं लागली. दोन्ही बाजूच्या रेतीच्या दरडी कोसळून धब्ब धब्ब आवाज मधून मधून होत होते. नदीच्या प्रवाहाची अक्षयीं होणारी गर्जना दूर अंतरावर ऐकूं येऊं लागली. फेसाचे पुंजकेचे पुंजके झपाट्यानें प्रवाहाबरोबर वाहात जात होते व त्यावरून प्रवाहाच्या वेगाची कल्पना करतां येई.

एके दिवशीं तिसरे प्रहरीं पाऊस थांबला. आकाशांत ढग होतेच पण हवा गार व उल्हासदायक होती. अशा वेळीं रायचरणच्या छोट्या अरेरावी यजमानाला घरांत बसणें आवडलें नाहीं. त्याची स्वारी रथारूढ झाली. रायचरण त्या गाडीच्या दोन दांड्यांमध्यें उभा राहून ती हळू हळू ओढूं लागला. ओढीत ती त्यानें नदीकांठच्या भाताच्या खाचरापर्यंत नेली. त्या वेळीं खाचरांत कोणी नव्हतें व नदीच्या कांठीं नावहि नव्हती. नदीच्या पलीकडे पश्चिमेकडे आकाशांतले ढग चिरलेले दिसत

होते. अस्तास जाणाऱ्या भगवान् सूर्यनारायणाचें वैभव आपली अपूर्व शोभा पूर्णत्वानें दाखवीत होतें. चोहोंकडे पूर्ण शांतता होती. अशा वेळीं त्या मुलानें एकाएकीं आपल्या समोर बोट दाखवून म्हटलें, ' चन्–ना ! पिति फौ. '

जवळच चिखलानें भरलेल्या लहानशा सपाट जागेवर एक कदंब वृक्ष फुलला होता. छोट्या स्वारीनें त्याच्याकडे आशाळभूत दृष्टीनें पाहिलें. रायचरण त्याचा अर्थ समजला. थोड्याच वेळापूर्वी या फुलांच्या कळ्यांची एक लहानशी गाडी त्यानें केली होती, आणि तिला दोरी बांधून तीं इकडे तिकडे ओढून नेतांना या छोट्या स्वारीला इतकी कांहीं मौज वाटली होती कीं, त्या दिवशीं रायचरणाला तोंडांत लगाम धर असा हुकूम करण्याचें मुलाच्या मनांतहि आलें नाहीं. इतका वेळ रायचरण घोडा होता. पण आतां बढती मिळून तो घोड्याचा मोतद्दार झाला होता.

पण फुलें काढण्यासाठीं गुडघाभर चिखल तुडवीत पाण्यांतून जाण्याचें रायचरणाच्या मनांत नव्हतें. म्हणून त्या मुलाचें लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठीं त्यानें म्हटलें, ' मालक ! मालक ! तो पक्षी पहा. ' आणि असें बोलतां बोलतां तोंडानें कांहीं चमत्कारिक आवाज काढून त्यानें हातगाडी त्या झाडांपासून चटकन् निराळ्याच दिशेनें ढकलीत नेली.

पण पुढें जज्ज होणारें मूल अशा रीतीनें थोडेंच फसणार होतें ! रायचरणानें ' तो पक्षी पहा ' म्हटलें खरें; पण पक्षी होता कुठें ?; आणि काल्पनिक पक्षी किती वेळ मनुष्याचें मन वेधून ठेवणार ?

मुलानें हट्टच धरला, तेव्हां आतां काय करावें असा रायचरणाला विचार येऊन पडला. अखेर तो म्हणाला, ' बरें तर मालकसाहेब, तुम्ही येथें गाडींत अगदीं स्वस्थ बसा; मी जाऊन फुलें आणतों. पण संभाळा हो. पाण्याबिण्यापाशीं जायचें नाहीं. ' इतकें बोलून रायचरण फुलें आणण्यासाठीं गेला.

त्याची पाठ फिरल्याबरोबर पाण्याकडे जाण्याचा अनिवार मोह मुलाच्या मनाला पडला.

रायचरणानें ओंजळभर फुलें तोडून तीं आपल्या धोतराच्या पदरांत बांधलीं, आणि मनांत खूष होऊन तो गाडीपाशीं आला. पण मालक कोठें दिसेना, तेव्हां त्याची जी कांहीं घाबरगुंडी उडाली ती त्याची त्यालाच विचारली पाहिजे. ' अहो मालकसाहेब, अहो मालकसाहेब ' अशा विव्हळ अंतःकरणानें तो हाका मारीत सुटला, पण व्यर्थ ! कोठूनहि उत्तर येईना. नदीच्या प्रवाहाचें काय अडलें आहे उत्तर द्यायला ? क्षुद्र मानवी प्राण्याच्या मुलाचा मृत्यु ! त्याच्याकडे काय लक्ष द्यायचें आहे ? असें म्हणून तो प्रवाह आपला घोंघो वाहत होता.

संध्याकाळ झाली. मुलाची आई घरीं काळजी करूं लागली. तिनें मुलाच्या शोधासाठीं कंदील देऊन चोहींकडे माणसें पाठविलीं. यांतलीं कांहीं माणसें नदीच्या कांठीं येऊन पाहातात तो मुलगा कोठें दिसेना. रायचरण मात्र ' अहो मालकसाहेब, अहो मालकसाहेब ' असा वेड्या-सारखा मोठ्यानें हांका मारीत वाऱ्याच्या वेगानें इकडून तिकडे धावत असलेला दिसला.

त्या माणसांनीं रायचरणाला एकदांचें घरीं नेलें. तो आपल्या यज-मानणीच्या पायांशीं लोटांगण घालूं लागला. मुलगा कोठें आहे असें त्याला पुनः पुनः विचारलें, पण त्याच्या तोंडांतून शब्द फुटेल तर शपथ ! तेव्हां मुलगा नदीच्या प्रवाहानें गडप केला असें सर्वांना वाटूं लागलें. शंका घेण्याला येवढीच जागा होती कीं त्याच दिवशीं संध्या-काळीं मुलें चोरून नेणाऱ्या जिप्सी लोकांची एक टोळी गांवांत हिंड-तांना दिसली होती. तेव्हां त्या लोकांचा संशय होता. बाईसाहेब तर शोकानें इतक्या व्याकुळ झाल्या कीं त्या शोकाच्या भरांत खुद्द रायचरण-विषयींचीच शंका त्यांच्या मनांत येऊं लागली. तिनें त्याला एकीकडे

नेऊन मुलगा परत मिळविण्यासाठीं सामदामादि उपायहि करून पाहिले. पण रायचरण काय उत्तर देणार ? तो जोरजोरानें कपाळावर हात मारून आपल्या अदृष्टाला दोष देत होता.

अनुकूलनें आपल्या बायकोच्या मनांतली शंका दूर करण्याची पुष्कळ खटपट केली. 'रायचरणाला आपल्या मुलाला चोरून नेऊन काय प्राप्त होणार ? कशासाठीं तो असें घोर पापकृत्य करील ?' असें त्यानें विचारलें. पण ती म्हणाली, 'मुलाच्या अंगावर दागिने होते ना ? द्रव्याचा लोभ मोठा कठीण आहे. तो मनुष्याच्या बुद्धीला केव्हां आणि कसा झपाटील याचा नेम कोणीं सांगावा ?'

यावर बोलायचें कांहींच राहिलें नाहीं.

२

रायचरण आपल्या गांवीं गेला. आतांपर्यंत त्याला मूलबाळ कांहीं झालें नव्हतें, आणि होण्याची आशाहि राहिली नव्हती. पण ईश्वराची करणी ! एका वर्षाच्या आंत त्याची बायको एका मुलाला प्रसवून स्वर्गवासी झाली.

प्रथम त्या मुलाला पाहतांच रायचरणाच्या दृष्टीला शूळ उत्पन्न होत असे. कारण काय ? तर रायचरणाचें सगळें प्रेम आपल्या हातून नष्ट झालेल्या छोट्या मालकावर होतें. तें हा मुलगा बळकावूं पाहत आहे अशी आपली रायचरणाची समजूत झाली. शिवाय मालकाच्या मुलाची ती गत झाल्यावर त्याच्या मनाला या मुलापासून सुख कसें लागावें ? बिचारें पोर ! आत घरांत होती म्हणून वांचलें इतकेंच.

पण हळूं हळूं रायचरणची वृत्ति पालटली. रायचरणचा मुलगा कालक्रमानें छोट्या मालकासारख्या बाललीला करूं लागला, तेव्हां पदोपदीं त्याला ( रायचरणला ) आपल्या छोट्या मालकाची आठवण होऊं लागली.

रायचरणाच्या मुलाचें फेलना हें नांव त्याच्या आतेनें आवडीनें ठेविलें होतें. फेलना 'बा–बा–आ–ई' असे लहान लहान शब्द आपल्या बोबड्या वाणीनें उच्चारूं लागला. तेव्हां तर आपले छोटे मालक या मुलाच्या रूपानें पुनरपि अवतरले आहेत असें रामचरणाला वाटूं लागलें.

एकाएकीं आपल्या यजमानणीनें घेतलेल्या शंकेची त्याला आठवण झाली, आणि तो मनाशीं म्हणाला, 'किती झालें तरी आईचें हृदय तें! मीं तिचें मूल चोरलें असें तिला वाटलें यांत काय आश्चर्य आहे?'

आपल्या थोड्याशा हयगयीमुळें छोटा मालक गमावला याबद्दल त्याचें मन त्याला खात होतेंच. अशा वेळीं वरच्या सारखा–तो छोटा मालक या मुलाच्या रूपानें अवतरला आहे हा–विचार मनांत येऊन तो आपल्या मुलाला छोट्या मालकासारखाच वागवूं लागला. त्याला त्यानें उंची कपडे व जरीची टोपी आणिली. बायकोचें कांहीं किडूक मिडूक होतें तें मोडून मुलाला हासळी, विंदी वगैरे बाळलेणीं केलीं. त्या मुलाला तो अतिशय जपूं लागला. त्याला शेजारपाजारच्या मुलांमध्यें खेळण्यास तो जाऊं देईना. रात्रंदिवस त्याचें सारें लक्ष मुलाकडे लागलें असे. मुलाचा उंची पोशाख आणि बापाकडून होत असलेले लाड पाहून गांवचे लोक मुलाला 'सरदारसाहेब' असें थट्टेनें म्हणूं लागले, आणि रायचरणला तर त्यांनीं वेड्यांतच काढिलें.

शेवटीं मुलगा मोठा झाला. शाळेंत जाण्याचें त्याचें वय झालें. तेव्हां रायचरणनें आपली जी कांहीं थोडीशी जमीन होती ती विकून पैसे उभे केले आणि कलकत्त्याला एका ठिकाणीं चाकरी धरून मुलाला शाळेंत घातलें. मुलाला चांगलें अन्नवस्त्र व चांगलें शिक्षण देण्यांत त्यानें यत्किंचित्‌हि कसूर केली नाहीं. तो स्वतः मूठभर तांदुळाच्या भातावर राही, आणि मनाशीं म्हणे, 'छोटे मालकसाहेब, तुमचें माझ्यावर प्रेम

म्हणून तुम्हीं माझ्या पोटीं जन्माला आलां आहां. आतां मी तुमची अगदीं हयगय करणार नाहीं.'

अशा रीतीनें बारा वर्षें लोटलीं. मुलगा चांगलें लिहूं वाचूं लागला. तो पाणीदार, देखणा, आणि अंगापिंडानें भरलेला दिसूं लागला. मुलाला लहानपणापासूनच ऐषआरामांत राहण्याची संवय लागलेली आणि रायचरण त्याच्यापुढें चाकरासारखा नेहमीं वागत असे, यामुळें हा आपला बाप आहे असें त्या मुलाला कधीं वाटत नसे. रायचरणनेंहि हा आपला मुलगा आहे ही गोष्ट कलकत्त्याच्या लोकांपासून लपवून ठेविली होती.

फेलना कलकत्त्याच्या एका स्कूल बोर्डिंगमध्यें राहत होता. रायचरण गांवढळ मनुष्य म्हणून इतर विद्यार्थी त्याला हंसत. फेलनाहि त्यांच्याबरोबर हंसे.

रायचरण आतां म्हातारा होत चालला होता. त्याच्यानें काम होत नाहीं अशी त्याचा नवा यजमान नेहमीं कुरकुर करी. रामचरणनें त्या मुलासाठीं आपल्या पोटाला चिमटा देऊन शरीरयष्टि क्षीण करून घेतली होती. शरीराच्या क्षीणतेमुळें त्याची स्मरणशक्ति नष्ट होऊन थोडासा बुद्धिभ्रंशहि झाला होता. होतां होतां रायचरणच्या जवळचे पैसे संपले. मुलाला पूर्वीसारखी चैन करण्यास मिळेना म्हणून तोहि कुरकुरूं लागला.

— ३ —

रायचरणनें मनाचा घडा केला. नोकरी सोडली, फेलनाला खर्चासाठीं कांहीं पैसे देऊन ठेविले, आणि सांगितलें कीं, 'मी आपल्या गांवीं कांहीं कामाकरितां जात आहें. लवकरच परत येईन.'

रायचरण जो निघाला तो बारासेत येथें अनुकूल मॅजिस्ट्रेटच्या कामावर होता तेथें गेला. अनुकूलची बायको अद्याप पुत्रशोकानें अगदीं जर्जर झालेली होती. तिला दुसरें मूलबाळ झालें नव्हतें.


एके दिवशीं कचेरीचें काम करून आलेला शीण घालविण्यासाठीं अनुकूल स्वस्थ विश्रांति घेत होता, व त्याची बायको एका वैदूपासून संतति होण्यासाठीं कांहीं औषध विकत घेत होती. इतक्यांत अंगणांतूनच रायचरणनें आपल्या माजी धन्याला मोठ्यानें रामराम केला. त्याला पाहतांच अनुकूलचें मन द्रवलें. कुशलप्रश्न वगैरे झाल्यावर पुन: नोकरीला येण्याबद्दल अनुकूलनें गोष्ट काढली. रायचरणनें नुसतें स्मित करून म्हटलें, 'बाईसाहेबांना भेटावयाचें आहे.' अनुकूल त्याला जनानखान्यांत घेऊन गेला, पण बाईसाहेबांना रायचरणच्या भेटीपासून विशेष संतोष झालेला दिसला नाहीं. रायचरणनें ती गोष्ट मनावर न घेतां हात जोडून म्हटलें, 'छोटे मालकसाहेबाला चोरून नेणारी पद्मा नदी नाहीं. हा चोर तुमच्यापुढें उभा आहे.'

अनुकूल आश्चर्यानें उद्गारला, 'काय ? मुलगा जिवंत आहे ?'

'कोठें आहे ?'

रायचरण म्हणाला, 'जी हुजूर, माझेपाशीं आहे. परवां मी त्याला आणीन.'

तो रविवारचा कचेरीच्या सुट्टीचा दिवस होता. अनुकूल व बाईसाहेब दोघेंहि सकाळपासून रायचरणच्या वाटेकडे डोळे लावून बसलीं होतीं. होतां होतां १० वाजतां रायचरण फेलनाला घेऊन आला.



बाईसाहेबांनीं मुलाला लागलीच पोटाशीं धरलें. त्या देहभान अगदीं विसरल्या, मुलाचे मटामट मुके घेऊं लागल्या, घटकेंत हंसावें, घटकेंत रडूं लागावें, केव्हां केव्हां उत्सुकतापूर्ण दृष्टीनें मुलाच्या तोंडाकडे टक लावून पहात बसावें असें त्यांचें सारखें चाललें होतें. मुलगा देखणा होता व त्याचा पोशाखहि झकपक्—मोठ्या माणसाच्या मुलाला शोभण्या-सारखा—होता. मुलाला पाहून अनुकूलच्याहि मनांत प्रेमाचा उमाळा आला.

मॅजिस्ट्रेटला नेहमीं साक्षी आणि पुरावा मागण्याची संवय लाग-लेली असते. त्या संवयीप्रमाणें अनुकूलनें विचारलें, 'रायचरण, तूं म्हणतोस त्या गोष्टीला कांहीं पुरावा बिरावा?'

रायचरण म्हणाला, 'हुजूर, अशा गोष्टीला पुरावा कोठून असणार? मींच या मुलाला चोरून नेलें. दुसऱ्या कोणीं नाहीं हें एक भगवान् जाणतो आहे.'

अधिक प्रश्न विचारावेसें अनुकूलला वाटलें नाहीं. रायचरणच्या शब्दावर विश्वास ठेवणें त्याला योग्य दिसलें. रायचरणला असा मुलगा कोठून मिळणार? आणि इतका जुना नोकर उगीचच्या उगीच आपणांस काय म्हणून फसवील असें त्याला वाटलें. तथापि तो म्हणाला, 'रायचरण, आतां तूं येथें राहूं नकोस.'

रायचरण हात जोडून सद्गदित कंठानें म्हणाला, 'हुजूर, राहूं नको तर कोठें जाऊं? कोण या बुढ्याला नोकरीला ठेवील?'

बाईसाहेब पतीला म्हणाल्या, 'राहूं द्या. मुलालाहि त्यानें बरें वाटेल. मी त्याच्या अपराधाची क्षमा करत्यें.'

पण अनुकूलची मॅजिस्ट्रेटी मनोदेवता त्याला स्वस्थ बसूं देईना. तो म्हणाला, 'अपराधाची क्षमा होऊं शकतच नाहीं.'

रायचरणनें यजमानाचे पाय धरले आणि म्हटलें, 'मीं गुन्हा केला नाहीं; देवानें माझ्याकडून तो करविला.'

हें ऐकून अनुकूलला अधिकच राग आला. तो म्हणाला, ‘ छे: छे: ! इत:पर तुझ्यावर भरंवसा ठेवणें चांगलें नाहीं. तूं दगलबाजी केली आहेस. ’

रायचरण म्हणाला, ‘ मीं नाहीं केली. माझ्या नशिबानें केली. पण सुशिक्षिताला हा दैववाद कसा पटणार ? अनुकूलनें कठोरता सोडली नाहीं.

आपण मॅजिस्ट्रेटचे चिरंजीव असून आपणास या गुलामानें इतके दिवस आपल्या जन्मसिद्ध हक्कापासून दूर ठेविलें असें मनांत येऊन फेलनालाहि रायचरणचा राग आला. पण त्याची उतरलेली चर्या पाहून फेलना उदारपणानें बापाला म्हणाला, ‘ बाबा, त्याला क्षमा करा. त्याला जवळ ठेवावयाचें नसलें तर पेनशन करून द्या.’

यावर रायचरण एक अक्षर बोलला नाहीं. त्यानें एकदां मुलाच्या तोंडाकडे शेवटची दृष्टि लाविली, जुन्या यजमानाला व यजमानणीला रामराम केला, आणि तेथून पाय काढला.

महिना संपल्यावर अनुकूलनें रायचरणच्या गांवीं त्याच्या खर्चासाठीं म्हणून लहानशी एक रकम पाठविली, पण ती परत आली. त्या गांवांत रायचरण या नांवाचा कोणी मनुष्यच नव्हता.



# किरण नववा

## 'तुम्हीच आमचे राजे !'

नवेंदुशेखराचें अरुणलेखेशीं लग्न लागलें तेव्हां विवाहदेवता होमाग्नीच्या आड गालांतल्या गालांत हंसली देवांची सहज लीला होते पण ती गरीब बिचाऱ्या माणसाला भोंवते याचा काय विचार ?

नवेंदूचा पिता पूर्णेंदुशेखर हा राजमान्य म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांमध्यें चांगली मानमान्यता मिळविलेला पुरुष होता. अधिकाऱ्यांना सलाम करतां करतां रायबहादुर हा किताब मिळविण्यापर्यंत त्याची मजल आली होती. पुढच्या बढतीवर—'राजा' या किताब मिळविण्यापर्यंत—वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं त्याची दृष्टि होती. पण एकाएकीं त्याची उचलबांगडी झाली, आणि ऐहिक मानपान, पदव्या, किताब यांना जेथें कांहीं किंमत नाहीं अशा प्रदेशास त्याला प्रयाण करावें लागलें. झुकून सलाम करतां करतां थकलेल्या त्याच्या मानेला अखेर स्मशानांतल्या चितेवर विश्रांति मिळाली !

आधुनिक भौतिक शास्त्राच्या तत्त्वाप्रमाणें शक्ति कधीं नष्ट होत नसते; तिचें रूपांतर मात्र होतें, व ती निराळ्या ठिकाणीं लागते इतकेंच. या नियमाप्रमाणें आतां पूर्णेंदूच्या अंगची सलाम करण्याची शक्ति-चंचल लक्ष्मी परिचारिका—पूर्णेंदूच्या खांद्यावरून उतरून त्याला शोभणाऱ्या त्याच्या पुत्राच्या अंगांत संचारली. नवेंदूचें डोकें आतां मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या बंगल्याच्या दरवाज्यापुढें, वाऱ्यानें हालणाऱ्या भोपळ्याप्रमाणें, वरखालीं होऊं लागलें.

नवेंदूच्या सासुरवाडच्या लोकांची पूर्वापार चालत आलेली राहणी अगदीं निराळ्या प्रकारची होती. नवेंदूचा सर्वांत वडील मेव्हणा प्रमथनाथ यानें आपल्या नातेवाईकांचें प्रेम संपादिलें होतें, व परिचयाच्या लोकांत त्याचा चांगला आदर होत असे. नातेवाईक व शेजारीपाजारी म्हणत कीं, मनुष्य असावा तर प्रमथनाथ बाबूसारखा असावा. तो त्यांचा सर्व बाबतींत आदर्श होऊन बसला होता.

प्रमथनाथ बी. ए. झालेला होता. शिवाय तो मोठा व्यवहारज्ञ होता पण त्याला मोठी अधिकाराची जागा मिळाली नव्हती. पगार मोठा नव्हता. किंवा लेख लिहून त्यानें आपली छाप बसविलेली नव्हती. अधिकारीवर्गाला त्याला दूर ठेवण्याची जेवढी इच्छा होती, तेवढीच त्यालाहि त्यांच्यापासून दूर रहाण्याची असल्यामुळें त्यांच्याकडून त्याला कांहीं मदत मिळत नसे. अर्थात् त्याचें कुटुंब आणि मित्रमंडळी येवढ्यांत त्याचें जें तेज पडावयाचें तें पडे; पण या मर्यादित मंडळीच्या बाहेर त्याची चहा होत नसे.

हाच प्रमथनाथ पूर्वी एकदां विलायतेला जाऊन तेथें तीन वर्षें राहून आला होता. तेथील लोकांनीं त्याला इतक्या चांगल्या प्रकारें वागविलें होतें कीं त्यामुळें तो स्वतःच्या देशाचें दुःख व सोसावी लागणारी विटंबना विसरून पोषाख, चालीरीती इ० बाबतींत पक्का साहेब बनला होता. साहेबी पोषाखाविषयींची व चालीरितीविषयींची त्याची ही आवड पाहून त्याच्या भावंडांना प्रथम प्रथम बरें वाटलें नाहीं. पण पुढें पुढें तींसुद्धां त्याची तारीफ करूं लागलीं व परक्यांचें अनुकरण करण्यांत त्यांना अभिमान वाटूं लागला !

विलायतेहून परत आल्यावर प्रमथनाथानें मनाशीं ठरविलें कीं हिंदुस्थानांत अँग्लो इंडियनांशीं बरोबरीच्या नात्यानें कसें वागतां येतें तें आपण साऱ्या जगाला दाखवूं. हिंदी लोकांनीं साहेब लोकांपुढें वाकून 'जी हुजूर' च केलें पाहिजे. त्याशिवाय युरोपियन व हिंदी लोक

यांच्यांत दळणवळण घडणें अशक्य आहे असें म्हणणारे महामूर्ख, व स्वाभिमानशून्य म्हटले पाहिजेत, व हे लोक निष्कारण इंग्रजांची नालस्ती करतात असें प्रमथनाथाला वाटत होतें.

त्यानें विलायतेहून येतांना तिकडच्या कित्येक बड्या बड्या लोकांकडून इकडच्या इंग्रजांना परिचयपत्रें व शिफारशी आणिल्या होत्या. यामुळें त्याला युरोपियन समाजांत प्रवेश तरी करतां आला. तो साहेब लोकांकडे सहकुटुंब चहापानाला जाऊं लागला; व खेळांत त्यांच्यामध्यें मिसळूं लागला. साहेब लोकांत आपली मानमान्यता होत आहे याबद्दल त्याला अभिमान वाटत असे.

याच वेळीं आगगाडीचा एक नवा फाटा सुरू करण्याचा समारंभ झाला. या समारंभाला येण्याविषयीं सरकारी अधिकाऱ्यांच्या मर्जींतल्या किताबधारी गृहस्थांना लेफ्टनंट गव्हर्नर साहेबाकडून निमंत्रणें गेलीं होतीं. प्रमथनाथहि त्यांत होता. या मंडळींना त्या आगगाडींत बसून जाण्यास मिळालें. पण परत येतांना एका युरोपियन पोलीससार्जंटानें उद्धटपणानें कांहीं हिंदी गृहस्थांना डब्यांतून उतरण्यास लाविलें. त्यांच्या बरोबर प्रमथनाथहि उतरूं लागला; पण सार्जंटानें म्हटलें, ‘ तुम्ही बसा; तुम्हांला उतरण्याची आवश्यकता नाहीं. ’

इतर हिंदी गृहस्थांचा अपमान करण्यांत आला तरी आपली प्रतिष्ठा युरोपियनांपाशीं आहे याबद्दल त्याला प्रथम अभिमान वाटला. पण कांहीं वेळानें विचारमग्न स्थितींत त्याला आपल्या देशाची लज्जामय स्थिति कळून आली. आणि त्याच्या अंगाचा संताप होऊन डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

आतां त्याला एका गोष्टीची आठवण झाली. एक होतें गाढव. तें देवाच्या मूर्तीच्या रथाला जुंपिलें होतें. लोक देवाला नमस्कार करीत; पण त्या मूर्ख गाढवाला वाटलें कीं लोक आपणासच नमस्कार करीत आहेत ! या गोष्टीची आठवण होतांच प्रमथनाथाच्या डोक्यांत उजेड

पडला आणि तो स्वतःशीं म्हणाला, ' या गाढवांत आणि माझ्यांत अंतर एवढेंच आहे कीं मला मिळणारा मान खरोखर मला नसून माझ्या साहेबी पोषाखाला आहे हें आज तरी माझ्या ध्यानांत आलें. '

घरीं येतांच त्यानें आपल्या कुटुंबांतल्या सगळ्या लहान मुलांना बोलावून त्यांच्या समक्ष आपल्या साहेबी पोषाखाची होळी पेटविली. ती होळी पाहून मुलें आनंदानें नाचूं लागलीं त्या होळीची ज्वाळा जितकी जास्त उंच जाई तितकी जास्त मौज त्यांना वाटे. त्यानंतर त्यानें साहेब लोकांच्या बंगल्यावर चहाला किंवा जेवायला जाणें सोडून दिलें, आणि आपलें घर बरें व आपण बरे असा वर्तनक्रम ठेविला. ज्यांना आगगाडीच्या डब्यांतून हाकून दिलें होतें ते मात्र तोंड-पुजेपणा करण्यास अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर निर्लज्जपणानें हेलपाटे घालीतच होते.

योगायोग असा विचित्र कीं प्रमथनाथासारख्या माणसाच्या बहिणीशीं नवेंदूचा विवाह घडून आला. नवेंदूच्या मेव्हण्या स्वरूपवान् होत्या तशा सुशिक्षितहि होत्या. आपलें घराणेंहि तोलांत कांहीं कमी भरणार नाहीं हें दाखविण्यासाठीं नवेंदुबाबूला बड्या युरोपियन अधिकाऱ्यां-कडून आलेलीं पत्रें तो आपल्या मेव्हण्यांच्या हातीं देत असे. त्या तीं पत्रें पाहून उपहास करण्याच्या बुद्धीनें हंसत. हें नवेंदूला कळलें तेव्हां त्याला चूक केल्याबद्दल खेद वाटूं लागला

वडील मेव्हणी लावण्यलेखा ही सर्वांत सुस्वरूप होती. तशी सर्वां-पेक्षां हुशारहि होती. ती फार थट्टेखोर असे. तिनें एके दिवशीं छानदार विलायती बूट आणून ते नवेंदूच्या निजण्याच्या जागेच्या वर कोनाड्यांत ठेविले, त्यांना शेंदूर फासला, गंधफुलें वाहिलीं. त्यांच्यापुढें उदबत्त्या लाविल्या आणि दिवेहि लावून ठेविले. नवेंदू घरांत आल्यावर ती व तिची तिसरी बहीण ( दुसरी बहीण नवेंदूला दिली होती ) त्यांच्या

दोन्ही बाजूंस उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, 'हा पहा तुमचा देव ! याला साष्टांग नमस्कार घाला, आणि प्रसाद मागा.'

छोट्या किरणलेखेनें एक तांबड्या रेशमाचा रुमाल विणून त्यांत जोन्स, स्मिथ, ब्राऊन इ. इंग्रजी नांवें गुंफून तो नवेंदूच्या हातीं दिला आणि म्हटलें, 'ही घ्या तुमच्या देवांची नामावली.' सर्वत्र धाकटी चौथी बहीण शशांकलेखा मोठी चुणचुणीत होती. तिनें मण्यांची एक माळ त्याच्या हातीं देऊन म्हटलें, 'ही घ्या माळ, आणि बसा साहेबांच्या नांवाचा जप करीत.' तें पाहून वडील बहिणी म्हणाल्या, 'चल, नीघ वात्रट पोरगी कुठली !'

चाललेले हे प्रकार पाहून नवेंदु केव्हां चिडे, केव्हां स्वतःच्या वर्तना-बद्दल त्याच्या मनाला लज्जाहि वाटे. पण या थट्टेचा अखेर थोडा तरी परिणाम त्याच्या मनावर झाला. साहेब लोकांची मर्जी संपादण्याची आपली बिलकूल इच्छा नाहीं असें तो सांगू लागला. बड्या साहेबाकडे सलामासाठीं जावयाचें झालें तर आपण बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचें भाषण ऐकण्यास जात आहों असा बहाणा तो करी. थंड हवेच्या ठिकाणाहून परत आलेल्या अधिकाऱ्याचें स्वागत करण्यासाठीं रेल्वे स्टेशनवर जावयाचें झालें तर माझे चुलते त्या गाडीनें यावयाचे आहेत, त्यांना आणण्यासाठीं स्टेशनवर जातों, असें तो सांगे.

एकीकडे साहेबांची मर्जी संपादण्याची इच्छा आणि दुसरीकडे मेव्हण्यांच्या चेष्टा यांच्या कैचींत बिचारा नवेंदु सांपडला होता. पण साहेबांच्यावर आपण विजय मिळवूं असें त्या मुली आपापसांत चोरून बोलत.

याच सुमारास लोकांत अशी अफवा पसरली होती कीं, बादशहाच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या पदव्यांच्या खैरातींत नवेंदु रायबहादूर होऊन स्वर्गसोपानाची पहिली पायरी चढणार. ही आनंदाची बातमी आपल्या मेव्हण्यांना सांगण्याचें बिचाऱ्या नवेंदूला धैर्यच होईना. तथापि

एके दिवशीं शरदृतूंतल्यासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें, अशा वेळीं नवेंदूचे अंतःकरणांत ती गोष्ट मावेना. म्हणून त्यानें ती आपल्या पत्नीस सांगितली. ती ऐकून तिला वाईट वाटलें, आणि तिनें डोळ्यांत अश्रु आणून ती गोष्ट आपल्या बहिणींना कळविली. त्यावेळीं त्यांचा संवाद झाला तो असाः—

लावण्यलेखा म्हणाली, ‘ रावबहादुर झाल्यानं माणसाला शेपूट तर फुटत नाहींना ? मग तुला येवढं वाईट तें कां वाटतं ? ’

**अरुण०**—छे ग बाई, मला दुसरं हवं तें म्हटलेलं एकवार चालेल, पण रावबहादुराची पत्नी म्हणवून घेणं नको.

**लावण्य०**—तूं कांहीं वाईट वाटून घेऊं नकोस. मी करीन त्याचा बंदोबस्त.

लावण्यलेखेचे यजमान बक्सार येथें वकिली करीत होते. दिवाळीला त्यांनीं नवेंदूला आपल्या येथें चार दिवस राहाण्यास बोलाविलें होतें. साडूच्या बोलावण्यानें नवेंदूला आनंद वाटला. स्वच्छ हवा, माणसाची वृत्ति प्रफुल्लित करणारा गंगेच्या कांठचा रमणीय देखावा, आणि घरा-भोंवतालची रमणीय बाग, याहून माणसाचें चित्त रममाण करायला आणखी काय पाहिजे ?

नवेंदु मेव्हणीशीं मोकळेपणानें वागे, आणि तीहि त्याच्याशीं बोलण्यासवरण्यास व थट्टा करण्यास मनांत संकोच धरीत नसे. नवेंदु सकाळीं नदीच्या तीरावरून फिरून आला म्हणजे स्वैपाकघरांत जाई, आणि मेव्हणीला स्वैपाकाचे कामीं मदत करतों म्हणे; पण स्वैपाकाची विद्या येत नसल्यामुळें पदोपदीं फजीति करून घेई, आणि लावण्य-लेखेला थट्टेला रोज नवा विषय मिळे.

दुपारीं जेवण्याचे वेळीं लावण्यलेखेनें नवेंदूला आग्रह करावा आणि नवेंदु भिडस्त, त्यानें खावें. मग थोडीशी वामकुक्षि झाल्यावर पत्त्यांचे डाव सुरू होत. खेळण्याचे कामांतहि नवेंदूची हुशारी बेताबाताचीच

होती; पण दुसऱ्याच्या हातांतलीं पानें चोरून पाहावयाचीं, दुसरेहि लबाडीचे प्रकार करावयाचे, व पुनः वितंडवाद करीत बसावयाचें ही विद्या त्याला येत होती. इतकेंहि करून प्रत्येक डाव त्याच्याच अंगावर येई. तरी आपण हरलों ही गोष्ट तोंडानें तो कधीं कबूल करीत नसे.

एका गोष्टींत मात्र त्याच्यांत पुरी सुधारणा दिसून आली. साहेब लोकांची मर्जी संपादणें हें काय तें जीविताचें ध्येय ही कल्पना त्या वेळेपुरती तरी त्याच्या डोक्यांतून पार गेली. तिचें त्याला पुरतें विस्मरण पडलें होतें, आणि आपल्या प्रेमळ नातलगांच्या सहवासांत काय सुख असतें तें आतां त्याला कळूं लागलें होतें.

शिवाय नवेंदु आतां अगदीं निराळ्या मंडळींत व निराळ्या परिस्थितींत येऊन पडला होता. लावण्यलेखेचे यजमान बाबू नीलरतन हे एक प्रतिष्ठित वकील होते. त्यांना साहेब लोकांच्या बंगल्यावर खेट्या घालण्याचा मनापासून तिटकारा असे. त्यांची कांहीं मित्रमंडळी याबद्दल त्यांना नांवें ठेवीत. पण ते म्हणत, ' शिष्टाचार दोन्ही पक्षांनीं पाळले पाहिजेत. आम्ही साहेबांच्या बंगल्यावर जावयाचें, आणि त्यांनीं मात्र एकदां सुद्धां आमच्या घरीं येण्याइतका शिष्टाचार पाळावयाचा नाहीं, असा अपमान का म्हणून करून घ्या ? रेताड जमिनींत रेतीचे शुभ्र कण चमचम चमकतात, म्हणून मी त्या जमिनींत पेरणी करणार नाहीं; जेथें चांगलें पीक येईल अशा काळ्या जमिनींतच बी पेरीन. '

नवेंदूचेहि विचार तसेच होत चालले होते. भविष्यकाळाचा तो विचारच करीत नसे. त्याच्या वडिलांनीं चिरंजिवाला रायबहादुरी मिळावी म्हणून अगोदरपासून चांगली तयारी करून ठेविली होती, व पुढें चिरंजिवांनींहि आपल्या वर्तनानें त्या तयारींत भर टाकिली होती. आतां नवी अशी खटपट कांहीं करावयास नको होती. युरोपियनांच्या मोठ्या वस्तीच्या शहरांत मोठा खर्च करून छानदार रेसकोर्स बांधून दिल्यावर त्या लोकांना आणखी काय पाहिजे ?

कॉंग्रेसचे दिवस जवळ येत चालले होते. तिच्यासाठीं गांवांत वर्गणी गोळा करण्यासंबंधानें नीलरतन बाबूला सेक्रेटरीचें पत्र आलें होतें. एकदां नवेंदु निश्चिंत मनानें पत्त्यांचा डाव खेळत असतां नीलरतनबाबू वर्गणीची यादी घेऊन आले आणि वर्गणीचा आंकडा घालण्याविषयीं नवेंदूला आग्रह करूं लागले.

पुष्कळ दिवसांच्या संवयीनें कॉंग्रेसचें नांव काढतांच नवेंदूच्या उरांत धडकी भरली. लावण्यलेखा जवळच होती. तिनें मुद्दाम सचिंत व गंभीर मुद्रा करून म्हटलें, 'छेः छेः! हें भलतेंच काम करूं नका. अशानें तुमच्या रेसकोर्सचा नाश होईल, आणि त्याची पुनः दुरुस्तीहि करतां येणार नाहीं.'

नवेंदु भान न राहून भकदिनीं उद्गारला, 'त्या गोष्टीच्या धास्तीनें रात्रीं मला झोपसुद्धां येत नाहीं अशी का तुमची समजूत आहे?'

नीलबाबू म्हणाले, 'घाबरूं नका. तुमचें नांव वर्तमानपत्रांत छापणार नाहीं, मग तर झालें?'

लावण्यलेखा गंभीरपणाचा आव घालून म्हणाली, 'तरी पण तें जरा धोक्याचेंच आहे. एकाकडून दुसऱ्याला, व दुसऱ्याच्या तोंडून तिसऱ्याला याप्रमाणें बातमी सहज पसरत जाते.'

नवेंदूनें आवेशानें उत्तर केलें, 'नांव छापून आलें म्हणून काय बिघडणार आहे?' इतकें बोलून त्यानें नीलबाबूच्या हातांतून वर्गणीची यादी ओढून घेतली, आणि स्वतःच्या नांवापुढें चांगला ठसठशीत एक हजार रुपयांचा आंकडा घातला. पण हा सगळा आवेश उसना आणिलेला! अंतर्यामीं तर वर्तमानपत्रांत नांव प्रसिद्ध न व्हावें हीच इच्छा होती.

लावण्यलेखेनें कपाळावर हात मारून घेऊन म्हटलें, 'हें हो काय केलेंत?'

नवेंदु आढ्यतेनें म्हणाला, ‘ काय बुवा चुकलें? गैरशिस्त असें कांहीं मीं केलें नाहीं. ’

लावण्यलेखा म्हणाली, ‘ पण—पण—आगगाडीवरचे गार्ड साहेब, व्हाइटअवेच्या दुकानांतले असिस्टंट साहेब, हार्ट ब्रदर्सच्या येथले मोतद्दारसाहेब वगैरे साहेब मंडळींचा तुमच्यावर आतां घुस्सा होईल ना? मग ही मंडळी शांपेन वगैरे पिण्यासाठीं किंवा मेजवानीसाठीं तुमच्या घरांत पाऊल टाकणार नाहींत. याचा कांहीं विचार? ’

नवेंदूनें तडकाफडकी जबाब दिला, ‘ कुछ पर्वा नाहीं. ’

थोडे दिवस गेल्यावर एके दिवशीं नवेंदु एकीकडे चहा पीत पीत वर्तमानपत्राच्या ताज्या अंकावरून दृष्टि फिरवीत होता. इतक्यांत X या सहीचें एक पत्र छापलेलें त्याच्या नजरेस पडलें. पत्राच्या लेखकानें नवेंदूला कॉंग्रेसला दिलेल्या मोठ्या देणगीबद्दल यथेच्छ धन्यवाद दिले होते, आणि नवेंदूसारख्या गृहस्थांच्या साह्यानें त्या संस्थेला चांगलीच बळकटी येईल असें म्हटलें होतें.

पूर्णेंदु बाबू! काय हा तुमच्या दैवाचा दुर्विलास! कॉंग्रेसला बळकटी आणण्यासाठीं कां या हातभाग्य कार्ट्याला जन्म दिलात?

पण दुर्दैव घतलें तरी त्यालासुद्धां थोडीफार चांगली बाजू असतेच. एकीकडून अँग्लो-इंडियन समाज व दुसरीकडून कॉंग्रेस पक्ष नवेंदूला आपल्यामध्यें ओढावयाला पाहत होते, यावरूनच तो अगदीं टाकाऊ माणूस नव्हता हें सिद्ध झालें. नवेंदूनें तें पत्र आपल्या मेव्हणीला दाखविलें तें वाचून तिनें बाह्यात्कारीं असें दाखविलें कीं जणूं काय आपणास त्यांतलें कांहीं ठाऊक नाहीं. तिनें आश्चर्यचकित मुद्रा करून म्हटलें, ‘ अरेरे! घात झाला! जें बाहेर फुटायला नको होतें तें फुटलें. तुमच्याविषयीं असा दुष्टपणा, निष्ठुरपणा करणारा तुमचा वैरी तरी कोण आहे? ’

नवेंदु हसत उत्तरला, ‘ आतां काय त्याचें? त्याला का उगाच

नांवें ठेवतां ? मी त्याच्या अपराधाची मनापासून क्षमा करतों. देव त्याचें भलें करो असें सुद्धां म्हणतों.'

दोनतीन दिवसांनीं एका कॉंग्रेसद्वेष्ट्या अँग्लो-इंडियन वर्तमानपत्राचा एक अंक त्याच्या नांवावर टपालांतून आला. 'एक माहितगार' अशा सहीचें एक पत्र त्यांत होतें, व नवेंदू बाबूंनीं वर्गणी दिल्याची गोष्ट खोटी आहे असें त्यांत साफ म्हटलें होतें. पत्रांतले शब्द असे होते—'नवेंदु बाबूंच्या प्रत्यक्ष परिचयाचा लाभ ज्यांना सुदैवानें घडला आहे, त्यांचा बाबूंची नालस्ती करणाऱ्या या बातमीवर कधीं विश्वास बसणार नाहीं. नवेंदुबाबू कॉंग्रेसला जाऊन मिळतील ही अगदीं असंभवनीय गोष्ट आहे. ते खरे लायकीचे गृहस्थ आहेत. सरकारी नोकरी मिळत नाहीं म्हणून आंबट तोंड करणारे किंवा ज्याला कधीं काम मिळत नाहीं असे रिकामे ब्यारिस्टर ते नाहींत. विलायतेंत थोडे दिवस राहून आमच्या लोकांचा पोषाख व चालीरीति यांची माकडासारखी नक्कल करणारे व अँग्लो-इंडियन समाजांत जबरदस्तीनें घुसूं पाहणारे पण अखेर गोऱ्यांच्या लाथा खाऊन परत जाणारे पुष्कळ असतात. त्यांच्यांतलेहि ते नाहींत; तेव्हां कॉंग्रेसला जाऊन मिळण्याला त्यांना कांहीं एक कारण दिसत नाहीं.' इ० इ०

हेंहि पत्र नवेंदूनें आपल्या मेव्हणीला मोठ्या आढ्यतेनें दाखविलें. कारण, त्यावरून त्यांची समाजांत केवढी प्रतिष्ठा होती तें व्यक्त होत होतें.

लावण्यलेखेनें आश्चर्यचकित झाल्यासारखें दाखवून विचारलें, 'हें पत्र तुमच्या मित्रांपैकीं कोणीं लिहिलें असेल बरें ? तिकिट कलेक्टरानें ? त्या चामड्याच्या व्यापाऱ्यानें ? किंवा किल्ल्यांतल्या ड्रमेमजरनें ?'

नीलबाबू म्हणाले, 'मला वाटतें तुम्ही उलट पत्र पाठवून ह्या पत्राचें खंडन करावें हें बरें.'

नवेंदू म्हणाला, ‘ वर्तमानपत्रांत काय हव्या त्या बातम्या छापतात. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचें खंडन मनुष्य कोठवर करणार ? ’

हा सगळा प्रकार पाहून लावण्यलेखेला हंसू आवरेना. तें तिच्या मुखावाटे जोरानें बाहेर पडलें. तें पाहून नवेंदूनें विचारलें, ‘ हंसायला काय झालें ? ’ पण या प्रश्नाला उत्तर मिळालें नाहीं, आणि हसणेंहि बंद झालें नाहीं. हंसतां हंसतां लावण्यलेखेची मुरकुंडी वळली. तेव्हां तर नवेंदूला कसेंसेंच झालें, आणि तो म्हणाला, ‘ या पत्राला उत्तर देऊन त्यांतल्या मजकुराला खोटें म्हणायला मी भितो असें कां तुम्हांला वाटतें ? ’

लावण्यलेखा म्हणाली, ‘छे: छे: ! ती गोष्टसुद्धां मनांत आणूं नका. मला आपलं वाटलं कीं रेसकोर्सला जाण्याचं तुम्हीं अद्याप सोडलेलें दिसत नाहीं. आशा ही अजब चीज आहे ! मनुष्य जिवंत आहे तोंवर ती त्याला सुटलेली नाहीं. ’

‘ रेसकोर्समध्यें घातलेले पैसे फुकट जातील या गोष्टीला मी भीत आहे अशी एकूण तुमची कल्पना आहे तर ! ठीक आहे. लवकरच गंमत दिसेल. ’ असें नवेंदु चिडखोरपणानें म्हणाला, आणि लागलीच एक कागद घेऊन पत्र लिहूं लागला. त्याचें तें पत्र पुरें झाल्यावर नीलबाबू व लावण्यलेखा या दोघांनीं तें वाचलें आणि म्हटलें, ‘ भाषा जशी कडक पाहिजे होती तशी आली नाहीं. पत्र मिळमिळीत झालें आहे. ’ त्यांत सुधारणा करण्याचें काम त्या दोघांनीं आपल्याकडे घेतलें. आणि पत्रांत बरीच फिरवाफिरव केली. सुधारून लिहिलेला मजकूर असा होता: —

‘ एखाद्याच्या नात्यागोत्यांतला मनुष्य जेव्हां त्याच्यावर उलटतो आणि त्याचें शत्रुत्व करूं लागतो, तेव्हां तो परक्या शत्रूलाहि बरें म्हणवितो. हिंदुस्तानसरकारला राशिया किंवा सरहद्दीवरचे पठाण यांच्यापासून जेवढें भय आहे, त्या पेक्षां मगरूर व उर्मट अशा ॲंग्लोइंडि

यनांपासून खरोखर जास्त भय आहे. ते सरकारचे अधिक वाईट प्रकारचे कट्टे शत्रु होत. कारण, सरकार आणि प्रजा यांच्यामध्यें सलोख्याचा संबंध घडण्याच्या आड ते नेहमीं येत असतात. हा संबंध घडवून आण॰ण्याचा राजरोस मार्ग शोधून काढण्याचें श्रेय कोणीं घेतलें असेल तर तें काँग्रेसनें. पण हीं आंग्लोइंडियन पत्रें त्या मार्गावर जिकडे तिकडे कांटे पसरून ठेवतात ' इ० इ०

हें पत्र प्रसिद्ध झाल्यास भलताच परिणाम होईल अशी अंत:स्थ भीति नवेंदूच्या मनाला वाटत होती. तथापि पत्राची झोकदार भाषा पाहून त्याला अभिमान वाटत होता. जणू काय तें पत्र त्यानेंच लिहिलें होतें ! तें पत्र वर्तमानपत्रांत छापून आलें, आणि नंतर कित्येक दिवस-पर्यंत त्याचें खंडन, प्रतिखंडन, टीका, आणि चर्चा निरनिराळ्या पत्रांतून प्रसिद्ध होऊन नवेंदूनें काँग्रेसला एक हजार रुपये वर्गणी दिली ही गोष्ट ज्याच्या त्याच्या तोंडीं झाली.

निराशेनें मनुष्याच्या अंगांत केव्हां केव्हां साहस येतें. नवेंदूची यावेळीं अशीच स्थिति झाली होती. तो आतां अगदीं जहाल स्वदेशा-भिमान्यासारखें बोलूं लागला. लावण्यलेखा मनांतल्या मनांत हंसे, आणि म्हणे, ' येवढयानें काय झालें आहे ? परीक्षेची वेळ तर पुढेंच आहे. '

एके दिवशीं नवेंदु स्नानाला बसला न बसला इतक्यांत घरच्या गड्यानें एक कार्ड आणून दिलें. त्याच्यावर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहे-बाचें नांव लिहिलेलें होतें. आतां काय करावयाचें याची पंचाईत पडली. स्नानगृहाबाहेर पडतां येईना, आणि साहेबाला ' थांबा ' असा अपमान-कारक निरोपहि पाठवितां येईना. नवेंदूचें मन त्या घोटाळ्यांतच कांहीं वेळ राहिलें. शेवटीं नवेंदूनें कसेंतरी भडाभडा पाणी अंगावर घेतलें; घाई-घाईनें कपडे चढविले, आणि साहेबाला भेटण्यासाठीं म्हणून बाहेरच्या दाराकडे धूम ठोकली. पण व्यर्थ ! गड्यानें सांगितलें कीं साहेबाची

स्वारी बराच वेळ वाट पाहून अखेर निघून गेली. हें सगळें नाटक लावण्यलेखेनें फार कुशलतेनें रचिलें होतें यांत शंका नाहीं.

एखाद्या पालीचें शेपूट तोडलें म्हणजे कांहीं वेळ तें तडफडत असतें. तसें आतां नवेंदूचें मन दुःखानें तळमळत होतें. सारा दिवस तो उदास होता.

लावण्यलेखेला त्याच्या मनाची ही स्थिति पाहून फार मौज वाटत होती. पण तिनें बाह्यात्कारी त्याचें कांहीं चिन्ह मुद्दाम दाखविलें नाहीं, आणि मधून मधून सचिंत मुद्रा करून ती विचारूं लागली कीं, 'आज तुमचं कांहीं दुखतखुपत तर नाहींना ? तुमच्या जिवाला स्वस्थता वाटत नाहीं असं दिसतं म्हणून विचारत्यें.— '

खरी स्थिति लपवून मुद्दाम हंसरी मुद्रा करण्यासाठीं व कांहीं तरी गमतीचें उत्तर देण्यासाठीं नवेंदूला बरीच खटपट करावी लागली. शेवटीं एक उत्तर त्याला सुचलें. तो म्हणाला, 'तुमच्यासारख्या आरोग्यदेवतेच्या मंदिरांत पाऊल ठेवणाऱ्याची दुखण्याखुपण्याची काय छाती लागली आहे ? '

पण उसनी आणिलेली हंसरी मुद्रा किती वेळ टिकणार ? त्याच्या मनांत खरोखर चाललेले विचार असे होते:—' पहिली गोष्ट—मीं कांग्रेस फंडाला वर्गणी दिली; दुसरी—तिच्याबद्दल वर्तमानपत्रांत तें घाणेरडें पत्र प्रसिद्ध झालें; आणि सर्वांत अतिशय वाईट व मोठी घोडचूक म्हणजे मॅजिस्ट्रेट साहेबांनीं भेटीला आपल्या घरीं येण्याची कृपा केली असतां त्यांना बराच वेळ थांबून शेवटीं तसें परत जावें लागलें. साहेब आपल्याविषयीं मनांत काय म्हणाले असतील ? त्यांना आपल्याबिषयीं काय वाटत असेल ? '

दुसरे दिवशीं सकाळीं नवेंदूची स्वारी आपला उत्तम पोषाख चढवून, घड्याळ व त्याची सोन्याची सांखळी धारण करून, आणि भपकेदार रेशमी पगडी डोक्यावर ठेवून बाहेर जाण्यास सिद्ध झाली; इतक्या थाटा-

माटानें बाहेर कोठें जाणार म्हणून लावण्यलेखेनें विचारलेंच. पण कांहीं जरूरीच्या कामासाठीं जात आहे येवढ्या उत्तरावर भागलें. लावण्य-लेखेनें अधिक खोदून चौकशी केली नाहीं.

नवेंदु साहेबाच्या बंगल्यावर जाऊन आपलें कार्ड ऑर्डरलीच्या हातीं देऊं लागला. पण त्यानें रागारागानें उत्तर केलें, ' आतां साहेब भेटायचे नाहींत. '

नवेंदूनें खिशांतून दोन रुपये काढून त्याच्या हातावर ठेविले. ते घेऊन त्यानें सलाम केला, आणि सौम्य स्वरानें म्हटलें, ' आम्ही पांचजण आहों. ' नवेंदूनें खिशांतून दहा रुपयांची नोट काढून त्याच्या हातावर टाकली. त्याबरोबर काम झालें.

साहेबांनीं नवेंदूला आंत बोलाविलें. तें रात्रींचा निजण्याचा पोषाख तसाच ठेवून लिहीत बसले होते. नवेंदूनें लवून सलाम केला. साहेबानें खुर्चीकडे बोट करून, समोरच्या कागदावरची दृष्टि काढून वर न पाहतां म्हटलें, ' बाबू, तुमचें माझ्यापाशीं काय काम आहे ? '

नवेंदु घाबऱ्या स्वरानें म्हणाला, ' काल आपली स्वारी माझ्या घरीं आली होती, तेव्हां —'

साहेबांनीं भिंवया वक्र करून आणि समोरच्या कागदावरून एक डोळा वर करून म्हटलें, ' मी तुमच्या घरीं आलों होतों ? किती मूर्ख-पणाचे शब्द हे ! '



नवेंदूनें भीतीनें कांपत कांपत म्हटलें, ' क्षमा असावी. कांहीं चूक—घोटाळा—झालेला आहे. ' असें म्हणून घामानें निथळत तो कसा तरी साहेबांच्या खोलींतून बाहेर डला; आणि त्या दिवशीं

रात्रीं अंथरुणावर तळमळत पडला असतां ‘ अहा रे खुळचटा ! ’ असा स्वप्नांतल्या प्रमाणें खोल आवाज त्याच्या कानीं मधून मधून एकसारखा येऊं लागला.

साहेबांच्या बंगल्यावरून घरीं येत असतां साहेबानें भेटीस आल्याचें साफ नाकबूल कसें केलें ही गोष्ट नवेंदूच्या डोक्यांत सारखी घोळत होती. पण रागाच्या तडाख्यांत साहेब तसें म्हणाले असतील असें आपल्या मनाचें समाधान त्यानें करून घेतलें.

आपण गुलाबपाणी आणायला गेलों होतों अशी ओली थाप घरीं आल्यावर नवेंदूनें लावण्यलेखेला दिली. पण बोलणें संपतें न संपतें तो कलेक्टर साहेबाच्या कचेरीचा बिल्ला धारण करणारे पांचसहा चपराशी येऊन सलाम करून नवेंदू पुढें उभे राहिले.

लावण्यलेखेनें हंसत हंसत विचारलें, ‘ तुम्ही कॉंग्रेसला वर्गणी दिली म्हणून तुम्हांला पकडायला हे आले आहेत वाटतें ! ’

‘ बाबू साहेब, बक्षीस ? ’ असें एकदम सर्वांनीं दांत विचकून म्हटलें.

नीलबाबू बाजूच्या खोलींत होते. ते बाहेर येऊन रागारागानें विचारूं लागले, ‘ बक्षीस कशाबद्दलचें ? ’

चपराशी दांत विचकून म्हणाले, ‘ बाबूसाहेब कलेक्टरसाहेबांची भेट घेऊन आले त्याबद्दलचें. ’

लावण्यलेखा म्हणाली, ‘ अलीकडे कलेक्टरसाहेब गुलाबपाण्याची विक्री करूं लागले आहेत हें नव्हतें बाई मला ठाऊक ! ’

आपलें साहेबांच्या बंगल्यावर जाणें, आणि गुलाबपाण्याविषयीं दिलेली थाप यांचा मेळ घालण्यासाठीं नवेंदु कांहीं पुटपुटला; पण काय म्हणाला तें त्याचें त्याला तरी कळलें असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे. दुसऱ्या कोणाला त्याच्या शब्दापासून कांहीं बोध झाला नाहीं येवढी गोष्ट खास आहे.

नीलबाबू चपराश्यांना म्हणाले, ‘ बक्षिसाचें कांहीं कारण नाहीं; तें तुम्हांला मिळणार नाहीं. ’

नवेंदूला आपली स्थिति फजीतखोरासारखी झालेली पाहून वाईट वाटलें, आणि तो म्हणाला, ‘ जाऊं द्या. गरीब आहेत बिचारे ! त्यांना थोडें कांहीं दिलें तर कांहीं मोठेसें जात नाहीं. ’ असें म्हणून नवेंदूनें एक करन्सी नोट काढली. नीलबाबूंनीं ती त्याच्या हातांतून ओढून घेऊन म्हटलें, ‘ गरिबांनाच द्यायची, तर यांच्यापेक्षां गरीब दुनियेंत पुष्कळ आहेत. त्यांना ती देईन मी.’

शंकराच्या या पिशाच्चगणांच्या तोंडावर बक्षिसाचा तुकडा टाकून त्यांना खूष करतां येईना याबद्दल नवेंदूला फार वाईट वाटलें. शेवटीं ते चपरासी जेव्हां जळफळत जायला निघाले, तेव्हां नवेंदूनें त्यांच्याकडे लाचारीच्या दृष्टीनें पाहिलें. जणूं काय तो त्यांना म्हणाला, ‘ तुम्ही पाहतच आहां. बक्षीस मिळालें नाहीं याबद्दल मी लाचार आहें. पण मी तरी काय करणार ? ’

यंदाची कॉंग्रेस कलकत्त्याला भरावयाची होती. नीलबाबू तेवढ्यासाठीं सहकुटुंब तेथें गेले. नवेंदु बरोबर होताच.

ते कलकत्त्यास पोंचतांच कॉंग्रेसची मंडळी नवेंदुभोंवतीं जमा झाली. त्यांना परम आल्हाद झालेला होता. त्यांनीं नवेंदूचें मन:पूर्वक अभिनंदन केलें. आणि यथेच्छ हरभऱ्याच्या झाडावर चढविलें. प्रत्येक जण म्हणूं लागला कीं नवेंदु बाबूसारख्या पुढाऱ्यांनीं कॉंग्रेससारख्या राष्ट्रीय संस्थेच्या कामाला स्वतःला वाहून घेतलें पाहिजे. त्याशिवाय राष्ट्रोन्नति कशी होणार ? नवेंदूलाहि ती गोष्ट पटलीशी दिसली, आणि चुका आणि घोटाळा यांच्या जाळ्यांतून नवेंदु बाबू देशाचे एक पुढारी म्हणून पुढें आले. ते जेव्हां कॉंग्रेसच्या पहिल्या दिवशीं मंडपांत शिरले, तव्हां प्रत्येकानें उठून त्यांचा जयजयकार केला. तो जयघोष ऐकून बिचारी आर्यभूमि लज्जित झाली असेल !

बादशहाचा वाढदिवस आला आणि पदव्यांची यादी बाहेर पडली. पण रावबहादुरांच्या मालिकेंत नवेंदूचें नांव कोठें दिसलें नाहीं.

लावण्यलेखेनें संध्याकाळीं नवेंदूला आपलेकडेस फराळास बोलाविलें. त्याप्रमाणें तो आल्यावर तिनें एक उत्तम पोषाख काढला, नवेंदूच्या कपाळीं आपल्या हातानें कुंकुमतिलक लाविला, आणि त्याला थाटामाटानें तो अर्पण केला. त्याची पत्नी अरुणलेखा नवें लुगडें नेसून आणि अलंकार घालून शेजारच्या खोलीच्या दाराशीं उभी राहून सारा प्रकार पाहत होती. तिला पोटांत आनंद होत होता व त्याचें चिन्ह तिच्या प्रफुल्लित मुद्रेवर दिसत होतें. लावण्यलेखेनें तिच्या हातांत पुष्पहार देऊन तो नवेंदु बाबूच्या गळयांत घालण्याविषयीं फार आग्रह केला. पण ती ऐकेना. त्या बिचाऱ्या हाराची व नवेंदूच्या मानेची गांठ रात्रीं एकांतांत केव्हां पडली कोणास ठाऊक !

लावण्यलेखा वगैरे मंडळी नवेंदूला पंचारती ओवाळून म्हणाली, ‘ तुम्हीच आमचे राजे. हा मान हिंदुस्थानांत पुनः कोणाला मिळणार नाहीं. ’

नवेंदूच्या मनाचें या सन्मानानें कितीसें समाधान झालें असेल तें त्याचें त्याला ठाऊक ! आम्हांला तर त्याची शंका वाटते. आमची समजूत आहे कीं नवेंदु बाबू अजून रावबहादूर होतील, आणि त्यांच्या निधनोत्तर इंग्लिशमन् व पायोनियर हीं अँग्लोइंडियन पत्रें छाती पिटून आक्रोश करणारे निधनलेख लिहितील. असो. तूर्त तरी आपण बाबू पुर्णेंदु शेखर यांना धन्यवाद देऊन त्यांचा जयजयकार करूं. हिप् हिप् हुरे ! हिप् हिप् हुरे ! हिप् हिप् हुरे !

# किरण दहावा

## भेट

रानांतून पूर्वी जी एक पायवाट होती ती आज पहावी तर गवतानें झांकून गेलेली आहे.

या निर्जन अरण्यांत एकाएकीं कोणीसें मागून म्हणाले, ‘ मला ओळखलें काय ? ’

मी मागें वळून पाहिलें आणि म्हटलें, ‘ चेहरा परिचयाचा दिसतो; पण नांव चटकन् ध्यानांत येत नाहीं. ’

तो म्हणाला, ‘ मी तर तुमचा फार जुना—पंचवीस वर्षांपूर्वींचा- दोस्त आहे ! माझें नांव शोक. ’

ज्याप्रमाणें पाण्याच्या हौदांत पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबाची प्रतिमा त्या पाण्याला विलक्षण शोभा देते, त्याप्रमाणें त्याच्या डोळ्यांतल्या अश्रुबिंदूंची अपूर्व शोभा दिसत होती.

माझी अक्कल अगदीं गुंग झाली. मी आश्चर्यानें वेड्यासारखा त्याच्या तोंडाकडे पाहत उभा राहिलों. मी म्हटलें, ‘ त्या दिवशीं तर तुमची चर्या श्रावण महिन्यांतल्या पावसाच्या ढगासारखी काळी कुळकुळीत दिसत होती; आज पाहतों तर तीच तुमची चर्या आश्विनांतल्या चांदण्याप्रमाणें उज्ज्वल दिसत आहे, हें कसें ? त्या दिवशींचे अश्रुबिंदू कोठें गेले ? ’

माझा हा प्रश्न ऐकून तो नुसता हंसला. त्या हंसण्यावरून मला वाटलें कीं शरदृतूंतल्या शिउलीफुलाच्या हंसण्याची लकब पावसाळी ढगानें उचलली खरी !

मी म्हटलें, ' माझें गेल्या पंचवीस वर्षांतलें तारुण्य तुमच्याजवळ आहे काय ? '

तो म्हणाला, ' हा पहा माझ्या गळ्यांतला हार ! '

पाहिलें तर खरेंच ! त्या हारांतल्या फुलांतली एकसुद्धां पाकळी गळून पडली नव्हती. मी खरोखर आश्चर्यचकित झालों. मी म्हटलें, ' माझें सगळें शरीर जीर्ण झालें आहे. पण तुमच्याजवळचें माझें पंचवीस वर्षां-पूर्वीचें यौवन अजून जसेंचें तसें आहे ! '


त्यानें मग तो हार आस्ते आस्ते काढून माझ्या गळ्यांत घातला. तो म्हणाला, ' कां ? तूं म्हणाला होतास ना कीं मला समाधान नको, शोकच पाहिजे म्हणून ? '

मी लज्जित होऊन म्हटलें, ' हो, म्हणालों होतों खरें. फार वर्षां-मागची गोष्ट म्हणून तिचें विस्मरण झालें होतें. पण आतां गोष्ट पटली.'

तो म्हणाला, ' मनुष्य आपल्या अंतर्यामींच्या इच्छेला विसरला असें कधीं झालें आहे काय ? मी त्या दिवसापासून तुझें चिंतन करीत येथें छायेंत बसलों आहें. आतां मला आपल्याबरोबर घेऊन चल. '

मी आपला हात त्याच्या हातांत घालून निघालों. मी म्हटलें, ' तुझ्या रूपांत हें केवढें अंतर पडलें ! '

तो म्हणाला, ' शोकाचा अवतार संपला. आतां त्याच्या जागीं शांति स्थापित झाली आहे. '



# किरण अकरावा

## भारतभूमीची प्रार्थना

तूंच आम्हांस जीवन दिलें आहेस; आम्ही हा अभिमान पराकाष्ठेच्या निश्चयानें व इच्छा-शक्तीनें कायम राखूं.

कारण, आम्ही कोणी आहों या अभिमानावर तुझें वैभव अवलंबून आहे. म्हणून तुझें नामस्मरण करून, आमच्या आत्म्यावर प्रभुत्व गाजवूं पाहणारांना आम्ही विरोध करूं. ज्यांच्या उराला परवशतेच्या तिखट सुरीचे घाव सहन करवतात, त्यांच्या अंतःकरणांत तुझा प्रकाश मंद झालेला असतो हें आम्ही लक्षांत ठेवूं. एकदां अभिमानबुद्धि शिथिल झाली, म्हणजे मनुष्य भित्रेपणानें तुझें सिंहासन असत्याला देण्यास तयार होतो. दुर्बलता ही दगलबाज आहे. ती आमच्या आत्म्याला धोका देते. म्हणून हे माते! तुला आमची हीच प्रार्थना आहे कीं आम्हांला परवशतेच्या कूपांत ढकलून देणाऱ्या आपातमधुर अशा सुखकारक गोष्टीपासून आम्हास विरक्त ठेव; जसा ग्रीष्म ऋतूंतला मध्यान्हींचा सूर्य सर्वोच्च असतो, तसें आम्ही आमचें दुःख उच्च स्वरानें तुला निवेदन करावें; आमची पूजा प्रेमाच्या स्वरूपांत परिणत व्हावी, आणि आमच्या कृतीच्या रूपानें तिचें फळ दिसावें अशी शक्ति आम्हांस दे. दुर्बळांची व पतितांची आमच्या हातून विटंबना होऊं नये. आमच्या भोंवतालीं सारें जग धूलिचुंबन करीत असतां आम्ही तुझ्याविषयींचें प्रेम उच्च ठेवण्यास समर्थ होऊं अशी शक्ति दे. इतरजन तुझ्या प्रेमाच्या उच्च नांवाखालीं नुसते स्वार्थसाधु बनले आहेत. ते प्रत्यक्ष भावाच्या अंगांतलें मांस तोडून खातील असा

लोभरूपी ब्रह्मराक्षस त्यांच्या पोटांत उठला आहे ! तूं त्यांच्यावर रागावलीस तर ते तुझ्या रागाला तोंड देऊन आपला नाश करून घेतात. पण आपण सत्याकरितां, परमेश्वरासाठीं, स्वतःच्या शाश्वत आत्मिक कल्याणासाठीं, अंतःकरणाच्या ऐक्यांत तुझें खरें प्रभुत्व वास्तव्य करते म्हणून, नेटानें झगडूं या आणि दृढतेनें दुःखें सहन करूं या.

—२—

तांडेल साहेब, आमचा जलप्रवास सुरू झाला आहे. आमचा रामराम घ्या ! वादळी वारा सों सों करीत येत आहे आणि लाटा जोरानें उसळत आहेत. तरी पण आम्ही चाललोंच आहों. केव्हां धोका होईल याचा नेम नाहीं. ही भीति मनांतलें दुःख तुमच्या चरणी अर्पण करण्याची वाट अडवून बसली आहे, आणि वादळांतून ‘ भीतीला पूर्णपणें जिंकूं या ’ असा आवाज येत आहे. जे रेंगाळले आहेत त्यांची वाट पाहत आपणहि रेंगाळणें किंवा जागृतीच्या समयीं नसती भीति दाखविणें अथवा शंका घेणें बरें नाहीं. कारण, तुझा काळ तोच आमचा काळ; तुझा भार तोच आमचा भार, व जीवन आणि मरण या गोष्टी म्हणजे आयुष्यरूपी अपरंपार समुद्रावर तुझ्या निःश्वासाचे खेळ होत. जी थोडी मदत मिळेल ती घेऊन किंवा मित्रांच्या साह्यावर अवलंबून आपण राहणार नाहीं. तूं आमच्या पाठीशी आहेस, आणि आम्ही सदोदित तुझे म्हणवितों ही गोष्ट मुख्यतः लक्षांत ठेवूं या.

# किरण बारावा

## निराश होऊं नकोस

तुझे आप्त व इष्टमित्र तुला सोडून जातील, आणि तुझ्या आशेचीं फळें खालीं मातींत पडून कुजून जातील. पण धीर सोडूं नकोस.

तुझ्या मार्गावर रात्रीचा काळाकुट्ट अंधार पडून तुझ्या अंतःकरणांतली ज्योत वरचेवर मंद होईल; तथापि निराश होऊं नकोस.

पशुपक्षीसुद्धां तुझे शब्द ऐकण्यासाठीं उत्सुकतेनें तुझ्याभोंवतीं गोळा होतील; आणि तुझ्याच घरच्या माणसांचीं मनें तुझ्या शब्दांनीं द्रवणार नाहींत; पण निराश होऊं नकोस.

तुला परतवून लावण्यासाठीं महाद्वार हळूं हळूं लावण्यांत आलें आहे. तें पुनः पुनः ठोठाव. इतकेंहि करून कदाचित् तें मुळींच उघडणार नाहीं; पण निराश होऊं नकोस.



२०३१
बा.व
१४८
३ १

# किरण तेरावा

## हिंदुस्थानच्या दैवगतीच्या विधात्या ! तुझा जयजयकार असो !

जनतेच्या मनाचा अधिनायक अशा भारत–भाग्य विधात्या ! हिमालयाच्या व विंध्यपर्वताच्या शिखरांपासून निघून तुझें नांव आकाश व्यापीत आहे. ते गंगेच्या प्रवाहाबरोबर वाहत आहे आणि उसळणाऱ्या लाटांच्या रूपानें समुद्र तें गात आहे. तुझ्या नामोच्चरणानें पंजाब आणि सिंध, महाराष्ट्र आणि गुजराथ, उत्कल आणि वंग हे सगळे प्रांत जागृत झाले आहेत. ते तुझ्या चरणापाशीं जमा होतात. तुझा आशीर्वाद मागतात, आणि तुझ्या नांवाचा जयजयकार करतात. जनतेचें कल्याण करणाऱ्या विधात्या ! तुझा जयजयकार असो ! तुझ्याकडून पाचारण झालें, तें ऐकून हिंदु व बुद्ध, जैन, आणि शीख, पारशी, मुसलमान व ख्रिस्ती, सर्व लोक तुझ्या सिंहासनाभोंवतीं जमा झाले आहेत. परस्परांमधील प्रेमहार गुंफण्यासाठीं पूर्व आणि पश्चिम तुझ्या मंदिरांत एकत्र झाल्या आहेत. भारत–भाग्य–विधात्या ! तुझा जयजयकार असो ! सर्वजन–ऐक्य–विधायका भारतभाग्यविधात्या ! तुझा जयजयकार असो !

असंख्य जनांच्या जीवनयात्रेंतल्या धावपळीमध्यें पतन व अभ्युदय यांच्यामुळें मार्ग उच्च नीच झालेला आहे. हे चिरंतन सारथ्या ! तुझ्या रथाच्या चाकांच्या अहोरात्र धावण्यानें त्यांतून सदा ध्वनि निघत आहे. राष्ट्राच्या अशा पतनाच्या व विनाशाच्या कालीं तुझा

शंखनाद ऐकूं येत आहे. तूंच संकटांतून तारणारा आहेस. लोकांना त्यांच्या त्यांच्या नियोजित कार्याकडे प्रवृत्त करणाऱ्या भारत–भाग्य–विधात्या ! तुझा जयजयकार असो !

निबिड अंधकाराच्या रात्रीं आणि दुःखाच्या स्तब्ध व शांत काळीं, पीडित व मूर्छित देशाचें मंगल करूं पाहणाऱ्या तुझ्या नेत्रांनीं अनिमेष उघडे राहून पाहरा केला आहे. भारत–भाग्य–विधात्या ! तुझा जय–जयकार असो !

जेव्हां दुःस्वप्नें पडत होतीं आणि निष्ठुर व महान् संकटें देशावर गुजरलीं, तेव्हां हे माते ! तूंच आपल्या त्रस्त लेकरांना आपल्या पोटाशीं धरलेंस; लोकांना विटंबनेंतून विजयप्राप्तीचा मार्ग दाखविणाऱ्या भारत–भाग्य–विधात्या ! तुझा जयजयकार असो !

प्रभात झाली आहे. पूर्वेकडे सूर्य उगवला आहे. पक्षी आपल्या गाण्यांनीं आकाश व्यापीत आहेत. पुण्य समीरण नवजीवनरूपी रस ओतीत आहे. तुझ्या मंगलमय दयेच्या प्रकाशानें आमचा देश महा-निद्रेंतून खडबडून जागा होत आहे. तुझ्या चरणीं हें शिर त्यानें नम्रता-पूर्वक ठेविलें आहे. हे राजराजेश्वरा भारत—भाग्य—विधात्या ! तुझा जयजयकार असो !

म. ग्रं. सं., ठाणे, [illegible]
क्र. 3952 नों. दि. ........
दि. 01/9/... ........
अनुक्रम 29392
विभाग व्या/आ
क्रमांक 1807
दि. 7/7/67
IRBK-0103182
IRBK-0103182

कि. १ रुपया

# आनंदकार्यालयाचीं मुलांसाठीं पुस्तकें.

| | किंमत आणे |
|---|---|
| अगदीं सोपें रामायण ( सचित्र ) | ४ |
| बालरामायण ८६ बालभारत | ६॥ |
| भारतांतील सोप्या गोष्टी - | १२ |
| रामायणांतल्या सोप्या गोष्टी | १२ |
| लिंबोणीच्या झाडाखालीं | १२ |
| बालभागवत ... ... | १२ |
| साधुसंतांच्या गोष्टी | १२ |
| बालमनोरंजन ... | ५ |
| महर्षींचा प्रसाद द्रोण १ व २ प्रत्येकीं | ६ |
| ,, ,, ,, ३ | ५ |
| वीरांच्या कथा | ४ |
| वा. गो. आपटे यांचें चरित्र | ८ |
| साराच चमत्कार | १२ |
| चित्तरंजन अथवा मुलांचें अरेबियन नाइट्‌ भाग १ ला | १२ |
| भाग २ रा | ५ |
| परिस्तानांतल्या गोष्टी | १२ |
| मुलांचें शहाणपण | १२ |
| पंचामृत | ४ |
| चंद्रशेखर व मोहना ( ति. आ. ) | ६ |
| बालविनोदमाला भाग १ ते ४ प्र. | २ |
| बालविहारमाला ,, ,, | २ |
| मुलांचा विविधज्ञानसंग्रह | ४ |
| एका दिवसाच्या सुटींत | ४ |
| मनी आणि मोत्या | ४ |

| | किंमत आणे |
|---|---|
| कां व कसें ? भा. १ व २ प्रत्येकीं | ४ |
| ,, भाग ३ व ४ प्रत्येकीं | ६ |
| औद्योगिक करमणूक | ४ |
| नाट्यरामायण व नाट्यभारत प्र. | ८ |
| मुक्तधारा ... | ८ |
| तेजोभंग नाटक ( भागवतकृत ) | ५ |
| दोन चुटके ८१॥ विद्यामंदिरांत | २ |
| गांधी-गीता ८५ उत्तरगीता | ८ |
| रवींचे उज्ज्वल किरण | रु. १ |
| अरविंद बाबूंचीं पत्नीस पत्रें | ३ |
| टापटिपीचा संसार-नवी आवृत्ति | रु. १॥ |
| माजघरांतील चर्चा | १० |
| लेखनकला कागदी | रु. २ |
| आशियाचे धर्मदीप | रु. २ |
| थोर विभूति | १२ |
| आकाशमंदिर ( कादंबरी ) | रु. २ |
| स्वभावचित्रें | रु. १ |
| दूर्वांकुर ( कवितासंग्रह ) | ८ |
| शिशुविहार ( ,, ) | ३ |
| अशोकचरित्र | रु. १॥ |
| मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी | रु. २ |
| मराठी-बंगाली शिक्षक | छापत आहेत |
| मराठी-बंगाली शब्दकोश | छापत आहेत |
| संस्कृत-मराठी कोश | रु. १॥ |

पत्ता—आनंदकार्यालय, पुणें २.